# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० ४ माहे आगष्ट सन १८७८ इसवी. अंक ३१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणांर लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| महामारी वरील गोळी | ०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ....०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |

सदर्हू किंमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## महामारीवर रामबाण औषध.

या औषधाच्या गोळ्या सातारकर प्रसिद्ध वैद्य रा. रा. रामचंद्र भास्कर गोरे यांणीं केलेल्या एका मित्राकडून आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकडे विकण्यास आलेल्या आहेत. या एक रुपयास १६ दिल्या जातात. या मोठ्या गुणकारी आहेत असें समजतें. यांच्या योगानें जुलाब व वांती एकदम बंद न होतां आजाऱ्याची प्रकृती दुरुस्त होत जाती व पोट फुगत नाहीं. इतकें मात्र केलें पाहिजे कीं या रोगाचा झटका समजल्या बरोबर औषधाची योजना झाली पाहिजे. दिरंगाईवर टाकतां उपयोगी नाहीं. औषध देण्याचा प्रकार व खाण्यापिण्याचे नियम या विषयींचा छापील कागद गोळ्या बरोबर दिला जातो.

व. स. चे मालक.

## महामारी.

### तिचीं कारणें, निवारण व औषधोपचार.

सर्वांच्या उपयोगी पढण्या जोगा ग्रंथ छापत आहे आगष्ट १८७८ अखेर अगाऊ पाठविल्यास किंमत चार आणे, मागाहून सहा आणे व टपाल हशील शिवाय पडेल. पत्ता व किंमत खालीं सही करणाराकडे पाठवावी. ग्रंथ आगष्ट अखेर तयार होईल.

मु. मिरज ता. २९ जुलै १८७८ इ०

त्रिंबक सखाराम एल एम

मेडिकल आफिसर

---

नोटिस.

तमाम पक्षकारास कळावें कीं, आह्मी चिखली तालुक्यांत वकिली करण्यास रहाण्यास गेलों परंतु दप्तरें भाऊ शास्त्री वैद्य खामगावकर यापाशीं ठेविलीं त्यास २० दिवस झालि परंतु ज्याचे त्यांनीं रोखे व हुकुमनामे व दाव्याचे नंबर उतरून नेले नाहींत, त्यास आणखी एक महिना दप्तरें तेथें रहातील नंतर चिखलीस नेऊं. सदर्हू मुदती तवर लिहिल्याप्रमाणें ज्याचे त्यांनीं कागद न नेतां मुदतीबाहेर गेल्यास त्याचे जबाबदार आह्मी नाहीं कळावे. तारीख २२ माहे जुलाई सन १८७८ इसवी.

( सही ) बाळाजी नारायण वकील खामगावकर.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस जागा द्यावी.

मी मलकापुराकडून फिरत फिरत बुलढाण्यास आलों. तेव्हां मला असें दिसून आलें कीं ह्या तालुक्यांत बहुतेक ठिकाणीं वबा सुरू असून मनुष्यांची आहुती होत आहे, आपल्या पत्रांत ज्या हरिदासा विषयीं मजकूर आला होता ते या रोगाच्या तडाक्यांत सांपडून प्राणास मुकले. त्यांच्या बरोबरची मंडळी परत जातां मजला भेटली. त्यांचा शोक पाहून तर मी अगदीं गलित झालों. पत्रकर्ते महाराज दोन दिवस माझा मुक्काम बुलढाण्यास होता, परंतु तेथून केव्हां सुटतों असें झालें. महामारीच्या रोगानें एवढ्याशा लहान गांवांत इतका कहर करून दिला आहे कीं सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें आहे जो तो आपल्या विवंचनेंत आहे. एथें स्वच्छता जिल्ह्याचें ठिकाण असल्या मुळें इतकी चांगली आहे कीं जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे रस्ते दुधा सारखे निर्मळ. बंदोबस्त उत्तम, इतकें असून आज सव्वा महिन्या पासून महामारीचा तळ येथें पडला आहे. ह्या बाईची स्वारी प्रथमतः येथें उत्पन्न झाल्यापासून औषधी उपचाराचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा डाक्टर साहेबांनीं ठेविला आहे. वेळीं अवेळीं गरीबावर अगर ज्या कोणावर असला प्राणघातक प्रसंग गुजरेल त्यास लागलीच दवा मिळावी एतदर्थ दव्याच्या कुप्या घेऊन मनुष्यें रस्तोरस्तीं फिरत असतात. साहेब लोक तसेच नेटिव लोक, व मोठ मोठाले अधिकारी पदरचे पैसे खर्च करूनही रोगाचा डेरा उठविण्याविषयीं यत्न करित आहेत. असें माझ्या पहाण्यांत आलें कीं दोन प्रहरीं व मध्य रात्रीं या रोगापासून मनुष्य आजारी होतो. आज आजारी झालेला मनुष्य उद्यां दोन प्रहर पावेतों बहुतेक यमसदनाची वाट धरूं लागतो. एक दोन दिवस प्रथमतः निभावले ह्मणजे निभावण्याचीं चिन्हें दिसूं लागतात. हा रोग बहुतकरून ब्राह्मण लोकांस बाधत नाहीं. याचें कारण असें ह्मणतात कीं हे लोक तिखट कमी खातात व स्वच्छता चांगली ठेवितात.

साहेब लोकांसही या रोगापासून फार इजा होत नाहीं. याचें कारण असें ह्मणतात कीं, खाण्या पिण्यामध्यें नेमस्तपणा व कपडा लत्ता चांगला वापरणें. एथली हवा चांगली आहे. केवळ मायेरानच समजायाचें, पाणी वगैरे पुष्कळ झालें आहे. रस्ते चांगले, गांवाची रचना चांगली व सफाई फार उत्तम. इतकें आहे तरी रोगास फार दिवस बिराड कां मिळालें? तें कळत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, चिखलीच्या रस्त्यावर कोठें मरी देवी होती तिला कोणी स्थलभ्रष्ट केल्यामुळें तिच्या कोपाचा हा प्रसाद होय. मनुष्य किती ही धर्मलंड असला तरी जिवावर येऊन बेतलें ह्मणजे सर्व गोष्टी एकीकडे ठेवून परमेश्वराकडे सहज गतीनें मन वळवितो. अशा स्थितीमुळें सदर्हू देवीपाशीं एथील कियेक लोक जेवण करण्यास गेले होते असें कळतें. जितके उपाय होते तितके करून पार झाले पण अजून उपशम होत नाहीं यास इलाज काय? या रोगाची दिवसानु दिवस चढती कळा आहे. जिल्ह्याचें ठिकाण जरी जाहे तरी वस्तीचें मान फार थोडें, इतकें असून दररोज सातापासून आठ पर्यंत मनुष्यें परलोकवासी झालीं अशी वार्ता ऐकूं येते. अद्याप पुढें काय होणार हें समजत नाहीं. सर्व लोक चिंताग्रस्त आहेत. खाणें पिणें कोणास सुचत नाहीं. बाजारास बाहेरचे लोक फारसे येत नाहींत. आपल्या ब्राह्मण मंडळींत रा. रा. माधव राव लोकलफंड इंजिनिरचे क्लार्क यांच्या पत्नीस ता. १८ रोजीं उपद्रव झाला व ता. १९ रोजीं देवाज्ञा झाली ही बाई साध्वी असून चांगली होती. तिच्या मरण कालपासून आबाल वृद्धांत धास्ती अतिशय उत्पन्न झाली. कळावें हे विनंती मुक्काम बुलढाणें ता. २४ माहे जुलै सन १८७८ इसवी.

आपला एक दास

फिरस्ता.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आर्या.

हें समजुनि नच कोणी
शमवाया झटति युद्धकर्मा त्या ॥
घडतें तेंचि जगीं जें,
आवडतें होय विश्वनिर्मात्या ॥ १७६ ॥
ह्मणुनीच दुसऱ्या दिवशीं
प्रातःकाळीं तयारिचा डंका ॥
दोन्ही दळांत गाजे
न शमाची राहिली तया शंका ॥१७७॥

श्लोक.

तयारी तयारी असा शब्द सर्वा ।
ठिकाणीं प्रकाशे, तदा वीर गर्वा ॥
चढोनि, स्वयें स्नानपूजादि कर्में ।
न्यहारी करोनी, क्षणें लेति वर्में ॥१७८॥

आर्या.

सर्वेचि पंचहत्यारी
रथ गज हय वाहनावरी चढुनी ॥
झाले रणास उन्मुख
भाट स्तविती जयां बिरुद पढुनी १७९
नाना रण वाद्यांचा
तेव्हां गजर प्रकाशला प्रबळ ॥
तो क्रूरनाद ऐकुनि
खळबळलें अब्धिसें समस्त बळ ॥१८०॥
सेनापतिनीं गणना
करोनि आज्ञा दिली प्रयाणाची ॥
तत्काळ वीर दाविति
वेगानें झडप जी ससाण्याची ॥ १८१ ॥
तो मानसिंग भूपति
आणि जगत्सिंग भूप अव्यग्र ॥
स्वस्वचमूतें रक्षिति
जनकापरि दिसति ते पराउग्र ॥१८२॥
दोन्ही सेना सत्वर
रणांगणीं कीर्ति व्हावया आल्या ॥
परमरणा साधाया
परम रणारंभ करूनि त्या धाल्या ॥१८३॥

श्लोक.

सेनासिंधु परस्परें धडकती
अर्धोर्मि नागाचळ ।
प्रालेयापरि शुभ्र केतुपट ते
फेनावळींचें कुळ ॥
हत्तींचा ध्वनि जो गभीर, समजा
त्याचा महा घोष तो ।
वीरास्वप्रगण स्वयें मथुनि ज्या
प्रख्यामृतें शोषतो ॥ १८४ ॥
शस्त्राशस्त्रि रणप्रकार बहुधा
ईर्ष्यावशें मातले ।
केशाकेशिहि शस्त्रवृंद सरतां
योद्धे करूं लागले ॥
मागें पाय न ठेविती पुलकिता
हर्षें जयांच्या तनू ।
मित्रा मित्र सुतासि बाप वधिती
ऐसाचि हो हा मनू ॥ १८५ ॥
देहाची ममता नुरे तिळहि ज्यां
वैरी पुढें देखुनी
हर्षामर्षभरें जया नच पुरे
नाचावया मेदिनी ॥
अन्योन्यां मदरक्तलोचनयुगें
झाळूं पहाती वनीं

संचारी गजगंडभेदनमती
पंचास्य ते या जनीं ॥ १८६ ॥
हसले परांस बहु शौर्य दावुनी
फसले कधीं न भिउनी न मोहुनी ॥
असले सुवीर रिपुच्या बळामधीं
धसले, वनीं न वणवे तस कधीं ॥१८७॥
रिपुशस्त्रवन्हिमधिं काय होमिती ।
किति एक त्या नचि यशास हो मिती ॥
गति ते सुवीर सुखरूप भोगिती,
जिस पावती अति विरक्त योगि ती १८८
( पुढें चालू. )

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुद्ध ६ शके १८००

## लढाईची वार्ता संपून सर्वत्र शांतता.

थोड्या महिन्यां मागें युरोपांत आमचें इंग्लिश सरकार व रशियायांचा घोर युद्धसंग्राम होईल असें वाटत होतें पण उभय सरकार विच्यारानें वागल्यानें तो प्रसंग अगदीं टळला. व मोठमोठाल्यां राष्ट्रांच्या प्रधानांची जर्मनी देशाच्या बर्लीन नामक राजधानीं शहरांत सभा होऊन मसलती झाल्या त्यांत सर्व गोष्टींचा निकाल होऊन सर्व संतुष्ट झाले, व तहनामे पुरे होऊन प्रधान मंडळी आपआपल्या राजधान्यांस परत गेली. आमचे इंग्लिश सरकारास या मसलतींत सायप्रस नावाचें बेट सुमार साडेअकरा लक्ष वसुली रकमेचें तुर्कस्थानाकडून मिळालें. लार्ड बिकनस्फिल्ड सभेचें काम आटपून परत आले तेव्हां त्यांचे मोठ्या जयजयकारानें आगत स्वागत झालें, व त्यांस मानपत्र मिळालें. आणि लार्ड मेयर यानीं त्यांनां एक मोठि मेजवानी दिली— सायप्रस बेटावर गवरनर सर गॉर्नेट वुइलसी यांस नेमिलें. व हिंदुस्थानांतून गेलेली सात हजार फौज तूर्त त्या बेटांत रहावी असा ठराव झाला आहे. या सभेच्या वाटाघाटींत आस्त्रिया देशास तुर्कस्थानचे दोन प्रांत मिळाले. रशियास बातुम, कार्स, अर्दाहान वगैरे मुलुख मिळाला. इराणास एक प्रांत मिळाला. व तुर्कस्थानच्या एशिया खडांतील राज्याची इंग्लिश सरकारानीं चांगली सुधारणा करावी व रशियाचा संसर्ग त्यास लागू देऊं नये असें ठरलें. व हे सर्व ठराव तुर्कस्थानास आवडून त्यानें ते पसंत केले, तेणेंकरून सर्व शेवट गोड होऊन लढाइचें तोंड मिटलें.

ही लढाई झाली असती तर आमच्या हिंदुस्थान देशास तिचा फार उपसर्ग लागला असता, पण परमेश्वरानें तेथपर्यंत मजल आणिली नाहीं ही मोठ्या संतोषाची गोष्ट झाली.

## प्रेस आक्ट.

वर्तमानपत्राविषयींचा नवीन कायदा रद्द होण्याविषयीं विलायतेंत पार्लमेंट सभेंत मि० ग्ल्याडस्टन साहेब माजी मुख्य प्रधान यानीं पुष्कळ खटपट केली व त्यांचे मतास १९२ गृहस्थांचीं मतें मिळालीं परंतु तो चालू राखण्याविषयीं दुसऱ्या २०८ गृहस्थांचीं मतें पडल्यावरून बहुमतानें तो कायम राहिला. तथापि ग्ल्याडस्टन साहेबांचें असें एक मागणें कबूल झालें आहे कीं, या कायद्याविषयीं ज्या हर एक गोष्टी हिंदुस्थानांत घडतील त्या पार्लमेंट सभेपुढें ठेवीत जाव्या. व विलायतेंतील एकंदर झाल्या प्रकारावरून असें दिसतें कीं, हा कायदा आपले व्हाइसराय लार्ड लिटन साहेब यांच्या गौरवा प्रीत्यर्थ चालू ठेविला; नाहीं पेक्षां ते राजीनामा देते, असीही गप्प प्रसिद्ध झाली आहे. आणि यावरून आशा आहे कीं वर्तमानपत्रांची हिरावून घेतलेली स्वतंत्रता कदाचित पुढें मागें त्यांस मिळेल. पार्लमेंट सभेपुढें हिंदुस्थानांतून गिल्ला केल्यानें स्टेटसेक्रेटरीनीं त्या कायद्यांत बरीच सुधारणा करण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास लिहिलें व त्याचा अंमलही झाला आहे. असें म्हणतात कीं ग्ल्याडस्टन साहेबांचें या बाबदींतील मागणें अगदीं सौम्य रीतीचें दिसून आलें त्यावरून त्यांच्या मतास विशेष जोर आला नाहीं. असें असेल तर आमच्या लोकांचें हें नष्टचर्यच समजावयाचें! हिंदुस्थान सरकारानें हा कायदा अतित्वरेनें व अतिशय गुप्त रीतीनें पास करून घेतला याबद्दल पार्लमेंट सभेंत बरीच टीका झाली त्यावरून पुढें असले कायदे होण्यांत आमच्या इकडे कांहीं सुधारणा झाल्यास होईल. असो. गाऱ्हाणीं विलायत सरकारापर्यंत नेण्याचें आतां बरेंच कळूं लागलें व बरेचं प्रकरणांत विलायतपर्यंत बोभाटे जाऊं लागले व तिकडे हिंदुस्थानच्या सुख दुःखाची वाटाघाट पुष्कळ होऊ लागली. हें देशाच्या बऱ्याच उन्नितदशेचें चिन्ह आहे असें आह्मी समजतों.

## सर कावसजी जहांगीर यांचा मृत्यू.

मुंबईतील या प्रसिद्ध पुरुषाच्या मृत्यूविषयीं गेल्या आठवड्यांत आह्मी तयार केलेला निंबध तसाच राहिला. ह्मणून आतां उशीर झाला तरी या दानशूर गृहस्थाबद्दल दोन शद्ब आमचे वाचकांस कळविल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

सर कावसजी हे तीन पिढ्यांचे मोठे व्यापारी असून त्यांचें आडनाव रेडी मनी ह्मणजे "नगद नाणें" असें होतें. यावरून देखील त्यांची थोरवी कळून येतें. धर्माच्या, लोकसुधारणेच्या, विद्येच्या, व परोपकाराच्या कामांत पैसे खर्चण्याविषयीं हे मोठे हातखंडे असत. अशा कामीं प्रसिद्ध रीतीनें यांनीं पैसे दिल्याची यादी रुपये १४,४६,७१६ ची प्रसिद्ध झाली आहे व ती शिवाय प्रसिद्ध नाहींत असे लाखों रुपयांचे त्यांचे धर्म झालेले आहेत असें समजतें. यांस आपल्या सरकाराकडून नाइटचा व सी. एस. आयचा किताब मिळाला होता. हे आपले वयाचे ६६ वें वर्षीं मरण पावले. यांस संधिवाताचा आजार अलिकडे कित्येक वर्षें झाला होता. यांस संतान नाहीं. चार वर्षांपूर्वीं यांनीं आपल्या भावाचा नातु दत्तक घेतलेला आहे. त्याचें नाव मि. जहांगिरजी. सर कावसजी यांचे आजाराप्रीत्यर्थ बहुत खर्च झाला आहे. फक्त एका युरोपियन डाक्टराची फी १८००० रुपये झाली. सन १८६२ सालापासून व्यवहारमार्गांतून यांणीं आपलें मन काढिलें होतें. तरी औदार्य दाखविण्याचा प्रसंग दृष्टीस पडल्याबरोबर यांनीं त्या कामीं पैसे देण्यास हयगय केलीच नाहीं. गेल्या सालांत व चालू सालांत देखील त्यांनीं हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. यांच्या देणगींतून कांहीं ठोकळ रकमा आह्मी पुढें दाखवितों त्यावरून वाचकांस त्यांचें औदार्य दिसून येईल.

| | |
|---|---|
| युनिव्हार्सिटीच्या इमारतीस. | १,००,००० |
| पुण्याचे इंजिनियरिंग कालेजास | ५०००० |
| स्ट्रेंजर्स होम सोसैटी कडे | ७,५०० |
| हिंदुस्थान आणि चीन यांमधील व्यापार करणारे कंपनीकडे. | २,००,००० |
| घनदेवी, नवसरी, बलसार, रणदीर येथील दवाखान्यांकडे | ३४,०६५ |
| खेतवाडी मुलींची शाळा, व नवसरी आणि घनदेवी एथील शाळांस | ७१,५०० |
| लुळे आंधळे पारशां करितां. | ३०,००० |
| पाण्याच्या विहिरी, हौद, पुस्तकालयें, तालीमखाने यांस. | २,१०,२८८ |
| हैदराबादेंतील वेड्याचे इस्पितळास | ५०००० |
| लंडन शहरी कारंजे बांधिलें त्यास | १८५४४ |
| मुंबईच्या धर्मशाळेस | १५ ००० |
| मुंबईच्या युनिव्हार्सिटीला फर्निचर | १०,००० |
| वायव्य प्रांतांतील दुष्काळास | ९०,००० |
| सुरतेच्या इस्पितळास | ७२००० |
| मुंबईतील डोळ्याच्य आजाऱ्यांचे इस्पितळास | १,१२००० |
| एलफिन्स्तन कालेजाला | २,००,००० |

या त्यांच्या औदार्यापैकीं ठोकळ ठोकळ रकमा आहेत. व हजार, दोन हजार, पांच हजार, दहा हजार रुपये असे तर कित्येक प्रसंगास कित्येक ठिकाणीं त्यांनीं दिलेले आहेत. याप्रमाणें साऱ्यां हिंदुस्थानांत व युरोप खंडांतही त्यांनीं आपल्या औदार्यानें आपणास अमर करून ठेविलें आहे. मुंबईच्या लोकांनीं सर कावसजी जीवंत असतांच त्यांचे लोकोपकार स्मरावे ह्मणून २०००० रुपयांची वर्गणी करून त्यांचा मुंबईस पुतळा करण्याची तजवीज केली व तो गुदस्तां एलफिन्स्तन कालेजांत उभा केला. कित्येक गवरनरांनीं यांस कायदे कौन्सलांत मेंबर होण्याविषयीं विच्यारलें होतें पण प्रकृतीच्या अस्वाधीनतेमुळें त्यांनीं कबूल केलें नाहीं. स्टार आफ इंडियाचें पदक त्यांस देण्याकरितां मुंबईस लार्ड नार्थब्रूक साहेब व्हाइसराय आल्या वेळीं त्यांनीं भरविलेल्या दरबारांत यांस बोलाविलें होतें पण अस्वस्थ प्रकृतीमुळें यांचें जाणें झालें नाहीं. तसेंच युवराज प्रिन्स आफ वेल्स मुंबईस आल्यावेळीं त्यांनींही भेटीची इच्छा दर्शविली होती पण अस्वाधीन प्रकृतीमुळें यांच्यानें त्यांस भेट देववली नाहीं. इत्यादि गोष्टी ऐकिल्या ह्मणजे हे केवढे महा पुरुष होते याविषयीं आमचे वाचकांस चांगलें कळेल.

हे मरण पावले त्या दिवशीं यांच्या चिरंजिवास युरोपियन लोकांकडून व नेटिवांकडून दुःखसूचक पत्रें व तारा पुष्कळ आल्या. व त्यांचे शोचनार्थ त्या दिवशीं कालेज, शेरबाजार, ब्यांकी, शाळा, व पारशी लोकांचीं दुकानें बंद ठेविलीं होतीं. व त्यांच्या प्रेत समारंभास पुष्कळ युरोपियन लोक गेले असते परंतु त्यांच्यांत तशी चाल नाहीं ह्मणून ते गेले नाहींत. तरी सुमार दोन हजार पारशी गृहस्थ गेले होते.

## म्युनिसिप्यालिटीचे कर.

आमच्या मागील पत्रीं अकोला शहरांत दोन नवीन कर बसविण्याचा हेतू आहे ह्मणून म्युनिसिपल कमिटीनें नोटिसी प्रसिद्ध केल्या आहेत. ह्या प्रसिद्ध करण्याचा हेतु, या कर विषयीं सर्व लोकांचीं मतें काय आहेत व त्यांपासून विनाकारण अडचणी अथवा अन्याय होणार आहे कीं काय व असल्यास कोणत्या प्रकारें त्याचें निवारण करतां येईल याविषयीं सूचना व्हाव्या हाच आहे हें सर्वांच्या लक्षांत आलेंच असेल.

नवीन कर बसत असला ह्मणजे त्या विषयीं लोकांस सर्व प्रकारें आनंद होईल असें नाहीं. परंतु म्युनिसिपल कमिटीस तिजवर सोंपलेलें काम करण्यास ज्या अर्थी अधिक पैसा पाहिजे आहे त्या अर्थी लोकांस कमी त्रास होऊन अन्याय न होतां कोणत्या रीतीनें तो पैसा घेतां येईल हाच विचार करावयाचा आहे ह्मणून ह्याबद्दल मागाहून टीका करण्यापेक्षां आधींच सूचना कराव्या हें बरें असें आह्मास वाटतें.

नोटिसींत जे दोन कर सांगितले त्यांपैकीं एक मेहेतर पट्टीचा आहे. हा कर अगदीं नवा आहे असें नाहीं. पायखाने साफ करणारे मेहेतर लोक म्युनिसिपल कमिटीनें नोकर ठेवून त्यांचा पगार देण्याकरितां लोकांकडून कर घेण्याची वहिवाट आज चार वर्षें चालू आहे. परंतु हल्लींच्या नोटिसीप्रमाणें या कराचें स्वरूप कांहीं अंशीं बदललें आहे व कोणत्या इसमास कोणता कर द्यावा लागेल याचाही स्पष्ट खुलासा केला आहे. आतां या करास मेहतरपट्टी ह्मटलें आहे. परंतु त्यापेक्षां शहर सफाईबद्दल पट्टी अशा कांहीं नावानें हा कर लोकांस माहित होईल तर बरा. कारण त्या कराच्या उत्पन्नांतून पायखान्याच्या कामगिरीस लागणारे मेहेतर लोकांचा पगा

र भागून शहरांतील इतर सफाईचा खर्च कांहींअंशीं तरी भागावा असा कमिटीचा हेतु आहे ह्मणून कळलें आहे. आणि या मुळेंच सर्व रहिवाशांजवळून, ह्मणजे त्यांचे घरीं पायखाने असोत किंवा नसोत, त्यांनीं उत्पन्नाच्या मानानें हा कर द्यावाच असा हेतु दर्शविला आहे. सर्व लोकांजवळून हा कर घेण्याचें, शहरसफाईशिवाय आणखी, हें एक कारण दिसतें कीं गावाबाहेर ज्या मोकळ्या जागा लोकांच्या उपयोगाकरितां राखल्या आहेत त्यांचा शेतसारा कमिटीस द्यावा लागतो व या कराचें उत्पन्न चालू खर्च भागून ज्यास्ती राहिल्यास लोकांच्या सोयीकरितां कांहीं पायखाने बांधून ठेवण्याचा कमिटीचा हेतू आहे असेंही कळतें. ह्या सर्व कारणांवरून हें उघड दिसतें कीं कोणी कमिटीनें लाविलेल्या मेहेतराची जरूर नाहीं ह्मटल्यास त्यास कर चुकणार नाहीं व या कारणावरून हें कमिटीचें करणें गैर आहे असें वाटत नाहीं. हा कर सहा महिन्यांचा एकदम अगाऊ घेऊन प्रत्येक सहामाहीचे दुसरे महिन्यांत वसूल करण्याची योजना आहे. वसूल देण्यापूर्वीं कोणी इसम खात्रीनें असें कळवील कीं त्याच्या घरचीं कांहीं मनुष्यें बाहेर गावीं जाऊन निदान तीन महिनेपर्यंत येणार नाहींत तर तितक्यापुरता कराचा आकार सूट घालण्यांत येईल व या नंतर कांहीं मनुष्यें ज्यास्ती आलीं तरी त्यांजकरितां ज्यास्ती आकार मागितला जाणार नाहीं, असाही नियम करण्यांत येणार आहे ह्मणून समजतें. ह्या कामांत फार बारकाई कमिटीस किंवा लोकांस पहातां येणार नाहीं. ह्मणून वर लिहिल्याप्रमाणें साधारण अनुमानाचा नियम करणें भाग पडलें आहे हें उघड आहे.

दुसरा कर गाड्यांवर बसविण्याचा आहे. म्युनिसिपल कमिटीस पोलिसपट्टी या नावाचा जो कर आहे त्याचें उत्पन्न पूर्वीं पुष्कळ होत असे तें अलिकडे फार कमी झालें हें सर्वांस माहितच आहे. आणि कमिटीचा खर्च तर वाढत चालला आहे. प्रत्येक मनुष्यास आजच्यापेक्षां उद्या आपली स्थिति बरी व्हावी असें वाटत असतें, तसेंच म्युनिसिपल कमिटीस वाटतें; परंतु तसें करण्यास ज्यास्ती पैसा पाहिजे. ह्या कराचें उत्पन्न विशेषेंकरून, आहेत ते रस्ते दुरुस्त राखून नवे रस्ते शहरांत करण्याचे कामाकडे लावावें, हाच आहे असें कळतें. तेव्हां या कामाकरितां नुसत्या गाड्यांवरच दस्तुरी बसविणें वावगें आहे असें कोणास वाटणार नाहीं. शहराचे बाहेर किंवा आंत जाणाऱ्या येणाऱ्या सर्व गाड्यांवरही दस्तुरी आहे. दर मात्र दोन आहेत. रेलवे स्टेशनावर जाणारी गाडी माफींत धरण्यांत येईलसें दिसत नाहीं कारण तसें केल्यानें दरमहा शेंकडो गाड्या गावांतून स्टेशनावर माल घेऊन जातात व येतात तितक्यांचें उत्पन्न जाणार आहे. ह्या गाड्यांस एक सोय कमिटीनें चांगली करून ठेविली आहे ती अशी कीं, जे कोणी महिन्याचा एकदम अगाऊ कर देतील त्यांजवळून निम्या दरानें दस्तुरी घेण्यांत येईल. बसण्याच्या गाड्यांस गावांतल्या गावांत फिरण्यास कराची माफी ठेविली आहे असेंही कमिटीच्या घटपटनेवरून दिसतें.

याप्रमाणें नव्या कराविषयीं कमिटीतर्फेचें मत आह्मास ठाऊक असलेलें घोरणानें अकोल्यांतील लोकांस कळावें ह्मणून आह्मी त्यांपुढें ठेविलें आहे.

---

**खोटी बातमी**— खामगावचे वकील रा. रा. बाळाजी नारायण यांस दंड झाल्याचें वर्तमान अगदीं खोटें आहे असें तिकडून पत्रें आल्यावरून आतां समजतें. तेणेंकरून अशी खोटी बातमी आमचे पत्रांत प्रसिद्ध होऊन वकील मजकूर यांचे मनास निष्कारण आह्माकडून दुःख पोंचलें याबद्दल आह्मी त्यांची माफी मागतों. ही बातमी आमचे पत्रांत येण्यापूर्वीं ४–५ दिवस अकोल्यांत पसरली होती व कित्येक आमच्या एथील प्रतिष्ठित गृहस्थांच्या तोंडूनही आह्मास ही कळली होती, तरी "ऐकतों" याच डळमळीत आधारानें ती आह्मी लिहिली. पण तशाबद्दलही आतां आह्मांस वाईट वाटतें. आतां ही बातमी कोणी कोणत्या हेतूनें पिकविली व हिचे मुळांत काय आहे त्याचा आह्मी पक्का शोध करीत आहों. लागल्यास त्याविषयीं पुढें लिहू.

---

**आगगाड्या**— हिंदुस्थानांत आगगाड्या झाल्यापासून नफे आहेत किंवा तोटे आहेत या विषयीं नाशकास एका सभेंत वादविवाद झाला. त्याचे शेवटीं रा. ब. माधवराव गोविंद रानडे यांनीं संभाषण फार सुरस केलें व माहिती फार उत्तम सांगितली तींतील तात्पर्य असें:—

आगगाडी या देशांत सुरू झाल्यास सुमार २०।२१ वर्षें झालीं. व इतक्या काळांत तिजपासून या देशास फायदेच झाले आहेत व पुढें ज्यास्ती होतील. या संबधानें रेलवे कंपन्यांचे व मुख्यत्वें आपले सार्वभौम राणी साहेबांचे आपल्या या देशावर मोठे उपकार झाले आहेत. व याकरितां आपण त्यांचे आभार मानले पाहिजेत. या रेलवे कंपन्यांचे एकंदर भांडवल सुमार ९५ कोट रुपये या देशांत खर्च झालें आहे. या रेलवेंत दरसालसुमारे ३ कोट मनुष्यें बसत आहेत. या देशांत सुमार ७ हजार मैल रेलवे चालू आहे. गेले सालीं खर्च भागून कंपन्यांस कोठें शेंकडा सुमारें १० रुपये व कोठें सुमारें ७॥ रुपये उत्पन्न झाले आहेत. हल्लीं या कंपन्यांचे संबधानें कमिशन बसलें आहे तिकडे रेलवेपासून काय अडचणी आहेत हें कळविण्यास सर्वांस मोकळीक आहे.

## वऱ्हाड.

मे० क्या० ब्रुक साहेब या जिल्ह्यास डिपुटी कमिशनर आमच्या मोठ्या सुदैवानें आले आहेत असें सर्वांस वाटूं लागलें आहे. ते हरएक कामांत मोठ्या बारकाव्यानें व दयाळूपणानें लक्ष पुरवितात व फार मेहेनत घेऊन बहुत काम करितात व सर्व लोकांस चांगलें सौख्य व योग्य हक्क मिळावे असें चाहतात असें पुष्कळांचे तोंडून ऐकल्यानें आह्मांस फार संतोष वाटत आहे. तर अशांनां वारंवार बढती मिळो व असे बहुत कामदार निपजोत असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

रा. रा. माधवराव भानप एथें कारकून असलेले नुकतेच अकोटास बदलून गेले होते तिकडे महामारीनें ते मरण पावले असें समजतें. हे हुशार कारकून असून मागें पेशकारही होते. तसेच यांचे बंधू बाबाराव भानप ह्मणून नामांकित कारकून होते ते तीन वर्षांपूर्वीं मरण पावले. उभयतांचीं कुटुंबें निवर्तलीं, मातुश्री निवर्तली, व माधवरावास मुलगा होता तोही निगस्ता निवर्तला मिळून भानपाचें घराणें अगदीं बीबूड झालें हें ऐकून कोणासही दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं. ईश्वराची मर्जी!

---

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, रा. रा. सखाराम दत्तात्रय जगंमित्र तहशिलदार यांचे पेनशनाचे बाबदींत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पुन्हा कांहीं विच्यार होत असल्याची सुवार्ता कळते. यांस तिनाई पेनशन आज ५० रुपये मिळणार आहे; परंतु यांची २५ वर्षें नोकरी होऊन यांस ७५ रुपये पेनशन होण्यास सारी आठ महिन्याच्या कालाची अवधि होती तावत्कालपर्यंत आपले हातून काम घेण्याची मेहेरबानी करून आपले वृध्धावस्थेंत दरमहा २५ रुपये पेनशनाचें शाश्वत नुकसान करूं नये अशा त्यांच्या विनंतीकडे मागील अधिकाऱ्यांनीं दुर्लक्ष्य केलें तें तसें करावयाचें नव्हतें असें वरिष्ठांचे मनांत आलें आहे असें ह्मणतात; हें खरें असेल व त्याप्रमाणें घडून येऊन यापासून आठ महिने काम निभवून घेऊन यांनां निमें पेनशन देण्यांत येईल तर सर्व लोकांस मोठा संतोष होईल. सखाराम दत्तात्रय हे आणखी कित्येक वर्षें देखील कामास उपयोगी पडण्यासारखे चलाख व हुशार आहेत एवढेंच नव्हे पण त्यांची नुसती शरीरप्रकृती देखील पाहिली तर ते निरुपयोगी झाले आहेत असें कोणासही वाटणार नाहीं. सबब ज्यांला सर्व लोक चाहतात व ज्यानें सरकार चाकरी मोठ्या नेकीनें व आस्थाभूतपणें केली त्यास तिचें योग्य फल मिळण्यास ज्या अत्यल्प कालावधिची अपेक्षा आहे तितकी वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं कृपाळुपणें अवश्य द्यावी. व सर्व रयतेचा संतोष आणि दुसऱ्या इमानी सरकारी नोकरास उत्तम उदाहरण हें होऊं द्यावें असें आह्मी मनापासून इच्छितों.

---

एथें युरोपियन लोकांचें क्रिकेट ह्मणजे चेंडूदांडूचे खेळ लवकरच सुरू होणार आहेत.

---

अकोल्यास चोऱ्या होण्याची सांथ आली आहे. या आठवड्यांत तीन चोऱ्या रास्त्यावर मोठाल्या मनुष्यांकडे झाल्या व मालही गेला पण पत्ता कांहीं नाहीं. पोलिसानें या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें.

---

पर्जन्यानें याही आठवड्यांत गर्दी करून सोडिली. गुरुवारीं सारी रात्र भीज पाऊस पडला. आतां हवा निर्मळ झाली आहे. व सर्व शेतकरी लोकांस संतोष झाला आहे.

---

महामारीचा उपद्रव याही आठवड्यांत चालू आहे. तरी तो किंचित कमीकडे वळला असें दिसतें व हेंच खरें ठरलें तर परमेश्वराच्या कृपेचा सर्वत्र स्तव होईल. लोक भीतीनें अगदीं गांगरून व दुःखानें गांजून गेले आहेत. काळ्या मारुतीवर व जागेश्वरावर संतत धार सुरू आहे, राजेश्वरीं नामसप्ताह व संतत धार चालली आहे, देवीच्या देवालयांत शतचंडीची योजना होत आहे. व रेडा बकरी यांची आणि बलिदानाची मिरवणुकही गावभर झाली तेणेंकरून श्रद्धालु लोकांस अशा प्रसंगीचें आपलें कर्तव्यकर्म आपण करून चुकलों असें वाटण्यास लागलें आहे व याच सुमारास उपद्रव कमी होऊन ईश्वर कृपा करूं लागला असा भरंवसा आला ह्मणजे त्याच्या ठायीं सर्वांची निष्ठा व उत्साह जागृत राहून सर्वत्र आनंद होईल यांत संशय नाहीं!

---

कारंजाकडे महामारीचा आजार फार असल्यावरून तेथील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरचें कोर्ट कांहीं दिवस बंद ठेवण्यांत आलें आहे. व एथीलही स्मालकाज कोर्ट तारीख १५ पावेतों बंद ठेवण्यांत आलें आहे.

---

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर उमरावतीहून आले त्या दिवशीं पित्तविकारानें त्यांची प्रकृति बिघडून त्यांस एक दोन वांतीही झाल्या तेणेंकरून सर्वांस मोठी काळजी पडली होती, परंतु परमेश्वरकृपेनें त्यांची प्रकृती दुरुस्त आहे. तरी अजून ते कचेरीस येत नाहींत. खानगी बंगल्यावर काम करितात.

---

बुलढाण्याकडील गवणाजी ह्मणून एथें एक तरूण लोहार मोठा कारागीर होता तो या आठवड्यांत महामारीनें मरण पावला. त्या योगानें अकोल्यांतील कारागिरी गेली असें लोकांस झालें आहे. त्याचा धाकटा भाऊ म्याट्रिक्युलेशन पास होऊन पुण्यास इंजिनियरिंग कालेजांत शिकत आहे व त्याला वऱ्हाडची २० रुपयांची स्कालरशिप आहे.

## वर्तमानसार.

चक्रवर्तिनी साहेबांचे चिरंजीव ड्यूक आफ कनाट यांनीं नेमणूक वाढण्याविषयीं अर्ज केला होता त्याप्रमाणें ती वाढविण्याचा ठराव झाला. या राजघराण्यास खासगी खर्चासाठीं नेमणुका आहेत त्या येणेंप्रमाणें:—

| | रुपये. |
|---|---|
| चक्रवर्तिनी साहेब | ३८,५०,००० |
| ( जहागिर ४ लक्ष रु. ) | |
| प्रिन्स आफ वेल्स | ४,००,००० |
| ( जहागिर ६॥ लक्ष रु. ) | |
| त्यांच्या पत्नी | १०,०,००० |
| ड्यूक आफ एडिंबरो | २,५०,००० |
| ड्यूक आफ कनाट | २,५०,००० |
| प्रिन्स लिओपोल्ड | ८०,००० |

| | |
|---|---|
| प्रिन्सेस रायल | ८०,००० |
| प्रिन्सेस आफ हेस | ६०,००० |
| प्रिन्सेस क्रिस्तायन | ६०,००० |
| प्रिन्सेस लुईसा | ६०,००० |
| डचेस आफ टेक | ५०,००० |
| ड्यूक आफ केंब्रिज | १,२०,००० |

उदेपुरच्या राण्याचा खजीना बंदोबस्तानें जात असतां वाटेंत ५० चोरांनीं तो गाठून यथेच्छ लुटला.

कोल्हापुरचे कारभारी रावबहादुर माधवराव वासुदेव बर्वे दुष्काळ संबंधीं कमिशनाकरितां सिमल्यास गेले. त्यांचे जागेवर मिरजेचे कारभारी रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर यांस तूर्त नेमिलें आहे.

गवताचे भारे काठीला अडकवून घरावर उभे ठेविले असतां विजेची पीडा त्या घरास होत नाहीं असें फ्रान्स देशांत सिद्ध झालें आहे.

एशिया खंडांतील तुर्कस्थानांत नवीन तहनाम्याप्रमाणें इंग्लिश सरकार सुधारणा करणार त्या:– राज्यकारभार पाहणारे गवरनर यांची कामाचीं वर्षे नेमस्त करणार. हुशार व न्यायी जडज नेमणार. पोलिस चांगलें ठेवणार. व वसुलाचे मक्ते बंद करणार.

मुंबईस तारीख २४ जूनपासून सवा महिन्यात सुमार ७० इंच पाऊस पडला.

लार्ड नार्थ ब्रूक व प्रोफसर फासेट यांकडे हिंदुस्थानांतील लष्करी खर्च कमी करवावा वगैरे संबंधाचे कलकत्याहून व तद्रासेहून अर्ज गेले आहेत व ते बजेटाचा विचार होण्याचे प्रसंगीं पार्लमेंटपुढें गुजरून त्याविषयीं वाटाघाट करणार आहेत.

मि० राबर्ट नाईट टाइम्स आफ इंडियाचे माजी एडिटर बंगाल्यास सेक्रेटरी खात्यांत नोकरीस राहून बरतर्फ झाले. त्यामुळें त्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडे आपलें नुकसान भरून मिळण्याविषयीं अर्ज केला आहे.

---

## धर्मार्थ औषधी.

रा० रा० सखाराम मोरेश्वर खजिनदार निसबत डिपुटी कमिशनर अकोला यांनीं पदरचे खर्चानें एका मार्मिक व हुशार वैद्याकडून औषधी तयार करविल्या आहेत व त्या गोरगरीब व्याधिग्रस्तांस धर्मार्थ देण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे सबब या गोष्टीची लोकांत प्रसिद्धी व्हावी ह्मणून त्यांकडून खालील तपशीलवार यादी आणवून आह्मी लोकोपयोगार्थ प्रसिद्ध करीत आहो. ज्यांस ज्या औषधीची जरूर लागेल त्यांनीं ती आमचे परोपकारी खाजिनदार यांजकडून घेऊन जात जावी. कोणत्या रोगावर कोणतें औषध कोणत्या अनुपानानें घेण्यास प्रशस्त याजविषयीं पुढील लेख चांगला वाचून पहावा. सर्वांस कळावें. तारीख १ माहे आगष्ट १८७८ इसवी.

लघुमालिनीवसंत— मध पिंपळींत जीर्ण ज्वरावर देणें. तुळशीचा, माक्याचा व आल्याचा रस यांत मध घालून विषमज्वरावर देणें. इंद्रजव, नागरमोथे, धायटीचें फूल, बेलफळ, लोध, सुंट, पाचेरस ही औषधें समभाग घेऊन त्यांत दिला तर रक्तातिसार जाईल. प्रदरावर भाटेसरीच्या साळीच्या काढ्यांत द्यावें. पित्तावर अल्याच्या अवलेहांत देणें. गलग्रह रोगावर चोपचिनीच्या अगर त्या रोगावरच्या काढ्यांत देणें. नेत्ररोगावर त्या रोगाच्या चूर्णांत अगर काढ्यांत देणें.

अश्विनीकुमार— हें सर्व रोगावर अनुपानपरत्वें चालतें.

घोडाचोळी— हें सर्व रोगावर अनुपान बदलून देणें.

शितारी— हिंव तापावर पिठी साखरेबरोबर द्यावें. आणि लागलीच वर दूध भात खावा. महिनाभर गूळ वर्ज.

महाज्वरांकुश— साधारण ज्वर विषम ज्वर, एक दिवसा आडचा ज्वर, दोन दिवसा आड, तीन दिवसा आड, आणि चौथारा ज्वर यांवर अल्याचा रस व मध यांत देणें.

प्रमदानंद— ज्वर, कफ, संग्रहणी; शूळ यांजवर अनुपानपरत्वें देणें.

वैष्णवी— ज्वर, हिंव, व वायु यांजवर मध व आल्याचे रसांत देणें.

त्रिभुवनकीर्ती— सर्व ज्वर, आणि तेरा सन्निपात यांजवर ते ते काढे अगर अल्याचारस यांतून देणें.

आनंदभैरव— रुईच्या मुळाचे काढ्यांत सुंट, मिरे, पिंपळी ( त्रिकटु ) यांचें चूर्ण घालून दिलें तर शीतगात्र सन्निपातापसून रोगी वांचतो.

ग्रहणीकपाट– तूप, मिरे, साखर यांत संग्रहणीवर देणें.

अग्नितुंडावटी— अग्निमांद्य व अजीर्ण यावर सैंधव आणि सूंट याजबरोबर देणें.

श्वासकुठार— श्वास, कास ( खोकला ) अपस्मार, अग्निमांद्य, कफरोग, सन्निपात, वगैरे रोगावर विड्याचे पानाचे रसांत अगर त्या त्या रोगोक्त काढ्यांमध्यें देणें.

शंखवटी— अग्निमांद्य, शूळ पित्तशूळ संग्रहणी अजीर्ण, अरुचि, व क्षय इत्यादि रोगावर अनुपानपरत्वें देणें.

कनकसुंदर— संग्रहणी, ज्वर अतिसार, अग्निमांद्य इत्यादि रोगावर अनुपानपरत्वें देणें.

खदिरसार— बाभळीच्या पानाच्या काढ्यांत देणें ह्मणजे ८ घटकेंत खोकला जातो.

प्रवाळ— सर्व प्रकारचे उष्णतेचे रोग व पित्त, आणि जीर्णज्वर ह्यांस अनुपानपरत्वें देणें.

अग्निसुत— खडीसाखर व जिरें ह्यांच्या पुडींत तूप घालून अगर नुसतेंच यांत दिल्यास अग्निप्रदीप्ति होते.

दिनेशभैरव— अतिसारादि रोगावर जिरें आणि जायफळ यांच्या अगर नागरमोथे, बेलफळ, धणे, वाळा, सुंट यांच्या काढ्यांत देणें.

लोह— अग्निमांद्यादिकापासून क्षय वगैरे व ज्वरादिकापासून आलेली क्षीणता दूर करण्यास तूप साखर, मध, साखर वगैरे अनुपानांत देणें. किंवा पाकांत देणें.

स्वयमग्निलोह— मुख्यत्वें क्षयावर त्रिफळेशी मध तूप घालून देणें. तसाच अग्निमांद्यावरही देणें.

जातिफलादिगुटी— ताक ४ तोळे घेऊन त्यांत हिंग हरबऱ्या एवढा घालून सैंधव तितकेंच घालून दोन दोन तासांनीं दिलें तर महामारी, अजीर्णापसून होणारी विषूची वगैरे रोग जातात.

आतां साधारण अनुपानें पुढें सांगू

---

## नव्या दिवाणी कायद्यांतील फेरफार

जाहिरात नंबर ८२८ ता. १ जुलै सन १८७८ इसवी.

फारीन डिपार्टमेंटची जाहिरात नंबर २१२ तारीख २४ माहे आक्टोबर सन १८७३ इसवीची ह्यांत बदल करून गव्हरनर जनरल इन कौन्सिल ह्यांनीं सन १८७७ चा आक्ट १० ( दिवाणी काम चालविण्याचे रीती विषयीं कायदा ) पुढें सांगितलेले फेरफार करून तारीख १ माहे सप्टेंबर सन १८७८ इसवीपासून हैद्राबाद अमानी मुलुखास लागू केला आहे:—

( १ ) कलम ६२२ ह्याबद्दल खालीं लिहिलेले कलमाचा उपयोग करावा:—

ज्या हुकूमनाम्यावर अगर हुकुमावर अपील चालत नाहीं किंवा बाब ४२ ह्यांत ठरविलें आहे त्या खेरीज इतर अपील चालत नाहीं, असा हुकूमनामा अगर हुकूम रेसिडेंट यांचे कोर्टाच्या एखादे ताब्यांतील कोर्टानें केला असल्यास:—

( अ ) जेव्हां हुकूमनामा अगर हुकूम नायब तहशिलदार, तहशिलदार, किंवा दुसरे व तिसरे वर्गाचा असिस्टंट कमिशनर ह्यानें केला असेल तर डिपुटी कमिशनरास,: —

( ब ) जेव्हां असा हुकूमनामा अगर हुकुम पहिले वर्गाचे असिस्टंट कमिशनरानें किंवा डिपुटी कमिशनरानें केला असेल तर जुडिशियल कमिशनरास, आणि:—

( क ) जेव्हां असा हुकूमनामा अगर हुकूम जुडिशियल कमिशनरानें केला असेल तेव्हां रेसिडेंट यांस आपल्या विच्याराप्रमाणें तशा मुकदम्यांतील कागदपत्र मागविण्याचा व आपणास योग्य दिसेल तो मुकदम्यांत हुकूम देण्याचा अखत्यार आहे.

( २ ) कलम ३७ ह्याबद्दल खालीं लिहिलेले कलमाचा उपयोग करावा:—

“ पक्षकारांचे ज्या मंजूर केलेल मुखत्यारांस सदहू प्रमाणें हजर होण्याची, अर्ज करण्याची, अगर कामें चालविण्याची परवानगी आहे ते मुखत्यार ह्मटले ह्मणजे या कामीं सरकारी ग्याझेटांत जाहिरात देऊन, वेळोवेळीं रेसिडेंट ज्या मनुष्यांस ठरवील तीं मनुष्यें असें समजावें.”

( ३ ) कलम १०० ह्यास खालीं लिहिलेले शद्ब जोडावे:—

“ ह्या कलमाची रकम ( अ ) लागू असेल अशा मुकदम्यांत आपल्याविच्याराप्रमाणें कोर्टानें एकतर्फी काम न चालवितां मुकदम्याचे चौकशीचा दुसरा दिवस नेमिला जाई तोंपर्यंत प्रतिवादीस कैद करून अटकेंत ठेवण्याविषयीं वारंट द्यावें आणि त्याची मिळकत जप्त करावी असा कोर्टास अखत्यार आहे.”

( ४ ) कलम १८२ ह्यांत “ खुद्द जडजानें किंवा त्याच्या समक्ष व तो जातीनें सांगत असतां व नजर ठेवित असतां, दुसऱ्या मनुष्यानें कोर्टाचे भाषेत ” ह्या शद्बां बद्दल “ जडजानें आपल्या स्वभाषेंत अगर त्यास इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान असल्यास इंग्रजींत” ह्या शद्बांचा उपयोग करावा, आणि ह्याच कलमास खाली लिहिलेला विशेष ठराव जोडावा. तो असा कीं:–

“ परंतु असें ठरविण्यांत येत आहे कीं, जे असिस्टंट कमिशनर विशेष अधिकार चालवितात त्यांस ज्या नेटिव भाषांची परीक्षा देण्याचे ठरविलें असेल अशी परीक्षा एखादे युरोपियन कामगाराची पास झाली नसल्यास त्यानें चौकशी केलेल्या मुकदम्यांत साक्षीदारांच्या साक्षी वर सांगितल्या प्रमाणे त्यांच्या स्वभाषेंत, कोर्टाचे एखादे कामगारानें जडजाचे समक्ष व तो जातीनें सांगत असतां व नजर ठेवित असतां लिहून घेतल्या पाहिजेत”

( ५ ) कलम १८५ हें गाळून टाकिलें आहे.

( ६ ) कलम २६६ ह्यास खालीं लिहिलेला विशेष ठराव जोडला आहे:—

“ परंतु असेंही ठरविण्यांत येत आहे कीं, हुकूमनाम्याचे बजावणींत जर वडिलोपार्जीत मिळकत जमीन असेल तर तिची विक्री रेसिडेंट यांचे मंजूरी वांचुन होऊं नये; आणि ती जमीन स्वसंपादित मिळकत असल्यास तिची विक्री कमिशनर यांचे मंजुरीवांचुन होऊं नये-”

( ७ ) “ हायकोर्ट ” ह्या शद्बाचे ठिकाणीं “ हैद्राबाद एथील रेसिडेंट यांचें कोर्ट ” या शद्बाचा उपयोग करावा, परंतु मोफसिलांतील लहान दाव्यांचे कोर्टांस ज्या सर्व बाबी व कलमें लागू आहेत त्यांत अशा बाबीं व कलमें जेव्हां त्या कोर्टांचे संबंधानें वाचलीं जातात तेव्हां “ हायकोर्ट ” ह्या शद्बाचे ठिकाणीं “ मुलूख अमानी हैद्राबाद एथील जुडिशियल कमिशनर यांचें कोर्ट ” ह्या शद्बांचा उपयोग करावा.

( ८ ) कलम ६१९ ह्यांतील “ रजिष्ट्रार ” ह्या शद्बापुढें “ अगर कोर्टाचा दुसरा कामगार ” ह्या शद्बांचा उपयोग करावा.

(९) “हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचा मुलुख ” आणि “ठिकठिकाणचे सरकार” हे शद्ब ज्या ज्या ठिकाणीं अढळतात तेथें तेथें ह्या शद्बांबद्दल “ मुलुख अमानी हैद्राबाद ” आणि “ हैद्राबाद येथील रेसिडेंट ” ह्या शद्बांचा अनुक्रमानें उपयोग करावा.

[ सही ] सी. बरनार्ड.
अफिसिएटिंग सेक्रेटरी निजबत
हिंदुस्थान सरकार.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० ११ माहे आगष्ट सन १८७८ इसवी. अंक ३२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ॰४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १॰८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ॰१॰६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ॰१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ॰४ |
| ,, दुसरे खेपेस | ॰२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ॰६ |
| महामारी वरील गोळी | ॰१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ॰६ |
| वैद्यप्रकाश. | २॰८ |
| नादारीचे नियम. | ॰८ |

सदर्हू किंमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## महामारीवर रामबाण औषध.

या औषधाच्या गोळ्या सातारकर प्रसिद्ध वैद्य रा. रा. रामचंद्र भास्कर गोरे यांणीं केलेल्या एका मित्राकडून आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकडे विकण्यास आलेल्या आहेत. या एक रुपयास १६ दिल्या जातात. या मोठ्या गुणकारी आहेत असें समजतें. यांच्या योगानें जुलाब व वांती एकदम बंद न होतां आजाऱ्याची प्रकृती दुरुस्त होत जाती व पोट फुगत नाहीं. इतकें मात्र केलें पाहिजे कीं या रोगाचा झटका समजल्या [illegible]बर औषधाची योजना झाली पा[illegible]देरंगाईवर टाकतां उपयोगी नाहीं. औषध देण्याचा खाण्यापिण्याचे नियम या विषयींचा छापील कागद गोळ्या बरोबर दिला जातो.

## महामारी.

### तिचीं कारणें, निवारण व औषधोपचार

सर्वांच्या उपयोगी पडण्या जोगा ग्रंथ छापत आहे आगष्ट १८७८ अखेर आगाऊ पाठविल्यास किंमत चार आणे, मागाहून सहा आणे व टपाल हशील शिवाय पडेल. पत्ता व किंमत खालीं सही करणाराकडे पाठवावी. ग्रंथ आगष्ट अखेर तयार होईल.

मु. मिरज ता. २९ जुलै १८७८ इ०

**त्रिंबक सखाराम एल एम**

मेडिकल आफिसर

## धर्मार्थ औषधें.

रा. रा. सखाराम मोरेश्वर खजीनदार यानीं २३ प्रकारचीं औषधें अनेक रोगावर लागू असणारी लोकांस धर्मार्थ देण्यां साठीं तयार केलीं आहेत. त्यांची यादी तपशीलवार गेल्या आठवड्याच्या वऱ्हाड समाचारांत छापिली आहेच. आतां प्रत्येक रोगास औषध घेण्यास साधारण अनुपान काय योजावें याविषयींची माहिती ग्रंथाधारें त्यानीं कळविली आहे ती अशी:—

**सर्वसाधारण अनुपानें—** सन्निपातास आल्याचा रस १ कास श्लेष्म विकारास अडुळशाचा रस व त्रिकटूचें चूर्ण २ ज्वरास व विषम ज्वरास मध आणि पिंपळी ३ परतलेल्या ज्वरास किराईत व नागरमोथे व पित्तपापडा ४ संग्रहणीस ताक ५ जीर्ण ज्वरास मध व पिंपळी ६ जंतास वावडिंग ७ मूळव्याधीस चित्रक व बिब्बा ८ पांडुरोगास मंडूर ९ क्षयास शिलाजित १० श्वासास भारंगमूळ व सुंठ ११ प्रमेहास आंवळकाठी, हळद शर्करायुक्त त्रिफळा १२ तृषेस सोनें तापवून तें पाण्यांत विझवून तें पाणी १३ ज्वरास लोखंड तापवून पाण्यांत विझवावें तें पाणी १४ त्रिदोषास आल्याचा रस व मध १५ शूळास हिंग व तूप १६ आमवायूस करंज व गोमूत्र, एरंडेल १७ प्याहास त्रिफळा व पिंपळी १८ विषांस शिरीषवृक्ष व सोनें १९ कासास रिंगणी व त्रिकटू २० वातव्याधीस गुग्गूळ व लसूण व तूप २१ रक्तपित्तास अडूळसा २२ फेंपऱ्यास व वाणी चांगली होण्यास वेखंड व अक्कल कारा व मध २३ उदरास रेचन २४ वातरक्तास गुळवेल व एरंडेल २५ अर्दितवायूस उडदांचे वडे व लोणी २६ मेदो रोगास मध व पाणी एकत्र करून २७ प्रदरास लोध्र २८ अरुचीस माहळुंग अथवा डाळिंब २९ व्रणास त्रिफळा आणि गुग्गूळ ३० शोकास मध ३१ आम्ल पित्तास द्राक्षें ३२ मूत्रकृच्छ्रास शतावरी व कोहळ्याचें पाणी ३३ नेत्ररोगास त्रिफळा ३४ उन्मादास जुनें तूप ३५ निद्रेचा नाश झाला असतां ह्मशीचें दूध ३६ कुष्टास खैराचें नाराचे पाणी ३७ श्वेत कुष्टास बावच्या आणि बोखाडा ३८ अजीर्णास निद्रा व हरितकी आणि उपोषण ३९ ओकारीस लाह्या ४० जत्रूपासून वर जेवढे रोग होतात त्यांस तीक्ष्णौषधांचें नस्य ४१ पार्श्व शूळास पुष्कर मूळ ४२ मुर्च्छा रोगास शीतोपचार ४३ शरीर कृश झालें ह्मणजे मांस रस ४४ मुतखड्यास शिलाजित ४५ मूत बंद झाल्यास कोंवळे मुळ्याचे पाल्याचा रस व सोरा एकत्र करून ४६ गुल्मरोगास वायावर्णाची साल ४७ विद्रधी रोगास रक्तस्राव ४८ उचकीस लाखेचे रसाचें नस्य अथवा नवसागर व चुना व निंबाचा रस एकत्र करून वास द्यावा अथवा १ मासा पाण्याबरोबर पोटांत द्यावें ४९ दाहास शीतविधी ५० भगंदरास कुत्र्याचें हाड गाढवाचे रक्तांत उगाळून शंखपुष्पीचे रसांत मिश्रित करून लावावें ५१ स्वर नीट होण्यास पुष्करमूळ मधांतून द्यावें ५२ शीतास व शैत्यास नागवेल व मिरीं.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## शिमगा हा सण वाईट आहे काय?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. वेद व पुराणें यांच्या संबंधानें तुलना करतांनां पुराणांस शिमग्याची उपमा एका नामांकित गृहस्थानीं देऊन त्यांवर बऱ्या थोर थोर लोकांचे अनुकूल प्रतिकूल असे अभिप्राय इंदुप्रकाश, वऱ्हाडसमाचार, अरुणोदय, सुबोधपत्रिका, नाशिकवृत्त, सूर्योदय इत्यादि पत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत त्यांत कोणीं "ते खरोखरच शिमग्या इतके वाईट आहेत" असें व कोणीं "पुराणें शिमग्या इतकीं वाईट नाहींत असें प्रतिपादन केलेलें आहे; परंतु शिमगा खरोखरच वाईट आहे कीं कसें याविषयीं कोणींच लक्ष दिलें नाहीं ह्मणून या विषयीं दोन शब्द आपणाकडे सादर करितों:—

मला असें वाटतें कीं, आमचे सण अशा पुरुषांचे हातून स्थापित झाले आहेत कीं ते आमचे देशाचे मानानें ईश्वरादत्तच होऊन गेल्या सारखे आहेत. ह्मणजे जयंत्या खेरीज करून बहुतेक सर्व सण पायाशुद्ध योजलेले आहेत. ऋतुमानास अनुसरून आहार विहारादि नित्याच्या व नैनक्रमांत जो फेरफार केला पाहिजे तो आमच्या सण स्थापित करणारांनीं, आयुरारोग्यसंरक्षणार्थ उत्तम प्रकारें या सणांत आणून सोडला आहे. जसें कोजागरी पौर्णिमेला दुग्धपान, दिपवाळीस तैलाभ्यंग, मार्गशीर्षांत धनुर्मास, अक्षयत्रितियेस सत्तु व कलशदान, याचप्रमाणें चातुर्मासांतील नियम धर्माचीही योजना दिसते. यद्यपि या वरील सणापासून सकृद्दर्शनींच जसा फायदा व चांगुलपणा दिसून येतो तसा शिमग्यापासून दिसत नाहीं, तथापि ज्या सुज्ञपुरुषानें ही सणाची योजना इतक्या बारकाईनें विचार करून उत्तमोत्तम केली आहे त्यानें शिमग्याचीही योजना महत्कृत्य साधण्या करितांच केली असेल असें उघड होतें. व याविषयीं विद्वान लोक विच्यारानें समजत असतीलच. दुसरी गोष्ट अशी कीं, सर्व सण चांगले आहेत तेव्हां ते वेद धर्मी पुरुषानें स्थापिले असून शिमगाच तेवढा पौराण मतानें- नागणारा कडून स्थापित झाला कीं काय? सणांची योजना तर सर्व एकाच पुरुषाचे हातून झाली असावी. पत्रविस्तार भयास्तव आतां पुरें करितों. वस्तुतः शिमग्याच्याच बरे वाईटपणाविषयीं दुसरे वेळीं विच्यार करीन. कळावें ता. ५।८।७८ इसवी.

तुमचा दास

रामात्मज.

---

जळगाव ता. ३१ जुलै १८७८ इ.

रा. रा. किरणपत्रकर्ते यांस

चमत्कार— एथें एक शेंदुरणीकर भगवान शिंपी या नावाचा मनुष्य १५ दिवस झाले आला असून तो वीर मंत्र साधनानें हरएक मेवा, मिठाई, फळफळावळ, दूध, गुलाल; कापूर इत्यादि पदार्थ भरसभेंत उघड्या मैदानांत काढून देतो. ह्याच्या करामतीचे कांहीं खेळ एथें झाले. परंतु माझें मत हें सर्व थोतांड असून केवळ हात चलाखी वगैरेने तो लोकांस खरें भासवीत असेल असें असल्यामुळें लोकांचे ह्मणण्यावर माझा भरंवसा न बसून प्रथम झालेले दोन तीन खेळ माझ्या पहाण्याशिवाय गेले. परंतु ता. २५ जुलै रोजीं स्टेशनावर झालेल्या एका खेळास मला पाचारण असल्यावरून मी मुद्दाम खेळ पहावयास गेलों होतों. त्या दिवशीं बहुतेक सरकारी व रेलवेकडील नोकर लोकच असून त्या समाजांत मंत्रावर भरवंसा ठेवणारा क्वचितच. सर्वच चिकित्सक आणि समंजस लोक असून दांभिक मांत्रिकास त्याचे हातचलाखी वगैरे कृतींत पकडावें असाच सर्वांचा हेतु होता परंतु जेथें खरेपणा आहे त्यास भीति व परवा रहात नाहीं. हें खचीत. मंत्रगार भगवान यांचे काम चाललें असतां छळक बुद्धीनें सर्वांचा डोळा त्याजकडे रोखून होता. समाजापैकीं एकानें आपलें उपरणें त्यास नेसावयास देऊन आंगांत एक हाफजाकेट घालविलें. भगवान याचे सांगण्यावरून एक कोरी बुरडी पाटी आणून ती त्याजपुढें उपडी घातली व तिजवर रुमाल बिछावला. नंतर आतां या मंडळींतून माझा खेळ होईपर्यंत कोणी उठून जाऊं नये व दुसरे कोणास या बिछायतीच्या मर्यादेंत येऊं देऊं नये, ह्मणून भगवानानें विनंती केल्याप्रमाणें मंडळीनें तजवीज पूर्ण ठेविली. भगवान यानें उठून १० हातांवरून एक रेषा भुईवरून ओढीत आणून त्या पाटीस भिडविली नंतर कांहीं खडे त्यानें मागितल्यावरून आह्मा तत्पर मंडळीपैकीं एकानें आणून दिले. ते खडे घेऊन सर्वांसमक्ष त्यानें त्या पाटीखालीं घालून पुनः बाहेर काढावे, असें तीन वेळां केल्यानंतर आपला उज-

वा हात पाटी खालीं घालून डाव्या हातानें थोडी वर उचलून ठोकून तोंडानें कांहीं ह्मटलें. मग तत्क्षणींच प्रथम पसाभर स्वच्छ काळ्याभोर निवडक लवंगा काढून भगवानानें समोर आणवून ठेवलेल्या परातींत ठेविल्या. पुढें लागलींच दोन पसा वेलदोडे, नंतर चार पसा वेलदोडे, नंतर चार पसा सोलीव बदाम पुढें ठेवून अनुक्रमानें पिस्ते, खडीसाखर, चारोळ्या, कंदीपेढे असे सात पदार्थ काढून एका पांच मिनिटांत ती थोरली परात निरनिराळ्या मेवामिठाईच्या ढिगानीं गच्च भरून टाकिली. हा सर्व जिन्नस ३ रुपये किमतीचा असल्याचें सर्वांचें अनुमान झालें. हे पदार्थ भगवान काढीत असतां तो प्रत्यक्ष भगवानच समजून सर्वांचे कुतर्क विलयास गेले, व जे ते त्याच्या अलौकिक कृत्याविषयीं थक्क होऊन गेले. असो. पुढें भगवान याचे सांगण्यावरून ती मेवामिठाई सर्वांस वाटून दिली. व सर्वांनीं तिचें आनंदानें सेवन केलें. मंडळी होती ती विशेष खात्रीकरितां सांगतों.

१ पोलिस इन्स्पेक्टर. १ फौजदार. १ पोलिस सुपरिन्टेंडेन्टचे शिरस्तेदार. १ असि० पो. सु० चे शिरस्तेदार. अ. २ पो. सु.चे क्लार्क. २ फौजदाराचे कारकून १ डिस्पेन्सरीचे डाक्टर. १ स्टेशन मास्तर. ६ स्टेशनस्टाफ मंडळी. १ स्कूलमास्तर २ ग्रामस्थ सभ्य गृहस्थ— एकंदर १९.

ही मंडळी असून खेरीज शिपाई, पोर्टर वगैरे लोक होते. बीरमंत्र खरा असल्याची सर्वांची खात्री होऊन मंडळी आश्चर्य करीत घरोघर गेली. याचें नाव मंत्र!!! भगवान याचे आणखी एक दोन खेळ करून त्याची बिदागी वर्गणीनें करण्याचा मंडळीचा विचार आहे.

कळावें. बहुत काय लिहिणें पत्रविस्ताराची माफी असावी व लोभ असावा हे विनंती.

---

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**श्लोक**

पातितस्वशीर्षनयनें विलोकिती ।
भट ते कबंध, हठ वर्णुं तो किती ॥
हाणिती परास दृढबध्धमुष्टिनें ।
करिती परासु, युत होति तुष्टिनें १८९
असें तुमुल युद्ध हें दिवस कांहिं झालें, विभू
अनेक रचिले, चमूपतिस मान देती प्रभू॥
परी न अनुकूल त्या नशिब मानशिंगा, रणीं
ह्मणोनि भट ठाकुर त्यजिति त्यास विराग्रणी
॥ १९० ॥
असति भरवशाचे ठाकुर स्वाप्त तैसे,
त्यजिति परि तया हे भासतें चित्र कैसें ॥
जनक दयित पुत्रा घालवी हो वनांत,
अनृत तरि पहा हें वृत्त रामायणांत! १९१
सेना होतां हीन त्या ठाकुरांनीं,
वेडें केलें मानसिंगा परानीं ॥
सांडी युद्धा, मंदिरामाजि जाय,
चित्तीं भंग तो करी हाय हाय ॥१९२॥

**आर्या.**

हा वीर मान्य ह्मणुनिच
परिभव 'पशुला कसावसा' याला ॥
तापावे मग मुत्युपदीं
यत्न करि न हा कसा बसायाला ॥१९३॥
तेव्हां कांहीं ठाकुर
त्याच्या पक्षा न सोडितां होते ॥
त्यांनीं त्या वांचाविलें
रणभंगें आत्मघात करित्यातें ॥ १९४ ॥
मग जीवपरायण तो
जोतपुराचाचि मार्ग आटोपी ॥
शत्रुहि मागुनि धावे
पुरती घालावया तया टोपी ॥ १९५ ॥
तो मानसिंग जातां
स्वराजधानींत ती रिपुबलानें ॥
घेरोनि यत्न केला
परि तो सत्वर फळे न सुफळानें १९६
षण्मासावधि ऐसें
जोतपुरानें स्वरक्षणचि केलें ॥
तेंही यश जयपूरें
करुनि पराक्रम हरोनियां नेलें ॥१९७॥
जिंकुनि तें पुर लुटिलें
त्या सेनेनें ह्मणोनि पुरवासी ॥
दुःखें आरडती त्या
कोणासहि ऐकवे न कुरवासी ॥ १९८ ॥
दुर्गाहि जिंकूं पाहे
जयपुरपति तो, परंतु तो ओस ॥
देश पडे दुर्गांच्या
सभोंवता रावणाक्षीमित कोस ॥ १९९ ॥

( पुढें चालू. )

---

वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण शुद्ध १४ शके १८००

---

## अकालिक मृत्यू, महामारी आणि वैधव्य.

जगांतील मनुष्यसंख्या कमी करण्यास परमेश्वरानें मृत्यू हें साधन करून ठेविलें आहे तें ठीकच आहे, परंतु तो योग्य काळीं व उत्पत्तीचें कर्तव्यकर्म समाप्त होऊन प्राप्त झाला ह्मणजे चांगलें. जगांत पाप फार होत चाललें ह्मणून, अथवा कलिमहात्म्य ह्मणून पुष्कळ प्राणी आतां अकालीं मरतात असें बहुतलोक ह्मणतात, त्याविषयीं आह्मास कांहीं ठाऊक नाहीं व तें मत आह्मास संमत नाहीं; आह्मी एवढेंच मानितों कीं ही ईश्वरेच्छेची गोष्ट आहे त्याला जें योग्य वाटतें तेंच तो करितो. मग तें दुःखरूप असलें ह्मणजे आपण त्यास पाहिजे ती सबब लावितो. मृत्यूनें मनुष्याच्या जगतांतील सर्व आशा, हेतु, उद्योग आणि शरीर हीं एककालींच नष्ट होतात, त्यांचा मागमूस रहात नाहीं ह्मणून मागें रहाणाऱ्या लोकांस त्याबद्दल दुःख होतें त्यांतून अल्प वयांत व भरतारुण्यांत कोणी मेलें तर त्याजबद्दलच्या शोकास पारावार नाहींसा होतो. पण तेथें कोणाचा काय इलाज! हें ईश्वरीसूत्र आहे, सबब सर्वांनीं सावध राहून त्याची प्रार्थना नित्य करीत असावें व त्यास सर्वांविषयीं शुभ मागत असावें इतकेंच आपलें काम आहे.

मागील एक दोन वर्षें दुष्काळानें कहर करून हजारो मनुष्यांचा संहार केला व या वर्षीं महामारीनें प्रळय उसळवून चोहोंकडचे मनुष्य प्राण्याच्या आहुती घेण्याचें काम सपाट्यानें चालविलें तेणेंकरून गावोगावीं व आळोआळीं शोक पसरला आहे, त्या विषयीं नित्य नवीं नवीं वर्तमानें ऐकून अत्यंत दुःख होतें व जीवास सर्व प्रकारें अस्वस्थता आणि काळजी उत्पन्न होते. आज दोन महिने होत आले इकडे व वाशीम, बुलढाणें, यवतमाळ आणि उमरावती जिल्ह्यांतही महामारीचा उपद्रव झालेला आहे व इलिचपुरासही सुरवात झाली आहे. त्याचप्रमाणें खानदेश, अहमदनगर, पुणें, सातारा, कोलापुर वगैरे ठिकाणींही हा उपद्रव असल्याचीं वर्तमानें येतच आहेत, तेव्हां लोकस्थिति कशी होऊन गेली असेल हें काय पुसावें? कृपाळु परमेश्वरा, आतां दया कर आणि हें तीव्र घातक शस्त्र जें उपसलेंस तें पुन्हा म्यानांत घाल, आणि सर्वांस शांति दे.

या महामारीच्या सपाट्यानें कित्येक घरें अजीबात बसलीं व कित्येक तरुण गृहस्थ व मुलें मरण पावून त्यांच्या अल्पवयी पत्नी विधवा झाल्या हें पाहून तर काळीज करपून जातें. आमच्या घरापासून १० पावलांचे आंत एका घराचा विध्वंस झाला व २५ पावलांचे आंत तीन घरच्या तीन मुली विधवा झाल्या. एकीचें वय १७ वर्षांचें, एकीचें ११ वर्षांचें, व एकीचें केवळ ९ वर्षांचें आहे! अहाहा! केवढा हा दुःखाचा गहजब! व असे अन्यत्र हजारो असतील! बापा परमेश्वरा, निरपराधी व निरुपद्रवी बिच्याऱ्या गाईसारख्या मुलीवर तुझी एवढी करडी कमान कां बरें! मर्जी तुझी! आतां तरी असें नको करू. व हें पसरलेलें दुःखशोकाचें विक्राळ वदन मिटवून टाक.

हे अशा अशा लहान मुलींवर वैधव्याचे प्रसंग पाहूनही पुनर्विवाहप्रवृत्तिविषयीं लोक उदास रहातात ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. इतक्या अल्पवयी मुलींचे तरी पुनर्विवाह होत जावे अशाविषयीं ठिक ठिकाणच्या ब्रह्मवृंदानीं श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्यांस विनंती करून परवानगी मागावी व त्यानीं ती जीवसंरक्षणाचें, व प्रजावृध्धीचें, आणि देशहिताचें परम पुण्य समजून द्यावी असें आह्मी मनापासून इच्छितों. मागें मुंबईस पुनर्विवाहाविषयीं फार मोठा यत्न झालेला शंकराचार्यांच्या प्रतिकूल मतानें केवळ निष्फळ जाऊन नामशेष राहिला आहे. तर त्यानीं तो मार्ग खुला करवून जगतावर कृपा अवश्य करावी यासाठीं आह्मी त्यांस प्रार्थना करून मागणें मागतो व कृपाळु परमेश्वर या गोष्टीस "तथास्तु" ह्मणो असें इच्छितों.

---

## बीरमंत्राचा चमत्कार.

आजच्या आमच्या पत्रव्यवहार सदराखालीं जळगावास एका शेंदुरणीकर मांत्रिकानें बीर मंत्राचे चमत्कार दाखवून नास्तिक ह्मणजे मंत्र खरे न मानणाऱ्या चतुर परीक्षकांची खात्री करून दिली व त्यांची कांहीं कल्पना चालूं न देतां कित्येक पदार्थ केवळ मंत्रसामर्थ्यानेंच काढून दिले, अशाविषयीं सविस्तर लिहिलें आहे तें वाचून पहाण्याची आह्मी आपले वाचकांस शिफारस करितों. तरी आमचा इलाज नाहीं कीं आह्मास व आमच्या कित्येक मित्रांस त्या गोष्टी खऱ्या वाटत नाहींत. ह्मणून "चक्षुर्वैसत्यं" या न्यायाप्रमाणें आह्मी त्यांची परीक्षा समक्ष पाहूं इच्छितों. मुळीं अशा गोष्टी ऐकण्यांत थोड्या येतात, व येतात त्यांत अतिशयोक्ती बरीच असते. आणि कित्येक ढोंगी लोक मंत्राचें निमित्त करून हातचलाखीनें भोळे लोकांस फसवितात असेंही बहुत वेळा उघाडीस आलें आहे ह्मणून याही शेंदुरणीकर मांत्रिकाविषयीं तसें नसेल असें खात्रीशिवाय ह्मणवत नाहीं. हैदराबादकर बीरमंत्री ज्यांच्या ठोकताळ्याविषयीं कित्येक वर्षें अतिशय आख्या पसरली होती व ते केवळ रामबाण मंत्री असें पुष्कळ लोक ह्मणूं लागले होते त्यांची देखील थोडे दिवसांमागें पुण्यास कशी अवस्था झाली ती आमच्या वाचकांनीं ऐकिली असेल! आतां असेंही असण्याचा संभव आहे कीं हैदराबादकरापेक्षांही हे शेंदुरणीकर अधिक छांछू करणारे व अधिक खबरदार असतील, तरी मार्मिक व विद्वान दहा वीस मंडळीपुढें त्यांची ती पदार्थ काढण्याची, मंत्राची नव्हे पण हातचलाखीची युक्ती कशीही कसोटीस लाविली तरी परिस्फूटतेस येणार नाहीं असें आह्मास सहसा वाटत नाहीं. इतक्या उपर मंत्रसामर्थ्याचा प्रभावच असेल व तो या मांत्रिकाचे हातून खरा ठरवून देण्याचें ईश्वरानेंच मनांत आणिलें असेल तर तसें घडून येईल! याजकरितां, साऱ्या देशावर उपकार करण्याकरितां, आपलें मंत्रसामर्थ्य व्यक्त करण्याकरितां मंत्रावर अश्रध्धा ठेवणारे लोकांस पराजित करण्याकरितां, व साऱ्या हिंदुस्थानांत कीर्तीचा झेंडा उभारण्याकरितां या मांत्रिकानीं वऱ्हाडांत यावें. अशी आमची त्यांस शिफारस आहे. आह्मास कळूं लागल्यापासून सुमार आज २५ वर्षें हें मांत्रिकांचें केवळ ढोंग आहे, त्यांत तथ्यांश कांहीं नाहीं, लोकांस फसविण्याचें हें बंड आहे असें आह्मी घोषण करित आलों आहों. व रत्नागिरीस, अहमदनगरास जाहिराती ही दिल्या होत्या कीं देशांत कोठेंही कोणी असा मांत्रिक असेल तर त्यानें येऊन आपले खेळ करून दाखवावे व आमची खात्री करून द्यावी ह्मणजे त्यास आम्ही बक्षीस देऊ. परंतु कोणीही जादुगीर जाज्वल्य मंत्रप्रयोगी आह्मास भेटले नाहींत व एके ठिकाणीं एक दोन भेटले त्यांचा ढोंगधत्तुरा उघाडीस येऊन ते परत गेले सबब या विषयीं खात्री होण्याची आमची उत्कंठा अजून तीव्र आहे. याकरितां आह्मी सदर्हू शेंदुरणीकर बीर मंत्री यांस विनंती करितों कीं त्यांनीं कृपाकरून एथवर एकवार अगत्य यावें आणि आमच्या मंडळीची मंत्राच्या खरेपणाविषयीं खात्री क

रावीं. तसें झालें ह्मणजे आह्मी मंत्राविषयीं उगीच खोटसाळपणाचा संशय ठेवूनें आन २९ वर्षें लोकांस बोध करीत आलों तें आमचें केवळ अज्ञान आहे व तसें करण्यानें आह्मी साऱ्या जगाचा मोठा अपराध केला व ईश्वराच्या एका मोठ्या देणगीची अवहेळणा केली हेंही स्मरून आह्मी अनुतापी होऊं व परमेश्वराची क्षमा मागू. याजकारितां अशा महत्तम तत्वज्ञानप्रसिद्धीची, लोकांस आडमार्गांतून काढण्याची, व [illegible] ईश्वराकडून देणगी जगतांत आहे हें सिद्ध करण्याची [illegible] कोणा अवश्य तजवीज करावी. हे वऱ्हाडाच्या अगदीं नजीकचे रहणारे असून फिरावयास निघून आगगाडीच्या रस्त्यावर अनायासें आलेले आहेत तेव्हां एथपर्यंत येण्याची तसदी घेण्यास त्यांस फारसे श्रम होणार नाहींत, व लोकोपकारार्थ, स्वपराक्रमगौरवार्थ व मंत्रप्रादुर्भावाच्या प्रसिध्यर्थ ते येण्यास अनमान करणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

या मांत्रिकाचें नाव भगवान आहे व त्यानें आमची खात्री केल्यास तो आह्मास प्रत्यक्ष भगवानच भेटला असें आह्मी खरोखर समजू. एथील मंडळीची इच्छा आहे कीं त्यांना वाट खर्च द्यावा व त्यांचे कित्येक खेळ करवून त्यांना चांगली बिदागी द्यावी, त्याप्रमाणेंही घडेलच; व निदानीस आह्मी आपली इच्छा कळवितों कीं आमच्या सर्व शंकांची निवृत्ती करून त्यांनीं मंत्रांची सत्यता आह्मास दाखवून दिल्यास मंडळीकडून त्यांस कांहीं न मिळालें किंवा कमी पडलें तर १०० रुपयांची भरती आह्मी स्वतां त्यांस करून देऊ. आतांही सेवा त्यांच्या गुणास अत्यल्प आहे तरी त्यांनीं सदरीं सांगितलेल्या मोठमोठ्या कारणांकरितां अवश्य पतकरावी असें आह्मी त्यांस पुन्हा सांगतों.

---

**सुरतेचा मुकदमा**— दोन वर्तमानपत्रकर्ते, एक वकील, व आणखी तीन इसम यांवर सुरतेच्या दंग्याच्या संबंधानें तेथील माजिस्त्रेटापुढें एक मुकदमा होऊन सेशन कमिट झाला. ही गोष्ट वाचकांस माहीत असेलच. आमच्या मुकदम्याची चौकशी सुरतेस सेशन जडजापुढें न होतां मुंबईस खुद्द हाय कोर्टापुढें व्हावी असा कैदींनीं अर्ज केला. त्यावरून हाय कोर्टानें त्यांच्या अर्जाचा विच्यार केला. त्या प्रसंगीं सुरतेसच चौकशी झाली पाहिजे या मताचें प्रतिपादन करण्याकरितां सरकार तर्फेंही वकील बारिस्टर वगैरे होते. अर्जदारांचा मुद्दा हा होता कीं सुरतेचे सेशन जडज मि० म्याकाटियर साहेब यांच्या बंगल्यावर दंगखोर लोक गेले होते व साहेब मवसूफ यांस त्यांपासून त्रास झालेला आहे, व त्या दंगखोर लोकांची चौकशी त्यांपुढें होऊन कित्येकांस मोठाल्या शिक्षा झाल्या आहेत सबब त्यांच्याच पुढें आमच्या मुकदम्याची चौकशी होऊं नये. सरकार तर्फेचें ह्मणणें होतें कीं अशा सबबेकरितां जिल्ह्यांतून मुकदमा हाय कोर्टांत नेणें बरोबर नाहीं. हाय कोर्टास योग्य वाटेल तर मि० म्याकटियरसाहेबाशिवाय दुसऱ्या न्यायाधिकाऱ्यापुढें यांची चौकशी व्हावी व पाहिजे असेल तर स्वतंत्र एक जाइंट जडज या चौकशीकरितां नेमावा पण चौकशी सुरतेस व्हावी. दोन्ही पक्षांचें सविस्तर बोलणें ऐकून घेऊन हाय कोर्टानें ठराविलें कीं म्याकाटियर साहेबापुढें चौकशी होणें, व मुंबईस हाय कोर्टानें हा मुकदमा चौकशी करितां आपणापुढें आणविणें बरोबर नाहीं; याजकारितां सरकारानें या मुकदम्याच्या चौकशीकरितां एक जाइंट जडज मुकरार करावा. व सरकारानें ही गोष्ट मंजूर केल्यास मि० पोलन सा. हल्लीं सोलापुरास आहेत त्यांस सुरतेस जाइंट जडज नेमून त्यांकडे या मुकदम्याच्या चौकशीचें काम द्यावें.

आतां मि० पोलन सा. हे सुरतेस या मुकदम्याची चौकशी करितील. हे मोठे निष्पक्षपाती व उत्तम न्यायाधीश आहेत असें ह्मणतात त्यावरून आरोपितास योग्य न्याय मिळेल असा भरवसा आहे. हाय कोर्टा पुढें आपली चौकशी व्हावी असी कैदींची फार उत्कंठा होती पण त्या प्रमाणें घडलें नाहीं.

---

**मि० ज्युई**— रेलवेकडील मुंबईचे कामदार, ज्यांजवर लांचेचा मुकदमा उपस्थित झाला होता व साक्षी पुरावा बरोबर न झाल्यामुळें जे सुटले होते, त्यांनीं आपणास पुन्हा आपली नोकरी द्यावी ह्मणून रेलवे कंपनीस अर्ज केला. तिनें सांगितलें कीं, एवढ्यावरून आमचें समाधान आपले निर्दोषीपणा बद्दल होत नाहीं. त्यावरून ज्युई साहेबांनीं फिर्यादी लखमसी पुंसी याजवर माजिस्त्रेट मि० डोसाभाई फ्रामजी यांजपुढें खोट्या प्रतिज्ञेचा खटला आणिला. त्यांनीं कागदपत्र वाचून पाहून यांत आह्मांस खटला चालविण्याजोगें विशेष कांहीं दिसत नाहीं असें ठरवून त्यास सोडून दिलें. या ठरावावर ज्युई साहेबांनीं हाय कोर्टाकडे अपील केलें, त्यांनीं ठरविलें कीं, अशा मोठ्या कामदाराची अशी अब्रू घेणें फिर्यादीस केवळ अयोग्य आहे सबब त्यावर मुकदमा चालणें अवश्य आहे, त्यावरून ज्युई साहेबानीं माजिस्त्रेट मि० कूपर साहेब यांजपुढें लखमसी पुंसी याजवर फिर्याद आणून त्यास पकडण्यास वारंट मागितलें व तें मिळून तो हजर झाला व दोन हजार रुपयांचा त्यानें जामीन दिला. आतां खटल्याची चौकशी होणें आहे.

लखमसी पुंसी यानें आपले फिर्यादींत असें ही सांगितलें होतें कीं ज्युई साहेब रहात होते तेथें दोघी युरोपियन स्त्रिया रहात होत्या त्यांचे हातीं एकवेळ लांचाचे रुपये दिले व त्यांनीं चिठी देऊन ज्युई साहेबाकडून आपलें काम करविलें- ही गोष्ट खोटी सांगितली अशाबद्दल त्या स्त्रियानींही लखमसी याजवर फौजदारींत फिर्याद केली आहे. आतां परिणाम काय होतो पहावें.

लखमसीच्या या उठाठेवीस काय ह्मणावें? यानें रेलवेकडील लोकांवर केवढें भारूड मानविलें होतें? व जर बिच्याऱ्याजवळ चांगला मजबूद पुरावा नव्हता तर असल्या विकट भानगडींत तो कां पडला? आतां केलें तें निस्तरलें पाहिजे. लखमसी यास पूर्वीं एके प्रकरणांत कांहीं खोटसाळ कामाबद्दल शिक्षा झालेली आहे असेंही ज्युई साहेबानीं प्रतिपादन केलेलें आहे.

---

## वऱ्हाड.

उमरावतीस वऱ्हाडांतील तुरुंगाचे संबंधानें वार्षीक एक कानफरन्स भरत असतें. तें गेले महिन्यांत भरावयाचें होतें परंतु मे० बेल साहेब जुडिशियल कमिशनर यांची प्रकृति अस्वस्थ होऊन ते लवकर परत आल्यामुळें भरलें नाहीं. आतां पुढें भरेल.

---

[illegible] पळून जाण्याचे प्रकार आतांशा वर वर होऊं लागले [illegible] कैदी तुरुंगातून [illegible] गेले आहेत. [illegible] अमरावतीहून नुकतेच तीन कैदी व बुलढाण्याहून ४ कैदी पळाल्याचीं वर्तमानें आलीं आहेत. अकोल्याहून दोनदां कैदी पळाले.

---

हैदराबाद रेसिडेन्सीकडील डाक्टर नानला साहेब विलायतेस रजेवर आहेत त्यांस वऱ्हाडच्या स्यानिटरी कमिशनरची जागा कबूल करिता काय असें विच्यारलें होतें व त्यांनीं ती कबूल केली. आतां या महिन्याचे अखेरीस ते इकडे येतील असें वर्तमान आहे.

---

मि० डनलप साहेब हैदराबादेहून खामगावास येऊन आपले कामावर रुजू झाले. व दस्तुर बाहिमनजी साहेब गुरुवारीं एथें आले.

---

नागपुरापासून रायपुर पर्यंत छोटी रेलवे करण्याचा आज १९ वर्षें विच्यार चालू होता त्यास हिंदुस्थान सरकारचें संमत मिळून सांगशन झालें आहे. आतां लवकर काम सुरू होऊन एक वर्षांत आटपेल असें ह्मणतात.

---

याही आठवड्यांत एक दोन वेळां पर्जन्य चांगला पडून नदीला पूर आले. हवा चांगली आहे.

---

शेट शामलाल ओंकारदास यांच्या खामगावच्या दुकानचे मुनीम आनंदराव लोटे यांचे खिशांतून गेल्या आठवड्यांत १००० रुपयांच्या नोटी हरवल्या होत्या त्या रस्त्यांत एका स्त्रीस सापडून तिनें पोलिसांत दिल्या. त्याकारितां १०० रुपयांचें तिला बक्षीस व श्री नागेश्वरास २९ रु० लोटे मजकूर यानीं दिले.

---

मलकापुरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. पुरुषोत्तम राव नारायण भट यांचे जावई रा. रा. कृष्णाजी सदाशिव मराठे एम. ए. असून एल. एल. बी.च्या परीक्षेकरितां मुंबईस अभ्यासास होते त्यांस ज्वराचे आजारानें गेले आठवड्यांत देवाज्ञा झाली असें दुःखकारक वर्तमान आलें आहे. हे २९ वर्षांच्या वयाचे तरुण गृहस्थ असून मोठे हुशार व स्वभावानें उत्तम होते त्यामुळे त्यांचे मरणानें सर्वांस हळहळ लागली आहे. पुणे मुंबई कडील ९।४ वर्तमानपत्रांत याजबद्दल दुःख प्रदर्शित झालें आहे. व आमच्या पुरुषोत्तम रावजीस अत्यंत शोक झाला असेल. गेल्यां मे महिन्यांत त्यांचा धाकटा मुलगाही मरण पावला. ईश्वरेच्छे पुढें कोणाचा कांहीं इलाज नाहीं.

---

अकोलाजेलमधून पळालेला कैदी जगन्नाथ यास सापडून देणारास ५० रु. चें बक्षीस ठरलें आहे.

---

क्या० बुलक साहेब अकोल्याचे आफिशियेटिंग डिपुटी कमिशनर व मेजर फ्यारर साहेब वाशिमचे आफि. डिपुटी कमिशनर यांस अधिकार मिळाले ते:—

१ क्रिमिनल प्रोसिजरचे ३६वें कलम यांतील अधिकार.

डिस्ट्रिक्ट जडज या नात्यानें कोणत्या [illegible] व कितीही रकमेचे दिवाणी हो प्रकारचे [illegible] च्या १००० रुपये दावे, व सिविल जडज [illegible] प-पर्यंतच्या दिवाणी दाव्यावरील अपिल हाण्याचे अधिकार.

३ क्रि० प्रो० कलम २७ प्रमाणें दुसरे व तिसरे वर्गाचे माजिस्त्रेटाचे शिक्षेवर अपील घेण्याचे व समरी चौकशी करण्याचे अधिकार.

---

मि० निकोलेट्स साहेब असिस्टंट कमिशनर यांनां वऱ्हाडांत रेलवे माजिस्त्रेट नेमिलें. व त्यांना क्रि० प्रो० कलम २२२ यांतील अधिकार दिले.

---

एथील प्राइव्हेट डाक्टर मि० महालिंगं यांस शिगावचे धर्मार्थ दवाखान्यावर तूर्त नेमिलें.

---

सिंबलाईन नावाच्या शेक्सपियरच्या नाटकाचें मराठी भाषांतर इकडील एका विद्वान गृहस्थांनीं करून ज्यास "तारा" असें नाव दिलें आहे, व ज्याचा प्रयोग इचलकरंजीकराकडून एथें करविला, तें मुंबईस नेटिव ओपिनियन छापखान्यांत छापत असल्याची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.

---

बोरगावकर गोसावी गोविंदगीर बाबा याची सासू लक्ष्मीबाई जवजे माधवगीर व तिचे मयत मुलाची बायको भागीरथी जवजे गणपतगीर यांजमध्ये बरेच दिवस वाद उत्पन्न झालेला होता त्याची माहिती नोटिसांवरून आमचे वाचकांस गुदस्त सालीं झालेलीच असेल. पुढें डिपुटी कमिशनर साहेब बहादुर याजकडे बरेंच दिवस यांचा खटला चालू होता व या आठवड्यांत सासूनें मि० लीथ साहेब बारिस्टर आणिलें होते व सुनेकडून रा. रा. सदाशिव नारायण वकील होते. अखेर ठराव झाला कीं दोघीना निमेनिम जिनगी मिळावी व मुलगी अज्ञान आहे तोंपर्यंत तिचा मामा दतगीर गोसावी हा व सासू हे ट्रस्टी असावे.

---

## वर्तमानसार.

कर्नल मेडोज टेलर जे मागें सुरापुराकडे कमिशनर होते ते मरण पावले व त्यांनीं सरकारची बहुत वर्षें उत्तम रीतीनें नोकरी केली हें मनांत आणून स्टेट सेक्रेटरीनीं हिंदुस्थान सरकारच्या शिफारशीवरून त्यांच्या दोघी मुलींस सालीना एक हजार रुपयांची तहाहयात नेमणूक करून दिली.

मि० सतक्लीफ बंगालचे विद्याखात्याचे डायरेक्टर विलायतेस मरण पावले असें तारेंतून वर्तमान आलें आहे.

वैनाद एथील खाणी विषयीं विशेष माहिती मिळविण्या करितां सरकाराने मि० ब्रेग स्मीथ यांस नेमिलें आहे.

ठाण्याचे असिस्टंट जडज मि० ब्याटी यांस अहमदनगरास अॅक्टिंग जडज नेमिलें.

आनरबल ए राजर्स विलायतेस रजेवर आहेत त्यांची रजा स्टेट सेक्रेटरीनीं आणखी १२ महिने वाढविली.

ले. गवरनर यांच्या सुचनेवरून कलकत्ता हायकोर्ते ठराव केला आहे कीं जुडिशियल आफिसरानीं तारेंतून जेल सुपरइंटेंडेंटास हुकूम पाठवून कैदीची मुक्तता करीत जाऊं नये.

मि. टरुवरु मुतुस्वामी ऐय्यंगार एल. एल.बी. सी.एस.आय. यांस मद्रास हायकोर्टाचे जज्ज नेमिलें.

सोलापुर— तारीख १७ रेलवे दगाबाजींतील आरोपी मि. वेडफर्ड मुक्त झाले. पोलिसाकडून साक्षीदारांस यातना सोसाव्या लागल्या व त्यांनीं सांगितलेला मजकूर अगदीं मिथ्या आहे असें असेसरांचें मत आहे. न्यायाधिशानें आरोपी हा निर्दोषी आहे व बाळकृष्ण हणमंतानें खोटी शपथ वाहिली असें ठरविलें. साक्षीदारांच्या जबान्या खोट्या व त्या ते लोक पोलिसाच्या पाहऱ्यांत असतां घेतलेल्या होत व याशिवाय पोलिसाच्या ताब्यांत असलेल्या बुकांत दगाबाजी झाल्याचें दिसतें.

हवेंत उडण्याचें एक यंत्र अमेरिकेंत तयार झालें आहे. हें यंत्र फिलाडेलफिया येथील प्रदर्शनास पाठविल्याचें लिहिलें होतें. या यंत्रास हैड्रोजन वायूचें साधन लागतें. प्रदर्शनसमयीं या यंत्राची परीक्षा झाली. मनुष्यास बरेंच उंच उडतां येतें असें लिहिलें आहे.

गिलक्रिस्त स्कालरशिपची परिक्षा झाली. परिक्षेत एक मुंबईएथील व एक कलकत्ता एथील असे दोन उमेदवार उतरले. मुंबईचे उमेदवार साहेब आहेत. व कलकत्त्याचे नेटिव आहेत.

सन १८५७ सालचे बंडापूर्वी हिंदुस्थानांत गोरे पलटणींत ४५००० लोक व काळे लोक २३०००० होते परंतु हल्लीं ६०००० गोरी फौज असून काळी फौज १२५००० आहे.

अमेरिकेंतील एका प्रवाशानें ७६ दिवसांत तारवांतून पृथ्वी प्रदक्षणा केली.

बडोदें एथें आतिशय पाऊस पडल्यानें शहरांत पाणीच पाणी होऊन गेलें होतें. आतिशय पावसामुळें घरें पडण्याची सुरुवात झाली आहे.

म्हैसुरचे महाराजांचे शिक्षक मि. डब्यू ए. पोर्टर यांचे पत्नीस महाराणीस शिकविण्याकरितां ठेवणार आहेत.

मासाचुसेटस ( अमेरिका ) एथें एक एच. ड्यू. साल्ट नांवाचा गृहस्थ पाण्यावर सुमारें पाव मैल सहा मिनिटांत चालला

काश्मीरचे महाराजांनीं आपल्या राज्यांत बंदुका, तोफा वगैरे करण्याचा कारखाना सुरू केला आहे, पण त्यांत व्हाव्या तशा बंदुका होत नाहींत.

बंगाल इलाख्यांतील मिठावरील जकात प्रयेक मणामागें चार आणे कमी केली.

म्हैसूर प्रांतांत चोहोंकडे पाऊस पडून दुष्काळाची भीति कमी होत चालली आहे. धान्याचे भावाचें मान उतरलें असून लोकस्थितिही कांहींशी बरी आहे.

ने. ओ.

---

## आपले लोकांचें अज्ञान.

अलीकडे वर्तमानपत्रांतून काय, कोठें सभा भरली ह्मणजे तेथें काय, आह्मी नेटिव लोक दयाळू इंग्रज सरकारचे अमलाखालीं आहो, आह्मास विद्यामृताचा अपूर्व लाभ झाला ह्मणून विद्वान झालों, हुशार झालों, तरबेज झालों; असाच नेहेमी पुकारा होत असतो. आतां विद्वान ह्मणजे काय? फक्त लिहितां वाचतां येऊं लागले ह्मणजे झाला कीं काय ? असा मनुष्य विद्वान नव्हे तर विद्वान ह्मणावें कोणास, ज्याचे आंगीं विचार करण्याची शक्ती आली, ईश्वराविषयीं ज्यास पूज्यबुद्धी उत्पन्न झाली, ज्यास खरें कोणचें, खोटें कोणचें, क्षणीक कोणचें, शाश्वत कोणचें, यांचे परिज्ञान झालें, ज्यास आपले या जगतांतील कर्तव्य समजूं लागलें, त्यासच विद्वान ह्मणावें. असे विद्वान आपले लोकांत किती झाले आहेत याचा विचार केला ह्मणजे हे वरील ह्मणणें अगदीं पोकळ, दांभिकपणाचें आहे असें प्रयेक सुज्ञ मनुष्यास वाटूं लागेल. अशा तऱ्हेची विद्वत्ता आंगीं येण्यास नीती, वेदांत, राज्यनीती, अर्थशास्त्र वगैरे गहन विषयांचा अभ्यास होऊन खऱ्या विद्वान लोकांचा सहवास होणें हे साधन आहे. आपले लोक त्यांचा अभ्यास केवळ परीक्षे पुरताच करितात. एकादि परिक्षा पास झाली ह्मणजे मग ते त्या विषयाकडे ढुंकून सुद्धां पहात नाहींत मग त्यांतील मूळतत्वें मनांत बाळगून त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवण्याविषयीं व दुसऱ्यास त्याप्रमाणें करण्याविषयीं तर लांबच राहिलें. आतां या शास्त्राचा अभ्यास करण्यापर्यंत येऊन पोहोचणारे लोक तरी आपल्यामध्यें आहेत किती ? फारच थोडे, आणि जे थोडे बहुत आहेत ते ब्राह्मण वगैरे उंच जातींतील. आपले शेतकरी, कारागीर, व्यापारी उदमी लोकांस व आपले बायकास या गहन विषयांचा गंध तरी आहे काय? व तें साधान करण्याचें त्यांचें अंगीं सामर्थ्य तरी आहे काय? खरें ह्मणजे काय ? खोटें कां बोलूं नये? परोपकार कां करावा ? ईश्वर ह्मणजे काय? व त्याचें स्वरूप काय आहे ? राजा ह्मणजे काय व त्यांचे कर्तव्य काय आहे व त्याचे हक काय आहेत. खाती ह्मणजे काय व ती वाढते कशी, वगैरे गोष्टींची त्यांस मुळींच माहिती नाहीं. आपले लोकांवर जे अज्ञानाचें पटल पसरलें आहे त्याचा अजून भंग सुद्धां झाला नाहीं. त्यांच्या वेड्या वेड्या व भोळवटपणाच्या समजुती नइयाच्या तशाच कायम आहेत. ज्याप्रमाणें आपले लोकांत भोळवट व अज्ञानी लोक आहेत त्याचप्रमाणें आपले लोकांत लबाड, फसविणारे व ढोंगी लोक आहेत. आपले लोकांची पूर्ण सुधारणा होण्यास व त्यांच्या वेड्या वेड्या समजुती जाण्यास कांहीं शतकें अवकाश आहे. इतकी प्रस्तावना पुरी करून आपले लोकांवर एक [illegible] दोन वेडेवेडे समजुतीचा कसा पूर्ण अंमल आहे व त्यांस लबाड व ढोंगी लोक कसे फसवितात याबद्दल आज चार शब्द लिहू.

आपले शेतकरी वगैरे अज्ञान जातींचे लोकांचा व विशेषत: सर्व बायकांचा असा बळकट समज आहे कीं, कांहीं लोकांच्या अंगांत देव येतो आणि मग त्यास सर्व ज्ञान होतें; प्रयेक वाईट गोष्ट कांहीं भुताखेताच्या झपाट्यानें व बाधेनें होते. लहान मुलास ताप आला, खोकला आला, अगर दुसरा एखादा विकार झाला ह्मणजे त्यास सटवाईची बाधा झाली; त्यास कोणी भुतानें झपाटलें; असा त्याचा प्रथम पूर्ण ग्रह होतो आणि त्या वैद्याकडे वगैरे न जातां एकदम पंचाक्षरी, देवरुषी वगैरे लोकांकडे जातात. फार काय, परंतु एखाद्या बाईस कांहीं शारीरीक विकारानें मूल होत नसल्यास तिचा असा ग्रह होतो कीं मला सटवाईच्या ह्मणा, अगर मुंज्याच्या ह्मणा, बाधेनें मूल होत नाहीं. आणि ती देवरुषाच्या घरीं खेपा घालावयास लागते. एखादे मनुष्याचे एथें चोरी झाली तर तो देखील देवरुषाचे एथें चोरी सांपडण्याकरितां व चोर पकडण्याकरितां खेपा घालतो. ह्याहून कांहीं चमत्कार वाटण्यासारखी गोष्ट आहे काय! आहो, तो देवरुषी ह्मणजे साक्षात परमेश्वरच आहे असें त्यांस भासतें. प्रथम भुतें आहेत, खेतें आहेत, सटवाई आहे, हडळ आहे, जखीण आहे, डंखीण आहे, खैस आहे, ब्रह्मराक्षस आहे, मुंजा आहे ह्याजवरच विचारी मनुष्याचा विश्वास बसत नाहीं, मग तेतीं भुतें ती हडळ व तो मुंजा हीं मनुष्यास इजा देतात, त्यास धरतात, त्यास बाधा करितात, व तीं मनुष्याचे अगांत संचार करितात ह्या तर गोष्टीविषयीं विचारच करणें नको. आतां जे देवरुषी पंचाक्षरी लोक तेत्यांजकडे जाणारे भोळ्या लोकांस फसवितात कसें? प्रयक देवरुषी अगर पंचाक्षरी ह्या भोळवट लोकांस असें सांगतो कीं माझे अंगात खंडोबा येतो, कान्होबा येतो, अमूक देव येतो, तमुक येतो, मी अमुक बाईचे अंगांतील काढिलें, तमुक बोवास भुतानें झपाटलें होतें त्यास सोडविलें, मी अमुक बाईस मूल दिलें, मी अमुक मनुष्याची चोरी सांपडून दिली. आपल्या अज्ञान लोकांची या क्षुद्र देवतां विषयीं पूज्यबुद्धी असल्यामुळें त्यांचा त्या गोष्टींवर पूर्ण विश्वास बसतो. कोणी एकादा मनुष्य त्यांकडे गेला ह्मणजे तो देवरुषी व पंचाक्षरी त्यास लिंबे आण, ऊद आण, शेंदुर आण, नारळ आण, शिधा आण, अमुक पैसे आण. तमुक आणे आण, ह्मणून सांगतो. कारण इतके माझे देवास अवश्य पाहिजेच. मनुष्य असतें गरजू, तें त्यास सर्व आणून देतें. मग तो देवरुषी अंगांत आणतो व घुमायास लागतो छां करितो छू करितो, एक लिंबु फोड, इकडे टाक, नारळ फोड, अमुक कर तमुक कर, आणि मग सांगतो या मनुष्यास अमक्या झाडावरील भुतानें त्या खालून अमुक वेळेस जात असतां त्यास पकडलें आहे. अ[illegible] बाईस ति[illegible] आहे तो ह्मणतो कीं तिचा वंश वाढू देणार नाहीं. आणि अशाच भुता खेताच्या लांब लचक गोष्टी सांगतो. मग तें गरजू मनुष्य त्यास विचारितें आतां याला इलाज? मग तो ह्मणतो याला बराच खर्च केला पाहिजे, १ बकरें पाहिजे, २ कोंबडीं पाहिजेत, अमुक कणीक पाहिजे, तमुक सवाष्णी सांगितल्या पाहिजेत शूद्र देवता विषयीं पूज्य बुद्धि असल्यामुळें ह्या सर्व गोष्टीस ते गरजु मनुष्य निमूटपणीं कबूल होतें आणि सर्व जिन्नस त्यास आणून देतें. मग काय त्या देवरुषाची चैन विचारता, आपला तळीराम गार करून घेतो मग त्या मनुष्याचें कांहीं कां होईना. कधी कधी काकतालीय न्याया प्रमाणें कोणास गुण येतो. मग त्या मनुष्या अवळून तो देवरुषी आणखी पैसे काढतो आणि चैन उडवितो. आतां या देवरुषांचें आचरण जर पाहिलें तर अति निंद्य व नीच असतें व तो लोकांस थापा मारून कसा फसवितो हे वरील लेखावरून स्पष्ट होतच आहे. आतां एखाद्या मनुष्याचें काम होत नाहीं असें झालें ह्मणजे मग तो देवरुषी त्यास ह्मणतो बाबारे तुझ्या नशीबीच नाहीं होणार कोठून? काय हो ही लुच्चेगिरी ! नशीबी आहे तेंच जर होणार तर हे देवरुषी पंचाक्षरी पाहिजेत कशास?

एकंदरीनें पहातां हे पंचाक्षरी लोक हव्या तशा थापा मारून आपले लोकांस फसवितात. आतां आपले लोक त्यांजवर फौजदारी वगैरे करीत नाहींत, कारण पिनल कोडांतील ४१७ कलम अशा लोकांचें पारिपात्य करण्या करितां हातांत तरवार घेऊन उभें आहेच. अहो आपले अज्ञानी लोकांचे मनांत तरी गोष्ट येईल काय कीं, देवावर फौजदारी करावी? आणि त्यास त्याचे आप्तवर्ग तरी असे करण्या विषयीं सल्ला देतील काय? तर अशा लबाड लोकांकडे सरकारानेंच आपली नजर पोंचविली पाहिजे आणि जे जुवेवाले वगैरे लुच्चे लोकांचा समूळ नाश करण्या करितां सरकारचे पोलिस अमलदार झटत आहेत त्याचप्रमाणें त्यांनीं ह्या लबाड लोकांकडे आपली पूर्ण नजर पोंचवून त्यांस योग्य शासन करावें. सरकारानें या अति निंद्य कृत्याकडे नजर पोचविल्या शिवाय या देवरुषांचें बंड मोडणार नाहीं.

किरण.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ — अकोला, रविवार ता० १८ माहे आगष्ट सन १८७८ इसवी. — अंक ३३

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| टांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| महामारी वरील गोळी | ०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |

सदर्हू किंमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## महामारी.

**तिचीं कारणें, निवारण व औषधोपचार**

सर्वांच्या उपयोगी पडण्या जोगा ग्रंथ छापत आहे. आगष्ट १८७८ अखेर अगाऊ पाठविल्यास किंमत चार आणे, मागाहून सहा आणे व टपाल हशील शिवाय पडेल. पत्ता व किंमत खालीं सही करणाराकडे पाठवावी. ग्रंथ आगष्ट अखेर तयार होईल.

मु. मिरज ता. २९ जुलै १८७८ इ०

त्रिंबक सखाराम एल् एम

मेडिकल आफिसर

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मूर्तिजापुर ता. ११ | ८ | ७८

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि० वि० वऱ्हाड प्रांतांत पर्जन्यानें पुष्कळ गर्दी केली. आज एक महिना होऊं न गेला उघाडी अगदी नाहीं. शेतकीचे कामीं पेरण्या होऊन धान्यें उत्तम आहेत. मूर्तिजापुरापासून कारंजें २० मैल लांब असून त्या मार्गांत सरकारांतून सडक जहाली आहे. परंतु सडकेवर अतिशय चिखल झाला आहे. येणारे जाणारे लोकांस अतिशय त्रास होतो. रिपेरीचें काम हल्लीं चालू असोन मुरूम थोडा थोडा पडत असल्यामुळें सर्व मुरूम चिखलांत जाऊन दुरुस्ती चांगली होत नसल्यामुळें लोकांस हाल सोसावे लागतात. शिवाय मूर्तिजापुरापासून कारंजापावेतों दररोज येणारे जाणारे लोक फार. दरम्यान वस्तीस सडकेनजीक हादगाव, उंबरी व खेरडें बुजरुख हीं गावें असून मूर्तिजापुरापासून खेरडें १२ मैल व कारंजापासून ८ मैल असल्यामुळें जाणारे येणारे लोक हमेशा खेरडें प्रगणे कामरगाव या गावीं वस्तीस रहातात. परंतु सडकेपासून ५०० कदम दूर खेरडें गाव असून मार्गांत अतिशय चिखल व मध्यें नाला आणि सिंदीवन असल्यामुळें रात्रीं गावांत येण्याची अगदी गैरसोय आहे. नाला गावानजीक असल्यामुळें दोन्ही बाजूस कांटे फार असे अनेक प्रकारें लोकांचे हाल होतात. गावांत आल्यावर रहाण्यास एक चावडी आहे ती अगदी लहान असल्यानें रहदारी लोकांस जागा सुध्दां मिळत नाहीं. याकरितां या ठिकाणीं सरकारांतून धर्मशाळा व तेथून सडकेपावेतों चांगला रस्ता झाला असतां जाणारे येणारे लोकांस हाल भोगावे लागणार नाहींत. इंजिनियर खात्यांतून सडकेची रिपेरी हल्लीं चालू आहे. परंतु खेरडें या गावची स्थिति व लोकांचे हाल किती होतात हें इंजिनियर खात्यांतील कामगार दिलांत आणित नाहींत यासाठीं आपण कृपा करून पत्रांत हा मजकूर दाखल करावा म्हणजे मुख्य अधिकारी यानकडे दाद लागल्यास लागेल. कळावें हे विनंती.

एक रहदारांचा कनवाळू.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि मी हल्लीं मंगरूळ तालुक्यांतील धामणी परगण्यांत उदरनिर्वाह करीत असतो. ह्याच परगण्यांत विझोरी म्हणून एक लहानसें खेडें आहे. तेथील चौकीदार तहशिलदाराचा टप्पा घेऊन जात असतां धामणीचे चावडींत विश्रांती करितां अमळ बसला. तेथें मी व गावांतील कांहीं सभ्य गृहस्थ करमणुकीच्या गोष्टी बोलत बसलों होतों. तेव्हां त्या चौकीदारानें आम्हांस हा पुढील चमत्कार सांगितला. एक महिन्यापूर्वी एक साप कढणारा गारुडी आमचे येथें आला होता. तो पैसे घेऊन कोणाच्या घरांत साप असल्यास काढून देई. एथील एका सोनारानें त्यास एक रुपया देऊं करून साप काढण्यास सांगितलें. त्यानें कराराप्रमाणें साप काढल्यावर सोनार त्यास रुपया देईना. तेव्हां उभयतांचा मोठा तंटा झाला. तंट्यामुळें घरांतील सर्व माणसें बाहेर आलीं. तेव्हां त्या गारुड्यानें एका मुलास घरांतील सर्व मनुष्यांची नांवें विचारून घेतलीं. नंतर रुपयाविषयीं निराश होऊन तो गारुडी तेथून निघून गेला. जातांना तो इतकें मात्र म्हणाला कीं " बरें आहे पाहून घेईन." तो गावांतून निघून गेल्यावर सुमारें पंध्रा दिवसांनीं त्या सोनाराच्या तेरा वर्षांचे सुनेस तिच्याकडे मोठमोठालीं हडकें येतांना दृष्टीस पडूं लागलीं. तिनें " हें पहा हाडूक आलें " असें म्हणून हातांतलें हाडूक खालीं ठेवावें. " पत्रकर्ते महाराज आपणास माहित आहेच कीं, वऱ्हाडांत कोणाही मनुष्यास हडकाचा स्पर्श झाला कीं, त्यास जातीबाहेर टाकितात. व त्यास प्रायश्चित्त दिलें तरच तो शुद्ध होतो " त्या चाली प्रमाणें त्या सोनारानें आपल्या सुनेस तीन चार वेळां शुद्ध केलें. परंतु पुढें ती जेथें बसे तेथें तिच्या हातांत हडकें येऊं लागलीं. तेव्हां त्या सोनारानें तीस एका खोलींत वेगळें बसविलें होतें व तिला दुरून अन्नपाणी देत होता. हिला कांहीं तरी पिशाचबाधा झाली आहे व तें पिशाच तिला छळीत आहे असें समजून पुष्कळ पंचाक्षऱ्याकडून तिची बाधा दूर करण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु कांहीं कमीपणा न होतां उलट्या तिच्या गळ्यांत हडकांच्या माळा येऊन पडूं लागल्या. पुढें कुर्पटें म्हणून पांच कोसांवर एक गांव आहे तेथील जादु जाणणाऱ्या लव्हारास तीस दाखविलें. त्यानें कांहीं मंत्राचा प्रयोग केला. व त्या सोनारास मुलीला लौकर बरी करितों असें सांगून दोन दिवस रहावयास सांगितलें; व तो आपले कपाशीचे वाडांत गेला आणि पाहतो तों आपल्या बायकोचे पाय व हात गच्च चिकटले आहेत व तीस तें दुःख न सहन होऊन ती ओरडत आहे असें त्यानें पाहिलें. मग काय विचारता महाराज? लागलीच त्यानें त्या सोनारास " माझ्यानें कांहीं इलाज होत नाहीं " असें सांगून जाण्यास परवानगी दिली. पुढें तो सोनार कारंजाहून तीन कोसांवर एका खेड्यास गेला तेथील फकीरास दाखविण्यास घेऊन गेला त्या फकिरानें तीस पाहिलें व मंत्र म्हणणार इतक्यांत डुकराचें मुंडक्यासह हडकाची माळ तिचे गळ्यांत पडली हें पहातांच त्यानें त्या सोनारास जाण्यास सांगितलें. गरीब बिचारा नाइलाज होऊन परत आला. हा चमत्कार पहाण्यास आम्ही जातीनें गेलों होतों व गांवे गांवचे लोक पहाण्यास येत होते. हडकाच्या माळा गळ्यांत पडतांना आम्ही पाहिल्या. माळ पडल्या बरोबर ती आम्ही काढण्यास सांगितली. ती काढल्यावर दोन मिनिटांनीं दुसरी पुन्हा पडली. तेव्हां ही कोण विद्या असेल ती नकळे. हल्लीं त्या मुलीस तिच्या बापानें कांहीं उपाय करण्या करितां माहेरीं नेलें आहे. त्यामुळें पुढील हकीकत कळण्यांत आली नाहीं.

इकडे आज आठ दिवस झाले पावसाची झड लागली आहे. पिकें अगदीं बुडालीं असें म्हणण्यास हरकत नाहीं कारण शेतांत पाणी टोंगळ्या इतकें असल्यामुळें पेरलेल्या धान्यांतील गवत बिलकूल उपटलें जात नाहीं, आतां मेघराज कांहीं दिवसपर्यंत ह्या गावीं दया करतील तर बरें. गावांत चिखल अतोनात आहे व ठिकाठिकाणीं पाणी साचतें ही गोष्ट हल्लींच्या दिवसास बाधक आहे. सरकारचा स्वछते विषयीं इतका कडक हुकूम असतां एथील पाटील या गोष्टीकडे दुर्लक्ष करतात हें आश्चर्य आहे. इकडे हल्लीं हवेचा उपद्रव कमी होत चालला आहे. कळावें. ता० १२ आगष्ट सन १८७८ इसवी,

आपला

धामणीकर

---

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आर्या.

युद्धारिष्टें झाला
दुष्काळ प्राप्त त्या प्रदेशाला ॥
यास्तव जयपुरसेना
जाऊं पाहे तदा स्वदेशाला ॥ २०० ॥
सोन्याचा धूर जया
पत्तननि संतत अदृश्य करित असे ॥
त्या नगरीं दुष्काळें
न इंधनाचाहि धूर लेश दिसे ॥ २०१ ॥
श्रीमंतांचींहि मुखें
प्रदीप्तजठराग्नि जाहलीं, परि त्या ॥
अग्निस आहुति न मिळे
पडल्या ऐशा समस्त वास्तुरिया ॥२०२॥
दुसरा शब्द न तेथें,
प्रकट असे अन्न अन्न हा एक ॥
त्या दुष्काळानगरें
गिळिले बहुत क्षुधार्तजनभक ॥ २०३ ॥
गरगर फिरविति डोळे
व्याकुळ होतीं क्षणोक्षणीं बाळें ॥
त्यांतें पाहुनि माता
मूर्छित होती, अशी दशा काळें २०४
शोकें विलपति माता
काय करावें उदंड आयू हें ॥
आम्हा मनुजत्व दिलें
दुष्कर्माच्याचि दुर्गें व्यूहें ॥ २०५ ॥
या शिशुदुःखाप्रतें
सह घेऊनि मृत्यूच्या पदीं जावें ॥
तरि तो तियेंहि जाळिल,
कोणा या संकटीं विचारावें ॥ २०६ ॥
सर्वांही दुःखांचा
अंत मरण हें असें जरी विदित ॥
तरि या योगें नाशन
शिशुदुःखाचें अशक्य आणि अहित
॥ २०७ ॥
तरि आतां मृत्युपदा
अर्पावें लेकरांसहाच काय ॥
हाचि बरा यासमयीं

अनेकशा शोधिले नरि उपाय ॥२०८॥
हे दुर्विचार, तरि त्यां
सुविचारचि भासले तये वेळीं ।!
दुष्काळ ह्मणा व्याघ्रचि,
त्या गवसे तो प्रदेश ती शेळी ॥२०९॥
यापरि अनेक दुःखें
बोलावीं तीं कशीं नये धीर ॥
परदुःखा संतोषें
साहे दुर्लभ असा महावीर ॥ २१० ॥
राहो हें, मग तेथें
धरील जयपुरपती टिकाव कसा ॥
जो त्या दुर्गा ध्याया
टपत बसे तिमिवरा सरीं बकसा २११
धीर निंघना यास्तव
लुटिनें जें लाभलें अमित धन तें ॥
रक्षक सेना योजुनि
देशीं तो पाठवी स्वसचिवमतें ॥ २१२ ॥
परि तें सुखद न झालें
हिरावुनी ठाकुराख्य लोकांनीं ॥
मार्गांतचि नेलें कीं
न ऐकवे त्यांस शत्रुजय कानीं ॥ २१३ ॥
जे ठाकुर संग्रामीं
गेले टाकोनि मानाशिंगातें ॥
पुच्छीं दिल्या पदातें
अहिसे ते साहती न भंगातें ॥ २१४ ॥
ते राजावरि विटले
परि शौर्याचा अणि स्वदेशाचा ॥
अभिमान त्यांस चिथवी
जरि नाहीं लोभ मानवेशाचा ॥ २१५ ॥
ते चिडले कीं आह्मा
राहाटोरांचि कच्छवाहानीं ॥
लूट करावी याहुनि
मानाची कोणती दुजी हानी ॥ २१६ ॥
या अभिमानें त्यांनीं
सर्व हिरावूनि घेतली लूट ॥
जयपुरच्या वीरांची
उघडालि तेंव्हांचि झांकली मूठ ॥२१७॥
तो नाश ऐकुनि जगत्-
शिंग करी तो अपार खेदास ॥
चित्तीं ह्मणे कुदैवें
मज निष्फळ जाहले सखे दास ॥२१८॥
दैव फिरतां क्षणांतचि
होय विलक्षण दशा कशी मौज ! ॥
मी काल विजयि आजचि
पराजयी नाहिं काय ती फौज! ॥२१९॥
( पुढें चालू. )

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति श्रावण वद्य ९ शके १८००

---

## पर्जन्य, पिकें व शेतकरी.

शेतकरी लोक अतिशय श्रम करून शेतकीपासून धान्यादिक उत्पन्नकरतात परंतु तेफक्त श्रम कण्याचेच धनी. उत्पन्न हातीं येऊ देण्याची करणी ईश्वराधीन आहे. कारण त्यांचें उत्पन्न पर्जन्याचे न्यूनाधिकपणावर सदैव अवलंबून रहातें. पिकास हितावह अशी योग्य वृष्टी होऊन गवत काढी काढण्यास अवकाश सापडला पाहिजे. व तें वेळच्या वेळीं सफा झालें पाहिजे. यांत जर थोडें अंतर पडलें तर श्रमापटी श्रम जाऊन जवळ असलेलें बीं सुध्धां मातीशी मिळून जातें.

अलिकडे पांच चार वर्षांत मुळींच पर्जन्यवृष्टि कमी होऊन देशावरावर मोठमोठे दुष्काळ पडून गहजब झाला व जिकडे तिकडे दुर्भिक्ष्य पसरलें. आतां ईश्वरकृपेनें वऱ्हाडांत मात्र गतवर्षींसुद्धां थोडा तर खराच पण तो पाऊस योग्य वेळीं पडल्यानें पिकें चांगलीं आलीं. तरी इतर देशावरच्या दुष्काळानें सर्व सालांत महागाई एथेंही राहिलीच.

या वर्षीं आरंभीं सगळे मृग व अर्ध्या आर्द्रा या नक्षत्रांनीं तर बरेंच घाबरून दिलें होतें व त्यांत कांहीं ज्योतिष शास्त्रवेत्त्यांनीं चालू स्थितीस अनुलक्षून कांहीं भयंकर भविष्येंहीं कथन केलीं होतीं तेणेंकरून शेतकऱ्यांचें तोंडचें पाणी नाहींसें होऊन सर्व लोक हवालदील झाले होते; पण पुनर्वसु. पुष्य व आश्लेषा यांणीं विपुल पर्जन्यवृष्टी करून जिकडे तिकडे तर करून सोडलें, कपाशी जवारी यांच्या पेरण्या झाल्या व पिकें मोठ्या जोमावर येऊलागलीं. पण लिहावयास दुःख वाटतें कीं सुमार एक महिना झाला तों मेघअवडंबर निशिदिनीं एकसारखें असून वृष्टि सुरू आहे. मधून मधून घटकाप्रहर जरी उघाडी होते तरी सूर्यकिरण बिलकूल दृष्टीस पडत नाहींत. मुरूम व रेती टाकून उत्तम प्रकारच्या केलेल्या सडकांवरूनही सर्व चिखलच चिखल दृष्टीस पडतो. मग नांगरून वखरून मोकळ्या केलेल्या जमीनींची काय अवस्था असेल याची कल्पना आमचे वाचक सहज करूं शकतील. पाण्याच्या विपूलतेनें ज्वारीचीं पिकें पिवळीं पडलीं व कित्येक कुजूं लागलीं, शेतांत पाय देतां येत नसल्याकारणानें त्यांतील गवत पिकापेक्षांही उंच वाढूं लागलें आहे. व पिकाचें नुकसान करीत आहे. हें इतकें जरी नुकसान नजरेसमूर होत आहे तरी तें न होऊं देण्याला उपाय काय ? सुमार दीड महिन्यापूर्वीं सर्वजणाचे डोळे चातक पक्षाप्रमाणे एकसारखे आकाशाकडे लागले होते. व पर्जन्य पडावा ह्मणून ईश्वराची करुणा भाकित होते. ह्मणून ईश्वर केवळ धारच धरून बसला असेल कीं काय न कळे ! तसें असल्यास निरुपाय आहे, आतां तरी दयार्द्र होऊन महिना पंध्रा दिवस उघाडी द्यावी व शेतकीचें निंदन वगैरे किस्तगारी होऊं द्यावी. तरच खरीपाचें पीक कायम राहून शेतकरी लोकांस हितावह होईल नाहींपेक्षां हल्लींच कित्येक शेतें पीक नाहींसे होऊन काळीं पडलीं आहेत आणि असाच पाऊस आठ पंध्रा दिवस येत राहिला तर एकंदर खरीपास धक्का बसेल ह्मणून परमेश्वरानें तूर्त कृपा करावी व प्रसंगीं सहाय्य करावें ह्मणून त्याचीच विनवणी करून हा लेख पुरा करितों.

---

## गारुड्याची जादू.

आजचेही अंकांत एक पत्र जादूगिरीच्या चमत्काराचें धामणीहून आलेलें छापलें. हा प्रकार शेंदुरणीकर बीरमंत्र्याच्या कृतीपेक्षां वेगळ्या तऱ्हेचा आहे तरी मांत्रीक प्रभावांतच गणिला जावयाचा ह्मणून याच्याही खरेपणाविषयीं आह्मांस संशय आहे. सोनारानें गारुड्यास देऊं केलेला रुपया दिला नाहीं. ह्मणून तो रागानें त्यास " पाहून घेईन " असें ह्मणाला व त्याचा परिणाम, सोनाराच्या सुनेला हा रुके दिसूं लागलीं व हाडकांच्या माळा डुकराच्या डोक्यासहीत तिच्या गळ्यांत येऊन पडल्या, हा झाला व कोणा मांत्रिकाचा त्यावर इलाज चालला नाहीं. या भोळसट गोष्टीचें आह्मांस फार- आश्चर्य वाटतें. आतां या गोष्टीविषयीं आह्मी अधिक लिहित नाहीं, पण धामणीकर मित्रास शिफारस करितों कीं, त्यांनीं ज्याच्या सुनेच्या गळ्यांत हाडकाच्या माळा आपोआप येऊन पडतात त्या सोनारास सुनेसह अकोल्यास त्वरित जाऊन आह्मांस भेटण्याविषयीं सांगावें. आमची खात्री आहे कीं, त्या बाईच्या गळ्यांत आह्मी आपल्या समक्ष तसल्या घाणेरड्या माळा कधीं पडूं देणार नाहीं व तितक्या पुरती त्या गारुड्याची पुंगी बंद करूं व गारुड्यानेंही पाहिजे तर अकोल्यास समक्ष यावें असें आमचें व आमच्या शोधक मित्र मंडळीचें ह्मणणें आहे.

शेंदुरणीकर भगवान बीरमंत्री यास आह्मी आपला गेल्या आठवड्याचा अंक पहाण्यास जळगावास पाठविला व तो तेथें कदाचित हल्लीं नसेल तर जेथें असेल तेथें त्यास हें आमचें मत कळवावें व त्यास पाठवून द्यावें ह्मणून जळगावच्या एका संभावित गृहस्थांस आह्मी पत्रही पाठविलें आहे पण कालच्या डाकेपर्यंत तिकडील खुलासा आह्मांस कांहींच कळला नाहीं. असो. या आठवड्यांत हें विंझुरी एथील सोनाराच्या सुनेचें गारुड उद्भवलें आहे. व यांतही मंत्राचा खरे खोटेपणा चांगला व्यक्त होणार आहे सबब हे सोनार गृहस्थ कृपाकरून सुनेसहीत येथें येतील व त्यांस पाठविण्याचा आमचे धामणीकर मित्र खटपट करितील तर आह्मांस फार संतोष होईल. शेंदुरणीकर मंत्र्यास बक्षीस कबूल केलें होतें तसें सोनारास नको, कारण त्याच्या घरचें मनुष्य पीडाग्रस्त झालें आहे त्या पीडेचें निवारण होऊन तो निष्काळजी झाला ह्मणजे त्यास मोठेंच बक्षीस मिळालें असें सहजी होणार आहे; याजकरितां हा तरी योग येऊन प्रेक्षक मित्र मंडळीच्या समोर हा मंत्ररूप भ्रमाचा भोपळा एकदा फुटावा असें आह्मी सोत्कंठ इच्छितों.

---

## गवरनरास वारंट मागणारा.

दुनियेंत नानाप्रकारचे विचित्र पुरुष आहेत त्यांच्या कृति ऐकिल्या ह्मणजे कधीं कधीं पोट धरधरून हसावें आणि स्वस्थ बसावें दुसरा कांहीं इलाज नाहीं. असाच प्रकार मुंबईस एका भाम्यानें हायकोर्टाचे चीफजस्टीस साहेबांजवळ गवरनर साहेबांस वारंट मागण्याच्या योगें केला. तो चमत्कारिक प्रकार आह्मी थोडक्यांत वाचकांस कळवितों.

गोवर्धनदास रावजी मोतीवाला नावाचा एक व्यापारी ह्मणविणारा झळक फळक कपडे करून हायकोर्टापुढें गेला आणि सर रिचर्ड टेंपल साहेब यांस पकडण्यास वारंट द्या असें ह्मणाला. चीफ जस्टीस ह्मणालि, कारण काय? त्यानें कांहीं बरोबर सांगितलें नाहीं; तेव्हां वारंट मिळणार नाहीं असें ते ह्मणाले. त्यावर तो ह्मणाला माजिस्त्रेटाकडे याच कामासाठीं मी गेलों होतों त्यांनीं माझी दाद घेतली नाहीं याजकरिता त्यांनां तरी हें माझें काम करण्याचा हुकूम हायकोर्टानें द्यावा. तेंही त्याचें ह्मणणें चीफजस्टीस साहेबांनीं ऐकिलें नाहीं तेव्हां तो तोंडानें कांहीं पुटपुटत तसाच निघून गेला. त्यावर ३।४ दिवसांनीं तो पुन्हा हायकोर्टांत एक मराठी मोठा थोरला अर्ज घेऊन गेला तो अर्ज एका मोठ्या पाकेटांत असून त्यावर तीन चार शिक्के मारलेले होते. त्याचें भाषांतर झाल्यावर तें पाहून चीफ जस्टीस ह्मणाले आह्मी तुमचा अर्ज पाहिला. एक प्रामाणिक मनुष्य व्यापारी आहे त्याजवर फिर्याद करण्याकरितां तुह्माला नादारी वकिलाची गरज आहे. तुह्मी पहिल्यानें त्याला हिंदु नाव दिलें, मग लिहिलें कीं इराणी अखातांत तो व्यापार करीत आहे त्याचें नाव शेख आहे. तुह्माला तो वकील मिळणार नाहीं, कारण त्याला सरकारानें हल्लीं कमी केलें आहे. शिवाय तुमचा अर्ज इतका घोटाळ्याचा आहे कीं त्यांतून कोणत्या एका गोष्टीचा कांहीं स्पष्ट उमज पडत नाहीं. याहीं अर्जांत तुह्मी गवरनर साहेबांवर समन्स मागता, पण त्याचें कारण कांहीं लिहित नाहीं. याजकरितां तुमच्या अर्जाचा कांहीं विचार होत नाहीं. तुह्माला मुंबईंत कोणी आप्त आहेत काय ?

अर्जदार— होय. दोघे भाऊ आहेत.

चीफ जस्टिस—ते काय करीत असतात.

अर्ज०— नोकऱ्या करून आहेत.

ची.ज.— आणखी कोणी आप्त आहेत?

अर्ज०—होय.

ची० ज०— ते कोण ?

अर्जदार—दूरदूरचे दहा पांच आप्त आहेत

ची० ज०—ते भले गृहस्थ आहेत ?

अर्ज०—होय.

ची० ज०—तर मग तुह्मी एकादा अर्ज करीत जाल तेव्हां त्यांची सल्ला घेत जा,

अर्ज० ते हुशार नाहींत. त्यांनां असलीं कामें कांहीं समजत नाहींत ते अजाण आहेत.

ची. ज.—तुह्मी जावें आणि आपल्या इष्ट मित्रांत रहावें व कोर्टांत येऊं नये हें बरें. त्यांतून विशेष ज्याला तुह्मी प्रामाणिक मनुष्य ह्मणता त्यावर फिर्याद करण्यास तरी तुह्मी येऊं नये.

याप्रमाणें त्यास समज देऊन चीफ जस्टिस साहेब उठले. तरी आणखी कांहीं वेळ तो तेथेंच होता. व कांहीं बडबडत होता. त्याच्या मनांत गवरनर साहेबांवर वारंट मिळावें असें फार होतें; कारण त्यानें

कित्येक अर्ज केले असतां ते याला नोकरीची कांहीं सोय लावून देत नाहींत !

काय चमत्कार आहे!

---

**टिकिटा गहाळ—** टपालांतून येणारीं कांहीं पाकिटें चोरीस जातात असा बोभाट आमचे कानावर आला आहे. बाशीमचे वकील रा. रा. शेषराव रघुनाथ यांनीं महामारीच्या गोळ्या खरेदीकरितां एक रुपयाच्या टिकिटा पाठविल्या होत्या असें आह्मांस लिहिलें आहे तें पाकिट पोहोंचलें नाहीं. व रिसवडचे पोस्टमास्तर रा. रा. नरहर व्यंकटेश यांनीं वैद्यप्रकाश वगैरे बुकां करितां २८।१ चीं टिकिटें आह्मास पाठविलीं होतीं असें ते लिहितात तें पाकिटही पोंचलें नाहीं. व थोडे दिवसांमागें अकोट तालुक्यांतूनहा रा. रा. नारायण गोपाळ बहेरे यांनीं पुस्तकाकारितां २८१३ चीं टिकिटें पाठविलीं होतीं ह्मणून कळविलें तींही आह्मांस पोंचलीं नाहींत. याप्रमाणें थोड्या दिवसाच्या अंतरांत टिकिटा असलेलीं पाकिटें चोरीस गेलीं ही गोष्ट खरी असेल तर टपालखात्यास मोठी दूषणाई आहे असें आह्मी ह्मणतों. व अशीं टिकिटें पाठविणारांनीं तीं पाकिटें रजिस्टर केलीं नसतील तर ती चूक केली असें ह्मणतों. कारण वारंवार असे बोभाटे होत असतात; द्रव्य पाहिल्यावर आणि ते बिनबंदोबस्तांत असल्यावर त्याविषयीं मोह न पडावा व तें पाकिट आपल्या आंगरख्याच्या पाकिटांत न घालावें एवढी नीति टपालखात्यांत कामें करणाऱ्या थोड्या पगाराच्या सर्वच शिपाई लोकांस कोठून असणार? मोरोपंतांनीं ह्मटलें आहे कीं

आर्या

मोठा लोभ मनुष्या,
कलिरायाच्या युगांत कनकाचा॥
तैसा दारधनाचा,
बंधूचाहि न तसा न भगिनीचा॥१।

याकरितां सर्वांनीं अगाऊ बंदोबस्त राखावा हें फार चांगलें. तरी आह्मी इच्छितों कीं, आमचे टपालखात्याचे मुख्याधिकारी यांनीं या प्रकरणांचा बारकाईनें शोध लावून चोर पकडावे. तसे झाल्यास त्यांची ख्याती होऊन त्यांस मोठें भूषण होईल. टपाल आफिसांत पाकिटें येण्या पूर्वी मध्येच कोणीं धूर्तांनीं तीं लुबाडलीं असतील तर टपालखात्याचें उगीच बदनाम व्हावें हें बरोबर नाहीं सबब दप्तरचे लेख वगैरे पाहून पोस्टाकडील मुख्याधिकाऱ्यांनीं या गोष्टीचा खुलासा करून घ्यावा हें चांगलें.

---

**लढाईचा इतिहास—** रशिया व तुर्कस्थान यामधील लढाईचा व इतिहास निर्बंधसार हीं पुस्तकें त्यांच्या कर्त्यांकडून आह्मांस या आठवड्यांत नजर आलीं आहेत तीं अत्यादरें स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. त्याविषयीं पुढील अंकांत लिहू.

---

## वऱ्हाड.

या आठवड्यांत पाऊस इतका पुष्कळ व सपाट्याचा झाला कीं तो आतां नको आहे ह्मणोन लोक प्रार्थना करूं लागले आहेत. खरेच कित्येक शेतांतील पिकास या पावसानें इजा झाली व अजूनही उघडणार नाहीं तर केवळ नाश होईल.

---

महामारीचा उपद्रव कमी झाला आहे. राजेश्वर, नागेश्वर, व मारुती एथें अभिषेकास ब्राह्मण बसले होते त्यांचे अकरा दिवसांत महारुद्र पुरे होऊन सांगतेसाठीं मोठमोठालीं ब्राह्मणभोजनें झालीं. आतां थोड थोडा उपद्रव अजून आहे तो परमेश्वर अगदी नाहींसा करो.

---

अकोल्यास गाड्यावर बसविण्याचा कर व मेहेतरपट्टीचा नवीन कर जनरल कमिटीपुढें पास होऊन सांगशनाकरितां ते पुढें जाण्याचा ठराव झाला.

---

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर सेशनाकरितां शुक्रवारीं बुलढाण्यास गेले.

---

एथें शहरांत रस्त्यावरून कित्येक ठिकाणीं फार चिखल झाला आहे त्यांतून लोकांस जातां येतांनां त्रास होतो. पुण्यास सडकांवर असा चिखल झालेला म्युनिसिप्यालिटीनें काढून टाकिला, तसें एथें होईल तर फार चांगलें.

---

हैदराबादेस पाऊस पुष्कळ पडला. हुसेन सागर तलावाला ८० फूट पाणी चढलें आहे.

---

मि० डनलप साहेब खामगांवचे स्माल काज जडज नारळी पौर्णिमेच्या सुटींत एकं दिवस एथें येऊन मंडळीस भेटून परत गेले.

---

रा. रा. विष्णु आत्माराम असिस्टंट मास्तर मिडल क्लास स्कूल अकोला हे श्रावणी पौर्णिमेचे सुटींत उमरावतीस गेले असतां तिकडे त्यांस महामारीचा उपद्रव झाला. परंतु लिहिण्यास संतोष वाटतो कीं औषधोपाय होऊन त्यांस चांगला आराम झाला.

---

यवतमाळ जिल्ह्यांत पहापळ ह्मणून गाव आहे तेथून पत्र आल्यावरून समजतें कीं, जुलाईचे २९ वे तारखेस तेथें महामारीचा उपद्रव सुरू झाला. तेथपासून आगष्टचे ७ वे तारखेपावेतों त्या गावीं ३९ मनुष्यें आजारी झालीं व त्यांतून ३० मेलीं. तेथील पाटील गणेश कृष्णाजी काळे बाहेर गावीं गेले होते त्यांचे बंधू सांभशिवकृष्णाजी. यांनीं संकट समयीं लोकांस पुष्कळ मदत केली. नामसप्ताह उभा करून अन्न संतर्पण चांगलें केलें. आतां उपद्रव शांत झाला आहे. सदर्हू पाटील व त्यांचे बंधू लोक कल्याणाचे कामीं फार झटतात हें त्यांस भूषण आहे.

---

उमरावतीस चोऱ्या मनस्वी होऊन त्यांचा पत्ता लागत नसे पण तें मान आतां बदलत चाललें असें दिसतें. रा. रा. नारायण यादव यांजकडील चोरीपैकीं कांहीं माल सापडला व आणखी तपास चालू आहे. त्याचप्रमाणें गेल्या आठवड्यांत एक चोरी होत असतां असतां धरली गेली तिजबद्दल आह्मी तेथील पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. कृष्णराव सखाराम यांची तारिफ करितों. चोर चोरी करावयास येणार ही पाळत राखून नैनीकचे गटारांत अगदीं चिखलांत कृष्णराव हे चीफकानस्टेबल सुद्धां निजून राहिले व यांच्या धोरणाप्रमाणें चोर घरांत शिरून माल बाहेर काढूं लागले इतक्यांत यांनीं जाऊन त्यांस मुद्दे मालासुद्धां धरिलें. हें ऐकून आह्मास फार संतोष होतो. शरिरास होणाऱ्या त्रासाकडे व घाणीकडे न पहातां कृष्णरावानीं चिखलांत निजून राहून शिकार साधली याजबद्दल त्यांची मोठी तारिफ केली पाहिजे. सर्व पोलिसचे लोक असे जिवा अजूक श्रम करितील व चोऱ्या पकडण्याचे कामीं असें लक्ष्य देतील तर चोरट्यांनां वस्ती सोडून जावें लागेल व तेणेंकरून सुखवस्तु लोकांस अत्यंत सौख्य होईल आणि सरकारचें पोलिस कृतकार्य होईल. आमचे उमरावतीकर बंधू लिहितात कीं कृष्णराव उमरावतीस आल्यापासून ते फार चांगला बंदोबस्त ठेवू लागले आहेत व स्वतः रात्रभर ते गावांत हिंडत असतात व पूर्वी यवतमाळासही त्यांनीं उत्तम बंदोबस्त ठेविला होता त्याविषयीं त्यांची ख्याती झाली आहे हें ऐकून आह्मी यांची पुन्हा तारिफ करितों व इतर पोलिस इन्स्पेक्टरांनींही असे तारिफ करून घेण्याचे वारंवार प्रसंग आणावेत असें इच्छितों.

---

अकोल्याच्या म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरी रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यांनीं राजीनामा दिला व तो त्यांच्या आग्रहावरून कमिटीनें मंजूर केला. सदाशिवराव यांनीं कमिटीचें काम फार मेहेनतीनें व लक्ष्य लावून केलें. व त्यांस इंजिनियरिंग कामाची उत्तम माहिती असल्यामुळें त्यांपासून कमिटीस फार उपयोग झाला. वास्तवीक ह्मटलें असतां कमिटीला असेच हुशार, लायक, व मेहेनती सेक्रेटरी पाहिजे आहेत, पण ते कमिटीच्या दरिद्रदशेमुळें तिला मिळतात कसे? उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीच्या सेक्रेटरीची दीडशें रुपये पगाराची जागा तुह्मी पतकरता काय असें सदाशिवराव यांस विच्यारिलें होतें, पण त्यांनीं ती कबूल केली नाहीं. कमिटीच्या खासगीदाखल -अशाश्वत कामीं गुंतून सरकारी कायमची नोकरी सोडावी हें त्यांस बरें वाटलें नाहीं. व हें त्यांचे वाटणें योग्य होतें. अकोल्यास आतां पगारी सेक्रेटरी लवकरच नेमणार आहेत व तोंपर्यंत राजश्री खंडेराव बाळाजी फडके यांनीं सेक्रेटरीचें काम पहावें असें ठरलें आहे.

---

कारंजाहून १३ वे तारखेचें पत्र आल्यावरून समजतें कीं, तेथें महामारीनें गहजब करून सोडला आहे. अद्याप उपशम नाहीं. आजपर्यंत एथें सुमार ४०० लोक मरण पावले. शिवाय पर्जन्यानें आज आठ दिवस केवळ संतत धार धरली आहे. सारांश दोहोंकडून आकांत मानला आहे. ईश्वरसत्तेपुढें उपाय नाहीं असें ह्मणून स्वस्थ बसावें. दुसरा इलाज नाहीं.

---

मि० डेविस साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस लवकरच असिस्टंट कमिशनरची जागा मिळणार आहे.

---

मे. ग्रांट साहेब अकोल्याचे स्मालकाज जडज बुधवारीं विलायतेस रजेवर जातील व मि. दस्तुर बाहिमनजी साहेब त्यांचें काम पाहू लागतील

---

इलिचपुराहून १६ ता. चे पत्र आल्यावरून कळतें कीं तेथें नित्य पर्जन्यवृष्टि होत आहे. व हवेचा उपद्रव चालू आहे. नित्य दोन, चार, पांच मनुष्यें मरतात.

---

" एक तेल्हारेकर " व " एक पत्र घेणार " अशीं दोन पत्रें उशिरानें आलीं तीं पोंचलीं. पुढील आठवड्यांत त्यांतील मजकूर घेऊं.

---

## वर्तमानसार.

नवशेरा एथें एका पोलिस शिपायास एका रात्रीं कोणी ठार मारिलें व त्याची बंदुक हिरावून नेली. त्याची चौकशी चालू आहे.

कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यावरून इराणच्या उत्तर भागास तुर्कस्थानच्या मुलखांतून रशियाच्या फौजेचे दोन भाग रवाना झाल्याचें वर्तमान आलें आहे. त्याचा बेतबात कांहीं समजला नाहीं.

हिंदुस्थानांतून या वर्षाच्या पहिल्या सहा माहींत चहा परदेशी गेला त्याची संख्या १.९१,०४,००० रत्तल झाली आहे. गुदस्त सालीं याच सहामाहींत १,०४,९२,९०० रत्तल चहा गेला होता.

मुंबई एथील प्रसिद्ध श्रीमान गृहस्थ नरशी केशवजी हे थोडक्याच दिवसांत एथें एक लोंकरीचें कापड विणण्याची गिरणी काढणार आहेत.

पुरी एथील रथ ६२ फूट उंच आहे. व ३६ फूट त्याचा घेर आहे. व एक फूट जाडीची आणि सहा फूट रुंदीची अशीं त्याला ५० चाकें आहेत. हा रथ चालवायाला शेकडों मनुष्यें लागतात. रथाला दोर बांधून माणसें दोर ओढतात. त्या दोरांचें वजन ४१ मण आहे.

आमदाबादच्या जडज कोर्टांतील मि. डोसाभाई यांस बडोद्यास सर टी माधवराव यांनीं ४०० रुपये पगाराची जागा देण्याकीरतां बोलाविलें आहे.

सुरतेच्या वर्तमान पत्रकर्त्यांच्या वगैरे चौकशी करितां नेमलेले मि० पोलन साहेब जाइंट जडज गुरुवारीं तेथें जाऊन दाखल होणार होते.

हिंदुस्थानांतील नेलेल्या फौजेचा युरोपामध्यें नेहमीं उपयोग करावयाचा नसून केवळ तूर्त बंदोबस्ताच्या कारणाकरितां ती सैप्रस बेटास पाठविली आहे व ती

आणखी सव्वा महिन्यांत हिंदुस्थानास परत केली जाईल असें कर्नल स्टानली यांणीं पार्लमेंटांत ता० ७ रोजीं सांगितलें.

मि. आर्थर क्राफर्ड रत्नागिरीचे कलेक्टर रेलवे फ्राडस कमिशनामध्यें नेमलेले कमिशनर हे परत रत्नागिरीस गेले.

ब्रह्मदेशांत हिंदुस्थानांतून पुष्कळ नेटिव लोक गेले त्यामुळें तेथें दुष्काळ व आजार फार झाला अशी तेथील लोकांची कल्पना आहे. त्यांनीं एका नेटिवाचें चित्र करून त्यास सर्व रस्त्यांत फिरवून त्याची निर्भर्त्सना केली तेव्हांपासून तेथील आजार कमी होऊन पुष्कळ पाऊसही पडूं लागला आहे.

जी आय पी रेलवे कंपनीचे लाईनीवरील व्यापार मंदा चालत असल्यामुळें सदर्हू रेलवेवरील पुष्कळ कामगारांस तीन महिन्यांची रजा घेण्याविषयीं कंपनीनें सूचना केली आहे

मोठमोठाल्या सरकारी अधिकाऱ्यांस उन्हाळ्यांत वारा वगैरे घालण्यास पंखे लागतात हें सर्वांस माहित आहेच. बंगाल इलाख्यांत एकंदर या कामावर १८००० मनुष्यें लागत असून त्या संबंधानें प्रत्येक उन्हाळ्यांत ३,५०,००० रुपये खर्च लागतो.

प्रोफेसर एडिसन यांणीं विद्युलतेचा चमत्कारिक उपयोग करण्याची कल्पना बसविली आहे. ती अशी कीं, एक लहानसें यंत्र करून त्याचें सभोंवतीं सहज राहील असा एक कांचेचा गोल करावा व नंतर त्यास विद्युत उत्पन्न करण्याचें यंत्र लावावें ह्मणजे प्राणिमात्रांच्या पोटांतील पाचनक्रिया कशी होते हें त्याचे योगानें नीट कळतें.

ने. ओ.

---

## सासवा सुनांचें नातें.

आमच्या लोकांच्या गृहस्थितीमध्यें ज्या कांहीं अत्यंत वाईट व दुःखमूलक गोष्टी आहेत त्यांपैकीं सासवा सुनांचें नातें हें आहे. ह्मणून आमच्या लोकांची कुटुंब सुधारणा करून त्यांस खरोखर सुखी करूं इच्छिणारे जे असतील त्यांणीं हा संबंध सुधारण्याकडे लक्ष देणें अवश्य आहे. सुनांला जाच करणें हा सासवा आपला केवळ हक्क व धर्मच समजतात. मग सुना मोठ्या झाल्या आणि त्यांचे हातीं घरांतील सत्ता आली ह्मणजे त्या या जाचाची फेड करणें हा आपला हक्क समजतात यांत नवल नाहीं. वास्तविक पाहिलें असतां सून ह्मणजे दुसऱ्याची लहान मुलगी आपल्या घरीं आलेली तिची पोटच्या मुलीपेक्षां अधिक ममता केली पाहिजे व तीस जपलें पाहिजे. परंतु हा साधारण विच्यार तर आमच्या लोकांत एकीकडेसच रहातो, आणि उलटा तिचा छळ होतो. कित्येक सासवांची अशी समजूत दिसते कीं, सुनेला जाच केला नाहीं तर आपला सासूपणा व्हावयाचाच नाहीं यामुळें सासुरवासिनीस मुळींच जाच न करितां आपल्या लेकीप्रमाणें ममतेनें, मोकळेमनानें, व बरोबरीच्या नात्यानें वागविणाऱ्या अशा सासवा क्वचितच. सुनेस तरवारीच्या धारेवर धरण्याचा प्रकार हा साधारण आहे. एवढेंच मात्र कीं, निरनिराळ्या घरांत व निरनिराळ्या जातींत हा जाच कांहींसा कमी जास्ती असतो. या सुनेच्या जाचामुळें आमचे लोक आपले फार तोटे करून घेतात, आणि कधीं कधीं मोठ्या संकटांत पडतात. येणेंकरून साधारणतः कुटुंबांतील शांति व सुख, व परस्पर प्रेम हीं नष्ट होतात, आणि सोयऱ्या धायऱ्यांचा स्नेह वाढण्याबद्दल वांकडीं व द्वेष पडतात. सासवा सुना, जावा जावा, भावजाया व नणंदा ह्या एकमेकींस पाण्यांत पाहूं लागतात, आणि एकमेकींच्या नाशाची वाट पहात रहातात. मुलींस लहानपणापासून अशी शिक्षा मिळाल्यामुळें थोरपणीं त्या निर्दय व कठोर मनच्या बायका होतात, मूर्ख बायकांच्या अविचाराचें आकलन करण्याबद्दल कधीं कधीं अल्पमति पुरुष त्यांस उलटी मदत करितात आणि मग मोठे अनर्थ घडून येतात. एकाद्या वेळेस खून देखील होतात. कांहीं दिवसांवर मुंबईंत आंग्रयाच्या वाडींत एका ब्राह्मणाच्या सुनेनें असल्या जाचामुळें विहिरींत जीव दिला असें ऐकण्यांत आहे, तसेंच पुणें एथें एका सासवेवर सुनेस मारहाण केल्याबद्दल खटला होऊन सक्तमजुरीची शिक्षा झाली होती हें पुष्कळांच्या स्मरणांत असेल- हल्लीं अशा प्रकारच्या एका खटल्याचा निवाडा मागील ता० ३० जुलै मंगळवार रोजीं मुंबई एथील माजिस्त्रेट मि० डोसाभाई फ्रामजी यांजपुढें झाला तो असा:—

वादी लक्ष्मीबाई हिची सासू नर्मदाबाई, दीर भास्कर पुरुषोत्तम व नवरा गणपत पुरुषोत्तम यांणीं तिचे हाल केल्याबद्दल हा खटला होता. सदर्हू सासवेनें व दिरानें लक्ष्मीबाईस एका भिजलेल्या पडवींत खांबास लोखंडी सांखळीनें बांधून ठेविली आणि दोन तीन दिवसांनीं एकदां थोडेंसें तिला खावयास घालावें. व मधून मधून तिला जाऊन हाणमार करावी असें केलें. तिला निजावयास एक लहानशी आंथरी मात्र दिली होती, दुसरें कांहीं नव्हतें. अशा दुःखानें तिणें सुमारें एक महिना काढल्यावर पोलिसच्या लोकांनीं तीस पाहून इस्पितळांत नेलें, तेव्हां ती अतिशय व्याकूळ झालेली होती. तिचे असे हाल करण्याचें कारण केवळ तिला घरांत पोटभर खावयास घालीत नसत ह्मणून ती घरांतून तांदुळ वगैरे चोरी, एवढेंच काय तें दिसतें.

सासवेनें व दिरानें चांगला हुशार वकील केला होता तरी त्यांजवर गुन्हा शाबीद होऊन उभयतांस सहा सहा महिन्यांची सक्त मजुरीची ठेप झाली व नवरा सुटला. ठेप देतांना डोसाभाई सासवेस ह्मणाले कीं, तूं या दोघा कैद्यांची आई आणि घरांत वडील, त्यापेक्षां सहजच तुझें वजन यांवर फार. तूंच वडील मुलाकडून आपल्या सुनेस जनावराप्रमाणें खांबास बांधवून तिचे क्रूरपणें हाल केलेस, याजकरितां तूं सर्वांत मोठी गुन्हेगार आहेस.

आह्मास वाटतें कीं, या सासवेस आणि दिरास माजिस्त्रेटांनीं शिक्षा केली ही गोष्ट यथायोग्य झाली. असले खटले वारंवार होऊन सरकारांतून सासवांस सुनांचे हाल केल्या बद्दल कडक शिक्षा होईल तर सासवांस थोडासा धाक बसेल. याच हेतूनें अशा प्रकरणाची लोकांत प्रसिद्धि होईल तेवढी चांगली. एका अर्थीं असले घरगुती विषय सरकारदरबारापुढें न येतां त्यासंबंधीं आपोआप सुधारणा होईल तर बरें; परंतु तसें न होई तोंवर गरीब अबला असल्या जाचांतून ज्या रीतीनें मुक्त होतील ती चांगलीच ह्मटली पाहिजे. हरएक राजकीय किंवा व्यवहारिक प्रकरणांत अन्याय होत असल्यास तें त्याच्या विनाशकाळाचें लक्षण लोक समजतात. परंतु आमच्या या घरगुती प्रकरणांत एवढा मोठा अन्याय होत आहे त्याकडेस कोणाचें लक्ष नाहीं. तेव्हां या अन्यायाचा आमच्या सुखावर परिणाम चांगला होईल अशी आशा कशी बाळगतां येईल?

सु. प.

---

## यंत्रें आणि श्रम.

अलीकडे आमचे लोकांत असा कांहीं एक प्रकारचा समज होऊन गेला आहे कीं देशांत यंत्रानें कामें होऊं लागलीं ह्मणजे कारागीर लोकांच्या पोटावर पाय येतो, आतां सूक्ष्म विचार करून पाहिलें असतां हें ह्मणणें सर्वथैव खोटें असून अविचाराचें फळ आहे असें साहजीक लक्षांत येईल. कारण हल्लीं ज्या मुंबईमध्यें कितिएक गिरण्या आहेत त्यांजप्रमाणें लोखंड वगैरे ओतण्याचे व आणखी अनेक निरनिराळ्या तऱ्हेचे कारखाने आहेत कीं ज्यांत यंत्राचे योगानें पदार्थ तयार होतात. ते कारखाने स्थापन होण्याचे पूर्वीं हल्लीं त्या कारखान्यांत जितक्या लोकांचा चरितार्थ चालतो तितक्या लोकांचा हे कारखाने स्थापन होण्यापूर्वीं ह्याच जातीचे कामावर चालत होता किंवा नाहीं ह्याचा विचार केला असतां असें लक्षांत येईल कीं पूर्वींपेक्षां दुपटीनें तर खास प्रमाण वाढलें आहे यांत संशय नाहीं. या विषयावर इंडियन स्टेट्समन पत्रकर्त्यांस जी माहिती मिळाली आहे तिजवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं देशांत यंत्रें झालीं ह्मणजे हजारों लोकांस उदरनिर्वाह होण्यापुरतें साधन मिळतें. लँकेशायर या ठिकाणीं जो अनुभव येऊन चुकला व त्याप्रमाणें हिंदुस्थान देशांत रेलवे स्थापन झाल्यापासून जो आपणास अनुभव आला आहे त्यावरून असें सिद्ध होतें कीं हल्लीं जीं पांच लाख मनुष्यें रेलवेवर आपलीं पोटें भरतात त्यापेक्षां ज्या वेळेस पूर्वीं पायगाड्या जाण्यायेण्याचा क्रम सुरू होता त्या वेळेस निम्मे लोकांचीं पोटें भरत असत असें अनुमान करण्यास बराच आधार आहे, आर्कराईट साहेबांनीं व सर राबर्ट पील या उभयतांनीं कपडे विणण्याचे कामीं यंत्राचा उपयोग शोधून काढल्यापासून कपडे स्वस्त दरानें मिळूं लागले, आणि त्यामुळें त्यांचा खपही अधिक होऊं लागला, आणि खप अधिक झाल्यामुळें काम करणाऱ्या लोकांची अधिक संख्या वाढवणेंही भाग पडलें. ज्या वेळेस वालटर हट साहेबांनीं १८३८ सांत शिवण्याचें यंत्र शोधून काढिलें त्या वेळीं त्या यंत्राचा प्रसार लोकांत करूं नये असें त्यांच्या बायकोचें ह्मणणें पडलें. तिला असें वाटलें कीं ह्या यंत्राचा उपयोग दुसरे लोक करूं लागतील ह्मणून बायकोचे विनंतीस वश होऊन त्यानें आपला शोध मागें टाकला. अशा प्रकारचा शोध लोकांत प्रगट झाल्यानें जी अब्रू व प्रतिष्ठा प्राप्त होणार तिचा लाभ एप्राहेम हौ यास झाला. शिवाय हजारों लोकांस पूर्वीं हातानें काम करून जितके पैसे मिळत होते त्यापेक्षां फार अधिक मिळूं लागले. पूर्वीं ज्या ठिकाणीं एक ताका पडे तेथें आतां दहा पडूं लागले. शिवण्याचें काम सोईवार मिळूं लागलें यामुळें लोकांत त्याचा खपही फार होऊं लागला. तयार असलेले कपडे सर्वत्र ठिकाणीं मिळूं लागले, सन १८५० सांत युनैटेड स्टेटस्मध्यें ५२०६६ शिंपी होते. त्या वेळीं तेथें सुमारें २३१९१८७६ लोकसंख्या होती. ह्मणजे ४४९ लोकांस एक शिंपी या मानानें प्रमाण होतें. सन १८७० मध्यें शिंप्यांची संख्या १०८६७९ पर्यंत वाढली व ३८५५८३७१ लोक संख्याही झाली ( ह्मणजे शिंप्यांची संख्या दुप्पट वाढली ) लोक संख्या दिढीनें वाढली असतां शिंप्यांची संख्या दुप्टीनें वाढली. सुमारें ३१५२ व्यापाऱ्यांस यंत्रें पुरविण्याचे कामीं १७३२ लोक कामास लागले आहेत. जोड्याचे व्यापारांत देखील नरी दर शेकडा ४० पासून ७० रुपये पर्यंत मासची किंमत वाढली आहे तरी मालाच्या किंमतींत २५ रुपये शेकडा या मानानें किंमत कमी झाली आहे. तथापि मजुरी दुप्पट वाढून बायकांसही पुरुषाप्रमाणेंच कामें लागूं लागलीं आहेत. आणखीं जीं अनेक यांत्रिक कामें सुरू आहेत त्यांची स्थिति देखील याच प्रकारची आहे. सन १८६० सालीं या कारखान्यांत कामें करणारे लोकांची संख्या सुमारें १८१५५० होती, मजुरीचे पैसे सुमारें ७६१५७६५५ होत होते. पुढें सन १८७० त ती २२५१३८५ पर्यंत वाढली व मजुरीचें मानही १६५४१९३८९ रुपये पर्यंत वाढलें.

ह्या वर दिलेल्या आंकड्यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं ज्या मानानें लोकसंख्या वाढते त्या मानापेक्षां अधिक प्रमाणानें काम करणाऱ्या लोकांची संख्या अधिक वाढते. शिवाय यंत्रसाहित्याचे योगानें दुसरा फायदा असा होतो कीं मालाची उत्पत्ति दिढीनें वाढून लोकसंख्या निमेहून कमी लागते. शेतकी संबंधानेंही अशीच स्थिति दृष्टीस पडते याचें कारण यंत्रांचाच उपयोग करणें हें होय. एकंदरींत ही गोष्ट निर्विवाद होते कीं जसजसे यंत्राचे साधन लोक अधिक करतात तसतसे लोक अधिक कामावर लाविले जातात. या न्यायानेंच युनायटेड स्टेट्समध्यें नुसत्या तारायंत्राच्या कामावर सवाशें लोक आहेत असा तेथील रेकार्डांत दाखला सापडतो.

किरण.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० २५ माहे आगष्ट सन १८७८ इसवी. | अंक ३४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| महामारीवरील गोळी | —०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |

सदर्हू किंमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

## महामारी.

**तिचीं कारणें, निवारण व औषधोपचार**

सर्वांच्या उपयोगी पडण्या जोगा ग्रंथ छापत आहे. आगष्ट १८७८ अखेर अगाऊ पाठविल्यास किंमत चार आणे, मागाहून सहा आणे, व टपाल हशील शिवाय पडेल. पत्ता व किंमत खालीं सही करणाराकडे पाठवावी. ग्रंथ आगष्ट अखेर तयार होईल.

मु. मिरज ता. २९ जुलै १८७८ इ०

**त्रिंबक सखाराम एल. एम.**

मेडिकल आफिसर.

## नोटिस.

चंद्रभानजी वलद नारायणजी हेले जात कुणबी रहाणार मौजे टेलोरी तालुके दर्यापुर जिल्हा इलिचपुर यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं मी तुझी लग्नाची बायको असून अजमास १२ वर्षे झालीं तूं माझे पालन पोषण केलें नसून मला [illegible]ांतही ठेवलें नाहीं आणि आठ वर्षे झालीं असतील तुह्मी दुसरी बायको करून संसारही करीत आहा. मजला पोटखर्चाबद्दल दरसाल ५० रुपये प्रमाणें एकंदर १२ वर्षांत ६०० रुपये कर्जदारी झाली आहे. करितां नोटिस देण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्या पासून पंध्रा दिवसांचे आंत झालेला कर्जाचा पैसा तुह्मी देण्याकरितां मौजे रंभापुर प्रगणे कुरणखेड तालुके अकोलें एथें येऊन यावा व माझ्या संसाराविषयीं धर्मशास्त्राप्रमाणें विच्यार करून तजवीज करावी. जर करितां मुदतीप्रमाणें तुह्मी न आल्यास अगर या नोटिशीचा जवाब न दिल्यास वरील पोटखर्चाबद्दल व या नोटिशीच्या खर्चाबद्दल तुमचे वर दिवाणी कोर्टांत दावा करून पैसा घेण्यांत येईल व माझे संसाराविषयींही निकाल करण्यांत येईल, कळावें. तारीख १७ आगस्ट सन १८७८ इसवी.

( सही ) भागाई मर्द चंद्रभानजी होले जात कुणबी रहाणार टेलोरी हल्लीं वस्ती रंभापुर तालुके अकोलें नि० खु० हातची बांगडी.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

अकोट ता० १८।८।७८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. आह्मांस लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं एथील पोलिस पाटील गोविंद नारायण यास हवेच्या उपद्रवानें दोन घंट्याचे आंत ता. १६ माहे मजकूर रोजीं देवाज्ञा झाली. हे ग्रहस्थ फार हुशार असून आपले आई बापाचे पोटीं एकुलते एकच होते; आई बाप जिवंत असून त्यांस वृध्धापकाळीं पुत्रशोक घडला. असो मर्जी ईश्वराची.

आज ता. १८ माहे मजकूर रोजीं आमचे एथील तहशिलदार मि. दोराबजी कावसजी यांचे जावई हवेच्या उपद्रवानें स्वर्गवासी झाले, हा एक मोठाच अनर्थ झाला. हे ग्रहस्थ अल्पवयी असून फार हुशार होते आणि उभयतां सासू सासरे यांची प्रीति त्यांचेवर चांगली होती. यावेळीं सर्व लोकांलाच दुःख झालें आहे. असो मर्जी हरीची.

या गावीं वाईचा उपद्रव बराच असून कांहीं कमी नाहीं तालुक्यांतीलही कांहीं गावावर घडाका आहे.

पाऊस तारीख ५ जून सन १८७८ इसवीपासून ता. १९ माहे मजकूर पावेतो २० इंच आणि ८४ दोकडे पडला. कपाशीचें आणि जवारीचें पीक बरें आहे. परंतु आतां मेघराजानी एक महिना विश्रांति घेतल्यास शेतीची किस्तगारी वगैरे चांगली होईल. कळावें हे विनंती.

एक क्ष.

पत्रकर्ते महाराज,

चिखलीहून वि. वि. परजन्यानें तर बहार करून सोडली. जिकडे तिकडे हिरवेंच हिरवें दिसूं लागलें आहे. शेतें आणि रानें या समयीं मोठ्या मजेत आहेत. नद्या नाले तुडुंब वाहूं लागले आहेत. चिखलच चिखल चोहोंकडे. बिचाऱ्या जनावरांची तर चंगळ झाली. मेघराज आतां कांहीं दिवस उघाडी देतील तर बरें होईल. शेतकरी लोकांचीं कामें बिलकुल अटकून पडलीं आहेत इतकी अतिवृष्टी झाली तरी बाजारभावांत कांहीं विशेष फरक नाहीं ! पत्रकर्ते राव, अशा आनंद समयांत हो या महामारी अवदसेस कोणी बलाविलें? मी फिरत फिरत एक दिवस चांडोळास मुक्काम केला. तेथें पहातों तों या वाईचे तळ पडले आहेत. लोक घाबरून गेले आहेत, कोणी कोणाशी बोलत नाहींत. रोज तडाका चालला आहे. शेजारी खेड्यापाड्यांतही वाईसाहेबांचें सैन्य पसरलें आहे ! असो, मर्जी ईश्वराची ! !

चिखली तालुक्यांत देऊळघांट व देऊळगांव राजा या दोन ठिकाणीं ऑनररी माजिस्त्रेटांच्या नेमणुका होणार असें ऐकतों. देउळघाटास नबाब साहेबांचे चिरंजिवाची नेमणुक होणार अशी वार्ता आहे देऊळगांवा करितां चांडोळ येथिल देशमुख रा. रा. अमृतराव विनायक यांस विच्यारलें परंतु तेथून ( चांडोळ ) देऊळगाव आठ नऊ कोस असल्यामुळें घरगुती कामाची फार तारंबळ होते या साठीं त्यांनी हें नाकबूल केलें. देऊळगांवा नजीक मेहुणें येथील एका गृहस्थाची या जाग्यावर शिफारस होणार ह्मणून ऐकतों. बाकी नवल विशेष लिहिण्या सारखें तूर्त कांहीं नाहीं. येथील तमाम कच्छी दुकानदारांनो मात्र या वाईचा सपाटा पाहून आपला गाशा गुंडाळला. कळावें. तारीख १६ माहे आगष्ट सन १८७८ इसवी.

आपला एक

फिरस्ता.

माटरगाव ता. १६।८।७८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपले पत्रीं जागा मिळेल अशी आशा करितों.

आपले वऱ्हाडसमाचार पत्राचे ता. ४ व ११ माहे मजकूरचे असे दोन्हीही अंक काल रोजीं सायंकाळीं पत्रे वाटणारा शिपाई यानें आणून दिले. व त्या बरोबरच माझें एक जरूरीचें पुण्याहून आलेलें ता. ८ चें पत्रही पावलें. यावरून इकडील पत्रें मिळण्याची कशी व्यवस्था आहे हें दिसून येईल. आलेल्या शिपायास उशीर लागण्याचें कारण विच्यारिलें असतां तो ह्मणतो कीं, मी काय करावें? मला एकट्याला तालुक्यांतील पुष्कळ गावें फिरावीं लागतात सबब उशीर लागतो. अलीकडे बाहेर गावचे पत्रांचें उत्पन्न पाहिलें असतां दहा रुपयांपेक्षां पुष्कळ ज्यास्त होत आहे. असें असून पोस्टाकडील अधिकारी इकडे लक्ष देऊन जर दुसरा एक शिपाई देतील तर बरें होईल. 'पत्रकर्ते महाराज, खेड्यांतील लोकांस वर्तमानपत्र वाचण्याचा मोठासा छंद असतो असें नाहीं व त्यांतून वक्तशीर तें न मिळाल्यामुळें घेऊन उपयोग काय? असें ते लोक उघड बोलतात तर इकडे आपण लक्ष पुरवून पोस्टाकडील अधिकाऱ्यांस योग्य सूचना होऊन अशी गैरसोय न होईल तर बरें होईल. ह्या तालुक्यांत आजपर्यंत परजन्य फार चांगला पडला. अलीकडे मात्र पंधरा वीस दिवसांपासून ह्या गांवीं महामारी बाईनें आपला अमल बसविला आहे. परमेश्वर लवकर कृपा करील तर बरें होईल. पत्रविस्तारभयास्तव पुरें करितों. कळावें लोभ करावा हे विनंति.

आपलें पत्र घेणारा

एक.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आर्या.

पुरुषप्रयत्न दुर्बल,
दैव सबल आज हें मला उमजे ॥
व्यर्थांचि आजवरी मी
मानित होतों स्वशक्तिचे गमजे ॥२२०॥
ऐसें दैवा निंदी
कीं रीति अशीच सर्व लोकांची
संकटसमयीं शांती
निंदुनि दैवा कराविं शोकाची ॥२२१॥
मग तो स्वदेशमार्गीं
भोगित दुःखें धरोनि हनु हातें ॥
कांहीं दिवशीं गेला
निजनगरीं खिन्न कीर्तिधनघातें ॥२२२॥
इकडे ठाकुर लोकहि
न मानिती मानशिंगपतितें जे ॥
बंड तयानीं करुनी
त्रासविला देश आपुल्या तेजें ॥ २२३ ॥
जोतपुराच्या गादी-
वरि बसवायास तोतया राजा ॥
केला एक तयांनीं,
मर्यादा नाहिं ज्यांचिया माजा ॥ २२४ ॥

श्लोक

तो तोतया उन्नति फार पावे
जो तो तया त्यासुनि दूर धावे ॥
होतो तयार प्रतिपक्षनाशा
शौर्येंचि तो कां भिववी न देशा ॥२२५॥
त्या बंडा नृप मानशिंग दिपुनी
चित्तीं बहू घाबरे
तेव्हां त्यास अमीरखान अभिधा
ज्या तो पठाण स्मरे ॥
हिंसा जो न गणी धनास्तव पिता-
पुत्रांदिकांची असा
नाशी बंड समूळ तो, भरवसा
देवोनि त्या मित्रसा ॥ २२६ ॥
सन्मित्रापरि ठाकुरां चिकटुनी तो
मेजवानी करी

हेंग्याभीतरि शुद्धाचित्त ननते
पक्वान्न नानापरी ॥
खातां तुंदिल होति, तों निजविला
हेरा बहिर्धन-
च्छेदें, त्यावरि तोफ चालवीली हो,
केलें असें चंदन ॥ २२७ ॥

( पुढें चालू. )

---

## वसूल. रु०

| | |
|---|---|
| रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. अ. क. | २५ |
| ,, ,, कृष्णाजी गोविंद काळे क्ला. को. | २५ |
| ,, ,, गणेश रंगनाथ नाझर खामगाव | २५ |
| ,, ,, दामोदर हरी वकील मलकापुर | २८ |
| ,, ,, गोविंदराव येशवंतराव तह० | ७८ |
| ,, ,, गणेश अनंत वैद्य मास्तर | १८४ |
| ,, ,, सेक्रेटरी नेटिव लायब्ररी वाशिम | ६८ |
| ,, ,, गव्हर्नमेंट रिपोर्टर अल्लाहाबाद | ६८ |
| ,, ,, सखाराम मोरेश्वर खजीनदार | ६ |
| ,, ,, श्रीधर भीमराव मास्तर पुसलें | ६८ |
| शेट रामनारायण चतुर्भुज चिखली | ६८ |

---

# वऱ्हाडसमाचार

मिति श्रावण वद्य १२ शके १८००

---

## पंडित गटुलालजी.

मुंबईस जीवनजी महाराजाचे पदरीं वे. शा० सं० रा० रा० गटुलालजी हे पंडित आहेत. यांच्या विद्वत्तेची सर्व हिंदुस्थानभर आख्या आहे. हे संस्कृतांत उत्तम निष्णात असून अनेक धर्मसंबंधी ग्रंथांत व शास्त्रांत यांचें उत्तम अवलोकन आहे. शिवाय हे शीघ्रकवि आहेत व अनेक प्रसंगीं यांणीं सभांतून व्याख्यानें दिलीं आहेत. व धर्माची माहिती लोकांस सांगितलेली आहे, याविषयीं आमचे पत्रांतूनही मागे एकवार सविस्तर हकीकत आलेली आहे. त्यांस मानपत्र द्यावें व कांहीं पैसे जमवून त्यांस बक्षीस द्यावे याकरितां गेल्या आठवड्यांत मुंबईस माधवबागेंत एक सभा भरली होती तींत मि० वरजीवनदास, मि० नरोत्तमदास माधवदास, आनरबल मुरारजी गोकुळदास, मि० नानाभाई हरिदास मि० तापीदास व्रजदास, मि० भगवानदास पुरुषोत्तमदास इत्यादि प्रमुख प्रमुख. पुष्कळ लोक होते. अध्यक्ष स्थान मि० वरजीवनदास यांणीं सुशोभित केलें होतें. सभेंत पंडित गटुलालजी याच्या महत्विक कामाची पुष्कळ वाखाणणी झाली व त्यांचें सविस्तर चारित्र वर्णन झालें. व त्यांस मानपत्र द्यावें आणि त्यांकरितां वर्गणी जमवावी असें ठरलें. वरजीवनदास यांणीं आरंभींच १००१ रुपयांचा आकडा घातला. व बाकीच्यांनींही उदारपणानें बरेच आकडे घातले आणि त्याच सभेस ९६०० रुपये वर्गणी जमली व आणखी पुष्कळ जमेल असें दिसलें. मानपत्र तयार करण्याकरितां एक मंडळी नेमली तींत राव साहेब विश्वनाथ नारायण मंडलीक, मि० विनायकराव वासुदेवजी, मि० नानाभाई हरीदास, राव बहादूर पांडुरंग दिनानाथजी इत्यादि कित्येक गृहस्थांची योजना केली आहे.

या पंडितांस हा उत्तम मान मिळाला याजबद्दल आह्मास फार संतोष वाटतो.

---

## ✓ सुरतेचे एडिटर वगैरे वरील खटला.

सुरतेस गेल्या सोमवारीं एक फार मोठ्या महत्वाचा सेशनचा मुकद्दमा सुरू झाला आहे. त्यांत एक नामांकित वकील, दोन वर्तमानपत्रकर्ते, व आणखी तीन संभावित गृहस्थ आरोपी आहेत. त्यांवर असा आरोप आहे कीं एप्रिल महिन्याचे पाचवे तारखेस सुरतेच्या शेकडो व्यापाऱ्यांनीं आपली दुकानें बंद केलीं व हजारो लोक मिळवून दंगा केला व साहेब लोकांवर दगड फेकले व त्यांनां जखमा करावयाचा व ठार मारावयाचाही इरादा बाळगला ही भयंकर गोष्ट लोकांचे मनांत येण्यास यानीं त्यांनां चितावलें ह्मणजे कित्येक लोकांस तसें करावयास यानीं सांगितलें, त्याकरितां सभा केल्या, वर्तमानपत्रांतून निबंध लिहिले व स्वतंत्र पुस्तकेंही छापिलीं.

तेथील जडज मि. म्याक्टियर साहेब यांसही त्या गर्दीपासून त्रास व इजा झालेली आहे सबब त्यांपुढें आपली चौकशी न व्हावी, व पोलिसानें हा मुकद्दमा बनावट केला आहे तो बनावट दुसऱ्या उत्तम न्यायाधिशाशिवाय उघडीस यावयाची नाहीं याजकरितां आमचा मुकद्दमा म्याक्टियर साहेबांपुढें चालू नये असें त्यानीं अर्जानें कळविल्यावरून व हायकोर्टांत त्याविषयीं पुष्कळ वाटाघाट झाल्यावरून स्वतंत्र जाइंट सेशन जडज मि. पोलन साहेबें यांची नेमणुक करून त्यांस सोलापुराहून सुरतेस या कामाकरितां पाठविलें व त्यासमोर यांची चौकशी चालली आहे.

मि. ब्रयानसन साहेब सरकार तर्फे प्रासिक्युटर आहेत. त्यानीं तीन तास आरंभीं भाषण करून आरोपीवर आरोप कसा काय आहे तो सोमवारीं व्यक्त करून दाखविला नंतर एका साक्षीदाराची साक्ष झाली व तिची उलट तपासणी झाली. याप्रमाणें या मुकद्दम्याचें काम चालू झालें आहे.

मि. पोलन साहेब शांतपणें चौकशी करित आहेत व आरोपीच्या तक्रारि योग्य प्रकारें ऐकून घेत आहेत. जामिनावर सर्व आरोपीस खुलें करावें अशाविषयीं त्यांच्या बारिष्टरानीं अर्ज केला त्याचा त्यांनीं विचार करून माजिस्त्रेटचे सर्व कागदपत्र पाहिल्यावर त्या विषयीं काय तो हुकुम देऊ असें सांगितलें. आरोपीस खुर्च्या बसावयास द्याव्या असें त्यांच्या बारिस्टरांनीं विचारल्यावरून त्यानीं बांकावर बसण्याची त्यांस मोकळीक दिली. तसेच प्रासिक्युटर आरोपीचे वर्तमानपत्रांतील निबंध व पुस्तकें यांतील दंग्याच्या स्वरूपाचें वर्णन असेसरास आरंभीं सांगूं लागले तेव्हां त्यावर प्रतिपक्षानीं हरकती आणिल्या त्या पाहुन जडजानीं त्या गोष्टी त्या वेळीं सांगण्याचें प्रासिक्युटरास मना केलें व साक्षी पुराव्याचे प्रसंगीं तें सर्व ऐकले जाईल, तूर्त त्याविषयीं असेसराचे मनाचा कोणत्या प्रकारचा कांहीं ग्रह होणें नको आहे असे जडज ह्मणाले; इत्यादि प्रकारावरून या मुकद्दम्याची उत्तम प्रकारें चौकशी होऊन आरोपी लोकांस न्याय मिळेल असा आह्मास भरवसा वाटतो.

---

## लढाईचा इतिहास.

रशिया व तुर्कस्थान यां मधील लढाईचा इतिहास या नावाचें नवीन पुस्तकाचा पहिला भाग मुंबईस मि. माणकजी बरजोरजी मुंबईसमाचाराचे मालक यांणीं गुजराथीवरून मराठींत केला आहे. त्याची एक प्रत त्यांचे वऱ्हाडांतील एजंट मि० केकाउशा एम टाटा यांणीं आह्मास नजर पाठविली ती अत्यादरें स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों. हें पुस्तक सुरेखरीतीनें छापून यांत पुष्कळ सुंदर सुंदर चित्रें घातलीं आहेत. व काही कांहीं ठिकाणीं हकीकत मोठी चित्तवेधक अशी दिली आहे. या छत्तीस पृष्ठांच्या एक भागांतील मजकुराच्या स्वरूपावरून याचे आणखी पुष्कळ भाग होतील असें वाटतें. या पहिल्या भागाची किंमत एक रुपया आहे त्या मानानें सर्व सादंत लढाईच्या इतिहासाचें पुस्तक वाचकांचें हातीं येण्यास त्यांस बराच खर्च लागेल व अशा मोठ्या खर्चानें गोरगरिबास पुस्तक घेतां येणार नाहीं ही एक अडचण दिसते पण याला पुस्तककर्त्याचा उपाय नाहीं. कारण उत्तम चित्रांनीं हकीकत व्यक्त करावी हा त्याचा मुख्य उद्देश आहे याकरितां येट बिलायंतहून त्यानीं तीं सुंदर चित्रें मागविलेलीं आहेत त्यामुळें हें काम मोठ्या खर्चाचें झालें आहे. हल्लीं लढाई संपूनही गेली आहे याकरितां समग्र इतिहासाचें पुस्तक या वेळींच वाचकांच्या हातीं पडतें तर तेणें करून त्यांनां जितका संतोष होता तितका नुसत्या आरंभींच्या एका लहानशा भागानें होणार नाहीं असें आह्मांस वाटतें, तरी ही गोष्ट पुस्तकाच्या न्यूनतेची नव्हे, तयारीची व खर्चाची आहे. आश्रय चांगला मिळेल अशी त्यांची खात्री झाल्यास ते सारे भागही लवकरच तयार करितील. यापुस्तकांत तुर्कस्थानचे सुलतान, आस्त्रिया, जर्मनी, रशिया एथील बादशाहा, तसेच कांहीं प्रधान पुरुषांचे चरित्रभाग चांगले सांगितले आहेत, तशींच कांहीं स्थलवर्णनेंही चांगली केलीं आहेत, त्यावरून पुस्तक घेणारास माहिती मिळेल. कोठें कोठें आरंभीं वंदे कसकशीं झालीं, त्यांचीं कारणें काय, त्यांनीं चेथविणारे कोण, व त्या त्या प्रसंगीं तुर्कस्थानानें काय काय तजविजी केल्या व त्यावरून पुढें परिणाम काय होईल याचें चित्रच वाचतां वाचतां वाचकांचे मनांत उभें रहाण्या जोगे आहे. भाषा सुलभ असून सरळ आहे, आतां ती विशेष मार्मिक व रसाळ नाहीं असा कोणी आक्षेप घेतील तर भाषांतरकार पारशी गृहस्थ आहेत हें मनांत आणून तिकडे लक्ष न दिलें तर चालेल. बाकी छापण्याचें काम सुबक असून चित्रानीं वगैरे ते फार मनोहर केलें आहे. शिवाय हा इतिहास मराठी, गुजराथी, व हिंदुस्थानी अशा तीन भाषांत छापण्याची सुरुवात केलेली आहे तेव्हां याला विशेष आश्रयाची गरज आहे त्याप्रमाणें तो मिळेल तर फार चांगलें होईल. यांतील इतिहाससंबंधी कांहीं चुटके आह्मी पुढें एकादे वेळीं आपले वाचकांस दाखवू.

---

## पोलिसाची क्रूर जाचणी.

कित्येक ठिकाणीं पोलिसचे लोक चांगला बंदोबस्त ठेवितात व गुन्हेगार लोकांस पकडतात, आणि गुन्हे न होण्याविषयीं अगाऊ तजविजी ठेवून लोकांत जास्त स्वस्थता राखितात हें त्यांस भूषण आहे पण त्याविरुद्ध कांहीं ठिकाणीं असा बोभाटा आहे कीं गुन्ह्याचा पत्ता लावण्यासाठीं पोलिसचे शिपाई आरोपी लोकांवर जुलूम जबरदस्ती करितात हें फार वाईट आहे व अशीं कृत्यें करणाऱ्या पोलिस लोकांस मोठमोठालीं शासनें सरकारांतून होतात तरी कित्येकांची खोड अजून जात नाहीं हें फार वाईट आहे.

सोलापुरास रेलवे कडील मि. बेडफोर्ड साहेब यांजवर मुकद्दमा झाला त्यांत पोलिसानें फार अनन्वित खटपटी केल्या असें सेशन जडजांनींही मिनिटांत लिहून ठेविलें व आरोपीस सोडून दिलें. रेलवेवर धान्याच्या ज्या अनेक चोऱ्या झाल्या व त्यांबद्दल रेलवे कंपनीस सुमार नऊ लक्ष रुपये भरावे लागले त्यांतीलही बहुत चोऱ्या पोलिसचे संरक्षकांनीं केल्या आहेत असें उघडीस आलें आहे. सोलापुरास फत्तेशींग नावाच्या पोलिस जमादारानें एका महाराकडुन गुन्हा कबूल करविण्याकरितां त्याच्या बरगडींत बुटासुद्धां लाथ मारिली व त्या वेदनेनें तो मरण पावला असा मुकद्दमा सेशन कोर्टापुढें येऊन गेल्या महिन्यांत त्या फत्तेशिंगास ३॥ वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली आहे. तसेंच दुसरें एक मुकद्दम्यांतील आरोपीची बायको पुराव्याचे कांहीं कागदपत्र व खर्चास रुपये घेऊन सोलापूरास येत असतां वाटेंत पोलिसानें तिला धरलें व तिजजवळील कागदपत्र आणि रुपये हिसकावून घेतले व तिच्या बरोबरच्या गड्यास अटकावून ठेविलें असाही एक खटला सोलापुरास चालला आहे. डाकुच्या एका पोलिस शिपायानें गुन्हा कबूल करविण्यासाठीं एका मनुष्याचा हात मोठमोठ्या चार दागण्या तापवून त्यानीं चरचर भाजून काढून त्याची राख केली असा त्यावर मुकदमा चालू आहे. वऱ्हाडांत आमचे प्रसिद्ध करीमखान पोलिस इन्स्पेक्टर व शिवरामसिंग चीफ कानस्टेबल यांनीं निरपराधी मनुष्यांना मारहाण करून त्यांकडुन "[illegible]" खून के-

ला" असें कबूल करविलें व त्याबद्दल या दोघांस मोठमोठाल्या कैदेच्या शिक्षा झाल्या हें आमचे वाचणारांस ठाऊक आहेच. सुरतेसही या दंग्याचे प्रकरणांत पोलिसानें अतोनात जुलूम केल्याचा बोभाटा आहे मग चौकशींत निष्पन्न काय होतें पहावें.

सारांश या प्रमाणे चहोकडोन पोलिसाचें असें दुर्वर्तन ऐकिलें ह्मणजे सर्व लोकांचीं मनें अस्वस्थ होतात, व चांगलें काम करणाऱ्या पोलिसांतील हुशार लोकांनीही उमेद रहात नाहीं सबब याचा कांहीं विशेष बंदोबस्त होईल तर फार चांगलें होईल.

## काश्मीरचा दुष्काळ

काश्मीर हा प्रदेश उत्तम पिकाऊ आहे. तेथें दुष्काळ बहुशा कधीं पडत नाहीं. मागें तिकडे दुष्काळ पडला होता त्याला १०० हून अधिक वर्षे झालीं आहेत व याच कारणामुळें आह्मांस वाटतें कीं, तेथील राजाचे दुष्काळ सुरू झाला तेव्हां त्या कामीं दुर्लक्ष्य झालें. कारण दुष्काळ असावा असें त्यांस वाटलेंच नाहीं. पण हल्लीं त्या कामीं त्याची चांगली नजर पोंचून बंदोबस्ताच्या योजना सुरू झाल्या आहेत, नवशेरा, रावल्पिंडी इत्यादि ठिकाणाहून लाखो रुपयांच्या धान्याची खरेदी होऊन काश्मिरास चालली आहे. व इंग्लिश सरकारचे अधिकारीही त्यास चांगलें सहाय देत आहेत रिलीफ कामें. सर्वत्र सुरू झालीं आहेत. व श्रीनगर एथें आणि दुसरी कडे हिंदु व मुसमान लोकांच्या कमिट्या या कामासाठीं नेमिल्या आहेत दुष्काळाचें स्वरूप फारच कडक झालें आहे. खरीपाचे वेळीं पाऊस अतिशय होऊन शेतांतून मेहेनत झाली नाहीं त्यामुळें खरिपाचें पीक गेलें व पाऊस पुढें अगदी न पडल्यामुळें रबीचें पीक मुळींच आलें नाहीं. लोलाब, बांडिपुर, गुराई, अस्तर हे प्रांत उत्तम पिकाऊ व दाट वस्तीचे होते पण ते अगदी वैराण झाले. पहिल्या पहिल्यांनें राजाचे शिपाई गाववाले लोकांस पर ठिकाणीं जाऊ देत नव्हते त्यामुळेंही लोकांचा फार नाश झाला. गुलमर्ग पाहाडाचे पायथ्याशी एक लहानसें खेडें ३० घरांचें होतें तेथील स्थिति अशी समजण्यांत आली कीं, त्या गावीं त्यांचीं पोटें भरेनात व शिपाई लोक त्यांस दुसरी कडे जाऊ देईनात यामुळें तेथेंच राहून अन्न न मिळाल्यामुळें सर्व गावचा गाव मरण पावला, असें त्यांचे सांगाडे हल्लीं सापडले आहेत त्यावरून सिद्ध झालें आहे.

शिपाई लोकांनीं अशी मनाई खरोखरी केली असल्यास ती फार वाईट होय. व या मृत्यूकरितां ते दोषी आहेत व तसा त्यांस हुकूम देणारेही महादोषी आहेत असें आह्मी ह्मणतों. आतां तरी ईश्वर करो आणि त्या प्रांतांतील दुर्भिक्ष्य लवकर संपो.

## वऱ्हाड.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मि० दस्तुर बहिमनजी साहेबांचे पुतणे व जावई मि० असाजी होशंगजी यांस हैदराबादेकडे दरमहा ७०० रुपये पगारावर तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल नेमिलें हे तरुण गृहस्थ हुशार असल्याप्रमाणें फार लौकर वाढले

नवीन नेमणूक झालेले स्यानिटरी कमिशनर डा० ला साहेब एथें येऊन आपले कामावर रुजू झाले.

पर्जन्यानें याही आठवड्यांत दोन तीन दिवस त्रास दिला होता. त्यानें खूप मनावर घेतलें आहे. आमचे वऱ्हाडांत इतक्या विपूल पर्जन्याची कांहीं गरज नाहीं आणि तो तर पडत आहे, तेव्हां खरीपाचे पिकाचा परिणाम कसा काय होईल याविषयीं संशय आहे. अजून तरी चांगलें खडखडीत ऊन पडल्यास बरें होईल.

महामारीचा आजार ईश्वरकृपेनें गेल्या सारखा झाला आहे. तुरळक एकादा मनुष्य वाखालल्याविषयीं ऐकण्यांत येतें.

आजचे अंकांत माटरगावचें एक पत्र छापलें आहे त्यावरून बाहेर गावीं लोकांस पत्रें उशीरानें मिळण्याची टपालखात्याची गैरव्यवस्था लोकांस दिसून येईल. असे बहुत ठिकाणचे बोभाट येतात. यावर त्या खात्याचे अधिकारी मेहेरबानी करून लक्ष्य पुरवितील तर बरें होईल.

मौजे आगर एथें विषप्रयोगानें एक मनुष्य मारल्याचा मुकद्दमा एथें आला आहे.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर बुलढाण्यास गेले होते ते काल परत आले. उदईक उमरावतीस जेल कानफरन्सकरितां जाणार आहेत व तसेच तिकडून यवतमाळासही सेशनाकरितां जातील.

रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर एथील मिडूल क्लास स्कुलाचे हेड मास्तर यांणीं जून महिन्याचे अखेरीस ८ दिवसांची रजा घेतली होती व ते मुंबईस गेले होते. तेथून तीन वेळा त्यांनीं वेगवेगळ्या मुदतीनें रजा वाढविल्या व हल्लीं आणखी सुमार दीड महिन्याची रजा त्यांनीं मागितली आहे असें कळतें. त्यांच्या शाळेची वार्षिक परीक्षा चालू आहे.

मि० हसनअली सेकंड क्लास आसिपटल असिस्टंठ यांची १४ वर्षे डाकटरीच्या कामाची भरून परीक्षा पास झाली व ते फर्स्ट क्लास आ. असिस्टंट झाले. तसेच मि० मेलाराम यांची ७ वर्षे भरून ते सेकंड क्लास.आ. असिस्टंट झाले.

मि० स्टिवर्ट साहेब जंगल खात्याचे आफिशियेटिंग असिस्टंट कानसरवेटर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

बुलढाणें जिल्ह्यांतील घाटबोरीचे सब रजिस्ट्रार मि, निळकंट सखाराम मरण पावले त्यांच्या जागेवर मि० त्रिंबक सखाराम यांची नेमणूक झाली.

इलिचपुरच्या म्युनिसिप्यालिटींत मेंबर नेमिले ते:—

लोकांनीं निवडले

१ मि० हिरासा मोतीसा.
२ „ चतरशिंग सुगनचंद.
२ „ चैनसुख छगालाल.
४ „ फत्तेराम शालिग्रामैं.
५ „ जलालखान.

जुने कायम केले

१ रा. ब. भगवंत नरहर.
२ मि० सयद इनायत मोहिदीन का.
३ „ बाळाजी नृसिंव्ह डिपुटी एँ० इन्स्पेक्टर.
४ „ वजीरखान स्कुल मास्तर.

नवीन

१ मि अमजाद हुसेन खतीब.

याप्रमाणें दहा मेम्बर असून डिपुटी इन्स्पेक्टर हे सेक्रेटरी आहेत.

सपटंबर अखेर भरणाऱ्या तिमाही बदलही मागच्या प्रमाणें वऱ्हाडांतील आठ रुपयांच्या व त्याहून कमी पगाराच्या शिपाई लोकांस महागाई भत्ता मिळण्याचा ठराव झाला आहे.

इलिचपुरचे डिपुटी कमिशनर मेजर मेकंजी व कम्यांडिंग क्या० सेटन यांस, तसेच उमरावतीचे डिपुटी कमिशनर ले. कर्नल मेंजिस व पोलिसचे इन्स्पेक्टर क्या. लेन यांस भजनाल याचे ट्रस्टी नेमिलें.

मागें लिहिल्या प्रमाणें क्या० ग्रांट साहेब स्मालकाज जडज बुधवारीं रजेवर गेले. त्यांचे कामाचा च्यार्ज मि० दस्तुर बहिमनजी साहेब यानीं घेतला.

एथील रेलवे स्टेशनचे प्ल्याटफार्मवर पुष्कळ लोक हमेशा जाऊन अव्यवस्था होत असे व त्याबद्दल स्टेशनमास्तर यांजकडे दोष येई असें पाहून हल्लीं प्ल्याटफार्मवर विशेष चौकशीशिवाय साधारण कोणास न येऊ देण्याची तजवीज झाली आहे असें समजतें.

मे० हडलस्टन साहेब अकोल्याचे कायमचे डिपुटी कमिशनर विलायतेस रजेवर आहेत ते परत येत नाहींत असें उ० अ० कर्यांस समजलें आहे

सांगलीकर नाटकवाल्यांनीं काल हरिश्चंद्र आख्यानाचा खेळ केला. मागें एक खेळ त्यांनीं फुकट केला. गावांत उपद्रव होता व पाऊस पडत असे त्यामुळें तीन महिन्यांत त्यांचे नाटक न झाल्यानें त्यांस कांहीं फायदा झाला नाहीं.

नवीन दिवाणी कायद्याच्या बहिवाटीच्या संबंधानें १६ वे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें पुष्कळ नियम छापून आले आहेत.

क्या० बुलक साहेब एथील डिपुटी कमिशनर उदईक उमरावतीस जेलकानफरन्सकरितां जाणार आहेत.

उर्दूअखबारचे अलीकडील दोन आठवड्यांत काळ्या चबुत्र्याकडील एका बहिमी चोराविषयीं कांहीं लिहिलेलें आह्मी पाहिलें. व त्याविषयीं चर्चाही बरीच झाली असें त्याच पत्रावरून कळतें. असें असेल तर पोलिसासही तो मनुष्य समजला असेल व त्या बाजूचे लोक त्याचा संशय पोलिसास कळवितील व आमचे हुशार पोलिस इन्स्पेक्टर मि० स्याण्डियल साहेब त्यावर चांगली नजर ठेवितील असें आह्मी इच्छितों.

वाशिमाहून एका मित्राकडून खबर समजली आहे कीं तेंथील महामारीचा उपद्रव अजून शमत नाहीं व सुमार चार महिने असा उपद्रव रहाण्यास तेथील गलिच्छपणा कारण आहे असें ते ह्मणतात. व म्युनिसिप्यालिटीच्या सेक्रेटरीच्याही जागीं एकाद्या नवीन तरूण व इंग्लिश जाणणाऱ्या गृहस्थाची योजना व्हावी हें अवश्य आहे असाही त्यांचे लेखचा मतलब आहे.

## नोटिस.

### ५०० रुपये बक्षीस.

इंग्लिश भाषेंत आरोग्य रक्षणसंबंधी पुस्तक कोणी नवीन रचील व ते हिंदुस्थान सरकारास पास होईल तर त्यास ५०० रुपये बक्षिस देण्यांत येईल. या पुस्तकाची छापील पृष्ठें २४ हून अधिक होऊ नयेत; व तें पुस्तक सरकारच्या मालकीचें होईल आणि सरकार त्याची वेगवेगळ्या भाषेंत भाषांतरें करील.

हुकुमावरून

( Sighned ) G. H. Trevor

वऱ्हाडा करितां सेक्रेटरी.

## वर्तमान सार.

बंगलोर व ह्मैसूर एथें शेतकीच्या शाळा घालण्याविषयीं हिंदुस्यान सरकारचें सांगशन मागवावें असा ह्मैसूरच्या चीफ कमिशनरचा विच्यार आहे.

काबुलच्या अमीराचा वडील पुत्र १७ वे तारखेस मरण पावला असें तारेंतून वर्तमान आलें आहे. त्यामुळें तिकडे इंग्लिश सरकाराकडून कामदार जाणार होते ते तूर्त जाणार नाहींत.

आग्र्याच्या ताजमहालास जोडून पुष्कळ वर्षांचा उत्तम बाग आहे त्यांतील सर्व झाडांचा पाला टोळांची धाड येऊन तिनें खाल्ला. व झाडें केवळ बोडकी होऊन बाग आहे किंवा नाहीं तें दिसतही नाहीं असें झालें आहे.

ठाण्याकडे या वर्षीं पाऊस पडला असा सन १८२८ सालीं पडला होता. ह्मणजे ५० वर्षांत असा पाऊस पडला नाहीं असें सांगतात.

ला" असें कबूल करविलें व त्याबद्दल या दोघांस मोठमोठाल्या कैदेच्या शिक्षा झाल्या हें आमचे वाचणारांस ठाऊक आहेच. सुरतेसही या दंग्याचे प्रकरणांत पोलिसानें अतोनात जुलूम केल्याचा बोभाटा आहे मग चौकशींत निष्पन्न काय होतें पहावें.

सारांश या प्रमाणे चहोकडोन पोलिसाचें असें दुर्वर्तन ऐकिलें ह्मणजे सर्व लोकांचीं मनें अस्वस्थ होतात, व चांगलें काम करणाऱ्या पोलिसांतील हुशार लोकांनीही उमेद रहात नाहीं: सबब याचा कांहीं विशेष बंदोबस्त होईल तर फार चांगलें होईल.

## काश्मीरचा दुष्काळ

काश्मीर हा प्रदेश उत्तम पिकाऊ आहे. तेथें दुष्काळ बहुशा कधीं पडत नाहीं. मागें तिकडे दुष्काळ पडला होता त्याला १०० हून अधिक वर्षें झालीं आहेत व याच कारणामुळें आह्मांस वाटतें कीं, तेथील राजाचें दुष्काळ सुरू झाला तेव्हां त्या कामीं दुर्लक्ष्य झालें. कारण दुष्काळ असावा असें त्यांस वाटलेंच नाहीं. पण हल्लीं त्या कामीं त्याची चांगली नजर पोचून बंदोबस्ताच्या योजना सुरू झाल्या आहेत, नवशेरा, रावलपिंडी इत्यादि ठिकाणाहून लाखो रुपयांच्या धान्याची खरेदी होऊन काश्मिरास चालली आहे. व इंग्लिश सरकारचे अधिकारीही त्यास चांगलें सहाय देत आहेत रिलीफ कामें. सर्वत्र सुरू झालीं आहेत. व श्रीनगर एथें आणि दुसरी कडे हिंदु व मुसमान लोकांच्या कमिट्या या कामासाठीं नेमिल्या आहेत दुष्काळाचें स्वरूप फारच कडक झालें आहे. खरिपाचे वेळीं पाऊस अतिशय होऊन शेतांतून मेहेनत झाली नाहीं त्यामुळें खरिपाचें पीक गेलें व पाऊस पुढें अगदी न पड ल्यामुळें रबीचें पीक मुळींच आलें नाहीं. लोलाब, बांडिपुर, गुराई, अस्तर हे प्रांत उत्तम पिकाऊ व दाट वस्तीचे होते पण ते अगदी वैराण झाले. पहिल्या पहिल्यानें राजाचे शिपाई गाववाले लोकांस परे ठिकाणीं जाऊ देत नव्हते त्यामुळेंही लोकांचा फार नाश झाला. गुलमर्ग पाहाडाचे पायथ्याशी एक लहानसें खेडें ३० घरांचें होतें तेथील स्थिति अशी समजण्यांत आली कीं, त्या गावीं त्यांचीं पोटें भरेनात व शिपाई लोक त्यांस दुसरी कडे जाऊ देईनात यामुळें तेथेंच राहून अन्न न मिळाल्यामुळें सर्व गावचा गाव मरण पावला, असें त्यांचे सांगाडे हल्लीं सापडले आहेत त्यावरून सिद्ध झालें आहे.

शिपाई लोकांनीं अशी मनाई खरोखरी केली असल्यास ती फार वाईट होय. व या मृत्यूकरितां ते दोषी आहेत व तसा त्यांस हुकूम देणारेही महादोषी आहेत असें आह्मी ह्मणतों. आतां तरी ईश्वर करो आणि त्या प्रांतांतील दुर्भिक्ष्य लवकर संपो.

## वऱ्हाड.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मि० दस्तुर बहिमनजी साहेबांचे पुतणे व जावई मि० असाजी होशंगजी यांस हैदराबादेकडे दरमहा ७०० रुपये पगारावर तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल नेमिलें हे तरुण गृहस्थ हुशार असल्याप्रमाणें फार लौकर वाढले

नवीन नेमणूक झालेले स्यानिटरी कमिशनर डा० ला साहेब एथें येऊन आपले कामावर रुजू झाले.

पर्जन्यानें याही आठवड्यांत दोन तीन दिवस त्रास दिला होता. त्यानें खूप मनावर घेतलें आहे. आमचे वऱ्हाडांत इतक्या विपूल पर्जन्याची कांहीं गरज नाहीं आणि तो तर पडत आहे, तेव्हां खरीपाचे पिकाचा परिणाम कसा काय होईल याविषयीं संशय आहे. अजून तरी चांगलें खडखडीत ऊन पडल्यास बरें होईल.

महामारीचा आजार ईश्वरकृपेनें गेल्या सारखा झाला आहे. तुरळक एकादा मनुष्य वाखालल्याविषयीं ऐकण्यांत येतें.

आजचे अंकांत माटरगावचें एकपत्र छापलें आहे त्यावरून बाहेर गावीं लोकांस पत्रें उशीरानें मिळण्याची टपालखात्याची गैरव्यवस्था लोकांस दिसून येईल. असे बहुत ठिकाणचे बोभाट येतात. यावर त्या खात्याचे अधिकारी मेहेरबानी करून लक्ष्यें पुरवितील तर बरें होईल.

मौजे आगर एथें विषप्रयोगानें एक मनुष्य मारल्याचा मुकदमा एथें आला आहे.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर बुलढाण्यास गेले होते ते काल परत आले. उदईक उमरावतीस जेल कानफरन्सकीरता जाणार आहेत व तसेच तिकडून यवतमाळासही सेशनाकरितां जातील.

रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर एथील मिडूल क्लास स्कुलाचे हेड मास्तर यांणीं जून महिन्याचे अखेरीस ८ दिवसांची रजा घेतली होती व ते मुंबईस गेले होते. तेथून तीन वेळा त्यांनीं वेगवेगळ्या मुदतीनें रजा वाढविल्या व हल्लीं आणखी सुमार दीड महिन्याची रजा त्यांनीं मागितली आहे असें कळतें. त्यांच्या शाळेची वार्षिक परीक्षा चालू आहे.

मि० हसनअली सेकंड क्लास आसिपटल असिस्टंठ यांची १४ वर्षें डाकटरीच्या कामाची भरून परीक्षा पास झाली व ते फर्स्ट क्लास आ. असिस्टंट झाले. तसेच मि० मेलाराम यांची ७ वर्षें भरून ते सेकंड क्लास.आ. असिस्टंट झाले.

मि० स्टिवर्ट साहेब जंगल खात्याचे आफिशियेटिंग असिस्टंट कानसरवेटर यांस तीन महिन्याची हक्काची रजा मिळाली.

बुलढाणें जिल्ह्यांतील घाटबोरीचे सब रजिस्ट्रार मि, निळकंट सखाराममरणपावले त्यांच्या जागेवर मि० विंबक सखाराम यांची नेमणूक झाली.

इलिचपुरच्या म्युनिसिप्यालिटींत मेंबर नेमिले ते:—

लोकांनीं निवडले

१ मि० हिरासा मोतीसा.
२ ,, चतरशिंग सुगनचंद.
२ ,, चैनसुख छगालाल.
४ ,, फत्तेराम शालिग्रामँ.
५ ,, जलालखान.

जुने कायम केले

१ रा. ब. भगवंत नरहर.
२ मि० सयद इनायत मोहिदीन का.
३ ,, बाळाजी नृसिंव्ह डिपुटी एँ० इन्स्पेक्टर.
४ ,, वजीरखान स्कुल मास्तर.

नवीन

१ मि अमजाद हुसेन खतीब.

याप्रमाणें दहा मेम्बर असून डिपुटी इन्स्पेक्टर हे सेक्रेटरी आहेत.

सपटंबर अखेर भरणाऱ्या तिमाही व दलहीं मागच्या प्रमाणें वऱ्हाडांतील आठ रुपयांच्या व त्याहून कमी पगाराच्या शिपाई लोकांस महागाई भत्ता मिळण्याचा ठराव झाला आहे.

इलिचपुरचे डिपुटी कमिशनर मेजर मेकंजी व कम्यांडिंग क्या० सेटन यांस, तसेच उमरावतीचे डिपुटी कमिशनर ले. कर्नल मेंजिस व पोलिसचे इन्स्पेक्टर क्या. लेन यांस भजनाल याचे ट्रस्टी नेमिलें.

मागें लिहिल्या प्रमाणें क्या० ग्रांट साहेब स्मालकाज जडज वुधवारीं रजेवर गेले. त्यांचे कामाचा च्यार्ज मि० दस्तुर बहिमनजी साहेब यानीं घेतला.

एथील रेलवे स्टेशनचे प्ल्याटफार्मवर पुष्कळ लोक हमेशा जाऊन अव्यवस्था होत असे व त्याबद्दल स्टेशनमास्तर यांजकडे दोष येई असें पाहून हल्लीं प्ल्याट फार्मवर विशेष चौकशीशिवाय साधारण कोणास न येऊ देण्याची तजवीज झाली आहे असें समजतें.

मे० हडलस्टन साहेब अकोल्याचे कायमचे डिपुटी कमिशनर विलायतेस रजेवर आहेत ते परत येत नाहींत असें उ० अ० कर्त्यांस समजलें आहे

सांगलीकर नाटकवाल्यांनीं काल हरिश्चंद्र आख्यानाचा खेळ केला. मागें एक खेळ त्यांनीं फुकट केला. गावांत उपद्रव होता व पाऊस पडत असे त्यामुळें तीन महिन्यांत त्यांचें नाटक न झाल्यानें त्यांस कांहीं फायदा झाला नाहीं.

नवीन दिवाणी कायद्याच्या वहिवाटीच्या संबंधानें १५ वे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें पुष्कळ नियम छापून आले आहेत.

क्या० बुलक साहेब एथील डिपुटी कमिशनर उदईक उमरावतीस जेलकानफरन्सकारितां जाणार आहेत.

उर्दू अखबारचे अलीकडील दोन आठवड्यांत काळ्या चबुत्र्याकडील एका वहिमी चोराविषयीं कांहीं लिहिलेलें आह्मी पाहिलें. व त्याविषयीं चर्चाही बरीच झाली असें त्याच पत्रावरून कळतें. असें असेल तर पोलिसासही तो मनुष्य समजला असेल व त्या बाजूचे लोक त्याचा संशय पोलिसास कळवितील व आमचे हुशार पोलिस इन्स्पेक्टर मि० स्यान्डियल साहेब त्यावर चांगली नजर ठेवितील असें आह्मी इच्छितों.

वाशिमाहून एका मित्राकडून खबर समजली आहे कीं तेथील महामारीचा उपद्रव अजून शमत नाहीं व सुमार चार महिने असा उपद्रव रहाण्यास तेथील गलिच्छपणा कारण आहे असें ते ह्मणतात. व म्युनिसिप्यालिटीच्या सेक्रेटरीच्याही जागीं एकाद्या नवीन तरूण व इंग्लिश जाणणाऱ्या गृहस्थाची योजना व्हावी हें अवश्य आहे असाही त्यांचे लेखचा मतलब आहे.


## नोटिस.

### ५०० रुपये बक्षीस.

इंग्लिश भाषेंत आरोग्य रक्षणसंबंधी पुस्तक कोणी नवीन रचील व ते हिंदुस्थान सरकारास पास होईल तर त्यास ५०० रुपये बक्षिस देण्यांत येईल. या पुस्तकाची छापील पृष्ठें २४ हून अधिक होऊ नयेत; व तें पुस्तक सरकारच्या मालकीचें होईल आणि सरकार त्याची वेगवेगळ्या भाषेंत भाषांतरें करील.

हुकुमावरून

( Sighned ) G. H. Trevor
वऱ्हाडा करितां सेक्रेटरी.


## वर्तमान सार.

बंगलोर व म्हैसूर एथें शेतकीच्या शाळा घालण्याविषयीं हिंदुस्थान सरकारचें सांगशन मागवावें असा म्हैसुरच्या चीफ कमिशनरचा विच्यार आहे.

काबुलच्या अमीराचा वडील पुत्र १७ वे तारखेस मरण पावला असें तारेंतून वर्तमान आलें आहे. त्यामुळें तिकडे इंग्लिश सरकाराकडून कामदार जाणार होते ते तूर्त जाणार नाहींत.

आग्र्याच्या ताजमहालास जोडून पुष्कळ वर्षांचा उत्तम बाग आहे त्यांतील सर्व झाडांचा पाला टोळांची धाड येऊन तिनें खाल्ला. व झाडें केवळ बोडकी होऊन बाग आहे किंवा नाहीं ते दिसतही नाहीं असें झालें आहे.

ठाण्याकडे या वर्षीं पाऊस पडला असा सन १८२८ सालीं पडला होता. ह्मणजे ५० वर्षांत असा पाऊस पडला नाहीं असें सांगतात.

कानस्टंटिनोपल जवळ तळ देऊन असलेली रशियन फौज १९ वे तारखेस तेथून निघाली व मार्मोरा समुद्रांतील इंग्लिश फौजही निघणार होती.

बोसानिया एथील लोक आस्त्रियाचे ताब्यांत रहाण्यास खुशी नाहींत, त्यांनीं बंड केलें आहे व आस्त्रियन सरकारची फौज व बंडवाले यांच्या लढाया चालू आहेत.

जनरल मेसेंझाफ रशियाच्या पोलिसाचा डायरेक्टर जनरल यास सेंटपिटर्सबर्ग एथें कोणी शस्त्रानें भोसकलें व त्या जखमेनें ते मरण पावले असें वर्तमान आलें आहे.

सायप्रस बेटांत हिंदुस्थानांतून गेलेली फौज रहावयास कांहीं पाठविली व बाकीचीस हिंदुस्थानांत परत जाण्याविषयीं हुकूम झाला असें वर्तमान आलें आहे.

रांडा, कसबिणी, व तशा प्रकारचा धंदा करणाऱ्या स्त्रियांच्या मुली सरकारी शाळेंतून घेणें योग्य आहे किंवा नाहीं या विषयीं ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या मतासहित हिंदुस्थान सरकारचा अभिप्राय विलायतेस विच्यारिला आहे.

कलकत्यास इंडियन असोसियेशन सभेने मि० ग्ल्याडस्टन साहेब व त्यांच्या वती चे पार्लमेंट सभेंतील १५२ मेंबर ज्यांनीं प्रेस आक्टाविषयीं इकडील अर्जास अनुकूळ मतें दिलीं त्यांचे आभार मानण्याच्या विच्याराकरितां सभा भरविली होती व लवकरच त्यांस आभारपत्र पाठविण्याचा ठराव झाला.

तिगस्त सालीं कलकत्याचे म्युनिसिप्यालिटीस २८५६९२९ रुपयांचें उत्पन्न झालें.

मद्रास हायकोर्टाला ५ वा जडज कांहीं दिवस नेमावा असा ठराव होऊन त्या जागेवर नेटिवास नेमावें असेंही ठरलें आहे.

---

## संस्कृतभाषाभिज्ञ स्त्री.

विद्येच्या व्यासंगानें कोणास कसा उत्तम संस्कार प्राप्त होईल याचा कांहीं नेम नाहीं. अलीकडच्या काळीं आह्मा हिंदू लोकांतील स्त्रिया, व तेली माळी वगैरे शूद्र केवळ अज्ञान वर्गांत गणिलेले आहेत, कारण त्यांस विद्येचा संस्कार पूर्वापार बहुत वर्षे नव्हता तथापि या गोष्टीस इंग्लिश सरकारानें बराच बाध आणिला व साधारण सर्व पुरुषवर्गास विद्यासंपादन होईल अशा सर्वत्र शाळा घातल्या तेणेंकरून फार नाहीं तरी लिहिणें वाचणें व साधारण व्यवहार ज्ञान शूद्र वर्गांतही सांप्रत बरेंच आलें आहे यांत संशय नाहीं. त्याचप्रमाणें मुलींसही अंशतः विद्याज्ञान व्हावें असा प्रयत्न कोठें कोठें सरकारानें केला आहे. त्यांतून विद्येचीं मूलतत्वें स्त्रीवर्गांतही प्रवेश करूं लागलीं आहेत ही आनंदाची गोष्ट आहे व कालांतरानें हा प्रकार विस्तृत होऊन त्या उभय वर्गांतही विद्येची व्याप्ती होईल असें मानण्यास पुष्कळ आधार दिसत आहे. तरी हल्लीं आह्मी एका विद्वान स्त्री विषयीं लिहिणार आहो त्या प्रतीची स्त्री सरकारचे विद्याखात्यांत अजून झालेली नाहीं व पुढेंही बहुत कालमर्याद होणार ना[illegible] दिसत येतें.

ह्मैसुराकडून दक्षिणी ब्राह्मणाची एक स्त्री अल्पवयी ह्मणजे २२ वर्षांचे वयाची व अविवाहित अशी रमाबाई नावाची कलकत्यास गेली आहे. तिचें संस्कृत भाषा प्रवीणतेविषयीं आह्मांस अति आश्चर्य वाटतें. तिला इतकें संस्कृत उत्तम येतें कीं सर्व भाषण व्यवहार ती त्या भाषेंत करिते एवढेंच नाहीं, तर उत्तम कविताही अति शीघ्रतेनें ती संस्कृत भाषेंत तोंडच्या तोंडीं करिते. शिवाय श्रीमद्भागवत ग्रंथ १८००० तिला अगदीं मुखोद्गत आहे. एवढ्या वयांत व स्त्रीजातींत अशी विद्या आणि अशी असाधारण कविताशक्ती पाहून कोणाही सहृदय मनुष्यास अत्यानंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हा तिला केवळ ईश्वरीप्रसाद ह्मणावयाचा. व "बहुत रत्ना वसुंधरा" अशी जी ह्मण आहे तिच्या प्रमाणें पृथ्वींत हें एक उत्तम रत्न आहे असें मानावयाचें ही बाई दक्षिण देशांत येऊन इकडेही आपल्या विद्येचा प्रभाव दाखवील तर ठिकठिकाणच्या लोकांस बहुत संतोष होईल.

कलकत्ता युनिव्हर्सिटीचें सेनेटगृह पाहण्याकरितां रमाबाई गेली होती त्यावेळेस तिला भेटण्याकरितां प्रोफेसर टानी, मि. गफ, पंडित महेशचंद्र न्यायरत्न वगैरे विद्वान मंडळी विराजमान झाली होती, प्रोफेसर टानी यांनीं एक संस्कृत श्लोक करून यांत त्या बाईची स्तुति केली, त्यांतील तात्पर्य असें होतें-कीं, 'तूं आपल्या विद्वत्तेनें मोठमोठाल्या पंडितांस जिंकलेंस सबब तूं केवळ मूर्तिमति सरस्वतीच आहेस असें वाटतें. जरी मी म्लेच्छ आहे तरी तुझ्या विद्वत्तेविषयीं मी फार ऐकिलें आहे. तुझी योग्यायोग्य स्तुति करण्यास मी असमर्थ आहे. याकरितां मी तुला प्रणाम करितो.' रमाबाईनें त्वरित एक श्लोक करून टानी साहेबांस जबाब दिला त्याचा सारांश असा होता कीं, 'मला कांहीं समजत नाहीं. मी एक गरीब स्त्री आहे व आपण जी माझी स्तुति केली तीस मी अयोग्य आहे, आपण शाहाणे व विद्वान आहां व आपला चांगुलपणा आपणास मोठा भूषणीय आहे. या विद्यालयांत येऊन आपल्यां सारख्या विद्वान गृहस्थांची भेट झाल्यानें माझें सार्थक झालेंसें मला वाटतें. याप्रमाणें परस्परांचें कवितारूपानें आगतस्वागत झाल्यानंतर पंडित महेश चंद्र यांणीं बाई मजकूर इला युनिव्हर्सिटीवर कविता करण्यास विनंती केली. त्यावर बाईनें मालिनी वृत्तावर सुमारें १५ मिनिटांत दोन श्लोक केले. नंतर मिस्तर टानी यांनीं 'राणी किंवा एम्प्रेस' हा विषय दिला त्यावर बाईनें सुमारें १० मिनिटांत मोठ्या अवघड वृत्ताचे दोन श्लोक केले. या वेळेस बाईची मोठी वाहवा होऊन तेथें जमलेल्या विद्वानांस तिच्या विद्याधनाचा मोठा अचंबा वाटला. गेल्या सोमवारीं बाई मजकूर आनरेबल महाराज ज्योतींद्र मोहन टागोर यांच्या भेटीकरितां गेली होती. बाईच्या आदरातिथ्याकरितां विद्वान मंडळी बरीच जमली होती. राजा सुरेंद्र मोहन टागोर यांनीं बाईस 'संगीत' हा विषय दिला. त्यावर बाईनें तीन मिनिटांत एक श्लोक केला. पंडित ठाकूरदास चूडामणि यांणीं 'स्त्री' हा विषय देऊन त्यावर कविता करण्यास विनंती केली- बाईनें त्यांस १० मिनिटांत श्लोकरूपानें जबाब दिला. नंतर बाईची विद्वत्ता जणु काय कसोटीस लावण्याच्या हेतूनें तिला एका श्लोकाचा एक चरण देऊन त्या छंदाची व अर्थाची (आह्मांस वाटतें समस्यापूरणासारखी) कविता करण्यास सांगितलें. सुमारें अर्ध तासांत बाईनें त्याही प्रकरणांत मंडळीस संतोष करून दिला. नंतर इणें भागवतांतील कांहीं श्लोक ह्मणून दाखविले. तिची संस्कृत बोलण्याची रीति, विद्येचें भांडार, प्रसंगावधान व चातुर्य हीं पाहून मंडळीस मोठा आनंदयुक्त चमत्कार वाटला असें पेट्रियटकर्ते लिहितात. बाईचा स्वर चांगला असून ती जशी व्युत्पन्न तशीच वैय्याकरण आहे असें कळतें. यावरून ही रमाबाई पुरातन कालच्या ब्रह्मवादिनी गार्गी वगैरे त्यांचाच अवतार असावा.

अशा नामांकित स्त्रिया आमचे देशांत बहुत होवोत असें आह्मी इच्छितों.

---

## ईश्वरविषयक ज्ञान.

किंकारणं ब्रह्मकुतःस्मजात
जीवाम केन क्वच संप्रतिष्ठिताः।
अधिष्ठिताःकेन सुखेतरेषु
वर्त्तामहे ब्रह्मविदो-व्यवस्थाम् ॥

"हे ब्रह्मवेत्तेहो, ह्या सर्व विश्वाचें कारण काय, आह्मी झालों कशापासून, जीवंत दशेमध्यें आहो कशाच्या योगें, आमचा आधार काय, आणि सुखदुःख संबंधी जी व्यवस्था आहे ती कोणाच्या आज्ञेनें आह्मास प्राप्त होते?" हें वाक्य श्वेताश्वर नामक एक उपनिषद आहे त्याच्या आरंभीं आहे. कोणत्याही राष्ट्रामध्यें उहापोह करण्याविषयीं मनुष्यांच्या अंगीं सामर्थ्य उत्पन्न झालें, बुद्धीचा विकास होऊन नानाप्रकारचे विचार मनांत येऊं लागले, अनेक गोष्टीविषयीं जिज्ञासा उपजून ती परिपूर्ण करण्याकरितां मनुष्यें झटूं लागलीं, ह्मणजे हा मोठा प्रश्न सर्वांच्या अगोदर मनुष्यांच्या मनांत साहाजिक रीतीनें उत्पन्न होतो; आणि आपापल्या बुद्ध्यनुसार त्याचा विचार करून ते उत्तर द्यावयास लागतात. त्याचीं कांहीं उत्तरें खालीं लिहिलेल्या प्रकारचीं असतात:——

कालःस्वभावो नियतिर्यदृच्छा
भूतानि योनिःपुरुषऽतिचिन्त्या।
सयोग एषां नतुआत्मभावा
दात्माप्यनीशःसुखदुःखहेतोः ॥

कोणी ह्मणतात काल हेंच कारण, कोणी ह्मणतात जें चाललें आहे तें- सर्व आपल्या स्वभावानेंच चाललें आहे, कोणी ह्मणतात कीं, भवितव्यता ह्मणजे कांहीं एक आवश्यक नियमच आहे तेणेंकरून विश्व चाललें आहे. कोणाच्या मतें सर्व वस्तु आकस्मिक, तेव्हां आकस्मिकता हेंच कारण, कोणाच्या मतें पृथ्वी, आप, तेज इत्यादि भूतें हीं कारणें आहेत, कोणी ह्मणतात पुरुष ह्मणजे जीवात्मा कारण आहे. तर ह्याविषयीं चिंतन करणें आहे. यांतून जीवात्मा एकीकडे करून, दुसऱ्यापैकीं एक एक स्वतंत्रपणें कारण होऊं शकत नाहीं. त्या सर्वांनीं एकत्र मिळून विश्व निर्माण केलें असेंही व्हावयाचें नाहीं, कां कीं ज्या विश्वामध्यें जीवात्मा आहे त्याची उत्पात्ती ह्यांतून एका किंवा ह्या सर्वेही कारणांच्या योगें होणें शक्य नाहीं. ह्या विश्वांत कर्तृत्वशक्ति, ज्ञानशक्ति, हीं असलीं तर तीं जीवात्म्याच्या ठायीं आहेत, इतर कारणांमध्यें नाहींत. बरें जीवात्माच सर्वांचे कारण असें ह्मणावें तर तो दुर्बल आहे, कांकीं त्यास कधीं सुख प्राप्त होतें, कधीं दुःख; यास्तव तो स्वतंत्र नव्हे. तर मग विश्वाचें कारण काय?

ते ध्यानयोगानुगता अपश्यन्-
देवात्मशक्ति स्वगुणैर्निगूढाम्।
यःकारणानीनिखिलानितानि
कालात्मयुक्तान्यधितिष्ठत्येकः॥

मग ऋषी ध्यान करित बसले असतां देवरूप जो आत्मा त्याचीं सर्व जीं बाहेरून दिसणारीं कार्यें त्यांच्या आंत लपून राहिलेली अशी शक्ति त्यांच्या दृष्टीस पडली, आणि काल व जीवात्मा यांसहित जीं कारणें आपापला व्यापार करित आहेत त्यांवरील अधिष्ठाता ह्मणजे त्यांस व्यवस्थेंत ठेवणारा तो आहे असें त्याणीं पाहिलें, ह्याच उपनिषदामध्यें दुसऱ्या ठिकाणीं ह्मटलें आहे.

स्वभावमेके कवयो वदन्ति
कालं तथान्ये परिमुह्यमाना
देवस्यैष महिमातु लोके
येनेदंभ्राम्यते ब्रह्मचक्रम् ॥

मूढ होत्साते कांहीं पंडित स्वभाव हें कारण असें ह्मणतात, दुसरे काल हें कारण ह्मणतात. परंतु हें ब्रह्मचक्र सतत भ्रमण करित आहे तें देवाच्या महिम्यानें.

ह्याप्रमाणें आपलें मन इतर गोष्टींमध्यें निमग्न झालें असतां त्याचें मूळ सामर्थ्य नाहींसें होऊन त्या गोष्टींच्या योगें भलतेच संस्कार त्याजवर उमटतात. क्षुद्र विषयांमध्यें लंपट झाल्या कारणानें अंतःकरण विषयाकार होऊन जातें. त्याच्या मूळ स्वरूपावर कामक्रोधादि विकारांचा दाट लेप येऊन बसतो. यास्तव अनंत जो परमेश्वर त्याचें प्रतिबिंब मलिन झालेल्या अंतःकरण रूप आदर्शामध्यें उमटत नाहीं; ईश्वराचें ज्ञान होण्याचें जें स्वाभाविक सामर्थ्य तें लुप्त होऊन जातें. मग नानाप्रकारचे कुतर्क करावयास मनुष्य लागतो. हें सर्व आपोआप चाललें आहे, हें आकस्मिक आहे, ह्याचा शासिता कोणी नाहीं, इत्यादि कल्पना करितो. परंतु विषय व कामक्रोधादि दुर्वृत्ति ह्यांचा लेप धुवून टाकून जर मनुष्य ह्या समग्र विश्वाकडेस पाहील तर अवश्यमेव परमेश्वराचें उन्नत स्वरूप त्याच्या अंतःकरणापुढें उभें राहील आणि त्या ऋषीनें ह्मटलें आहे तसें तो ह्मणावयास लागेल, कीं "देवस्यैष महिमातु लोके येनेदं भ्रम्यते ब्रह्मचक्रम्" वादविवाद करणारे शास्त्रवेत्ते पाहिजे तें ह्मणोत, हें सर्व विश्व देवाच्या महिम्यानें चाललें आहे." (पुढें चालू) सु. प.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.